# अर्थशास्त्र

इयत्ता अकरावी



अर्थशास्त्र इ. ११ वी (मराठी माध्यम)

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास - २११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक २०.०६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# अर्थशास्त्र

## इयत्ता अकरावी

२०१९

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

K2K8G3

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
पहिले पुनर्मुद्रण : २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**अर्थशास्त्र विषय समिती :**

डॉ. मंजूषा मुसमाडे (अध्यक्ष), पुणे
श्रीमती सुनिता सुनिल कामटे, मुंबई
श्री. राजेंद्र फकिर वेखंडे, ठाणे
श्री. अंकेश ललितप्रसाद शाहू, नागपूर
श्रीमती. शितल संपत निमसे, अहमदनगर
श्रीमती. अर्चना श्रीनिवास, मुंबई
श्री. रविकिरण जाधव सदस्य-सचिव

**अर्थशास्त्र अभ्यास गट :**

श्री. सुभाष राजधर पाटील, जळगाव
श्रीमती. उषा भास्कर काळे, कोल्हापूर
श्रीमती. शोभा सुभाष नागरे, नाशिक
श्रीमती. स्वाती मिलिंद वाघ, मुंबई
श्री. रघुनाथ नारायण पाटील, कोल्हापूर
श्री. शरदकुमार उत्तम शेटे, सिंधुदुर्ग
श्रीमती. वंदना दिलीप पाटील, पुणे
श्रीमती. कविता विलास पोळ, कोल्हापूर
डॉ. सुधाकर रामकृष्ण कुटे, औरंगाबाद
श्री. काशिराम परशुराम बाविसाने, बुलढाणा

**मुख्य समन्वयक**

श्रीमती. प्राची रवींद्र साठे

**चित्रकार :** श्री. भटू रामदास बागले

**मुखपृष्ठ व सजावट :** श्रीमती अनघा इनामदार

**नकाशाकार :** श्री. रविकिरण जाधव

**अक्षरजुळणी :** मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**कागद :** ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश :**

**मुद्रक :**

**निर्मिती :**

श्री. सच्चितानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. लिलाधर आत्राम, निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनों,

अकरावीच्या वर्गात तुमचे स्वागत आहे. अर्थशास्त्र हा विषय अकरावीत प्रथमच स्वतंत्र विषय म्हणून आपल्यापुढे येत आहे. आपण अर्थशास्त्रातील काही संकल्पना इयत्ता पाचवीपासून भूगोल व गणित या शालेय विषयांमध्ये अभ्यासल्या आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेतील अनेक महत्त्वाच्या बदलांची माहिती या पाठ्यपुस्तकातून होईल. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२००५ आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा-२०१० मध्ये तयार करण्यात आला, त्याला अनुसरून २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून पुनर्रचित अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. त्यावर आधारित हे पाठ्यपुस्तक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती), पुणे यांच्यातर्फे आपणापुढे ठेवत आहोत.

इयत्ता ११ वी च्या स्तरावर 'अर्थशास्त्र' या विषयाची स्वतंत्र ओळख पाठ्यपुस्तकाद्‌वारे करण्यात येणार आहे. या विषयाचा सैद्‌धांतिक पाया मजबूत करण्याचा प्रयत्न यातून साध्य होईल. पाठ्यक्रमाचा व्यावहारिक जीवनाशी सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दैनंदिन व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या अर्थशास्त्रीय संकल्पना उदाहरणार्थ, पैसा, आर्थिक वृद्‌धी व विकास, आर्थिक सुधारणा, आर्थिक नियोजन, संख्याशास्त्र इत्यादींचा ऊहापोह करण्यात आला आहे. याशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेसमोर असणाऱ्या विविध आव्हानांचा सारासार विचार केला आहे. या अनुषंगाने इयत्ता ११ वी पुनर्रचित अर्थशास्त्र विषयाच्या अध्ययन-अध्यापनाची सर्वसाधारण उद्‌दिष्टे ही ज्ञानरचनावादाचा वापर करून निश्चित केली आहेत.

पुनर्रचित अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रमाची मांडणी करताना मूर्ताकडून-अमूर्ताकडे, ज्ञाताकडून-अज्ञाताकडे, अंशातून-पूर्णत्वाकडे या अध्ययन-अध्यापन सूत्रांचा वापर केला आहे. अर्थशास्त्र विषयाच्या पाठ्यक्रमात प्रथमतःच आशयाबरोबर विविध कृतींचा समावेश केला आहे. या कृतींमधून आशयज्ञानाबरोबर पूरक आणि अधिक ज्ञान प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी क्यू.आर.कोडच्या माध्यमातून ई-लर्निंगचा समावेश केला आहे. तसेच कृतियुक्त अध्ययन, गटांतून अध्ययन, चर्चा, स्वयंअध्ययनास पुरेशी संधी मिळेल यांचाही विचार करण्यात आला आहे.

या पाठ्यपुस्तकाची मांडणी ही अर्थशास्त्रीय भाषेशी कोणतीही तडजोड न करता सोप्या व साध्या भाषाशैलीचा वापर करून केली आहे. अर्थशास्त्राच्या संकल्पना स्पष्ट होण्यासाठी आवश्यक तेथे विविध चित्राकृती, आलेख, तक्ते इत्यादींचा वापर केला आहे. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितच उपयोग होईल. अर्थशास्त्र विषयातील अवघड संकल्पना, शब्द यांसाठी पाठ्यपुस्तकाच्या शेवटी परिशिष्टही देण्यात आले आहे, त्याचा उपयोग विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षक, पालक व स्पर्धा परीक्षांच्या उमेदवारांसाठीही नक्कीच होईल. या पाठ्यपुस्तकाचे विद्यार्थी आणि शिक्षक निश्चितच स्वागत करतील, असा विश्वास आहे.

आपल्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

(डॉ. सुनिल मगर)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : २० जून २०१९,
भारतीय सौर : ३० ज्येष्ठ १९४१.

# इयत्ता अकरावी अर्थशास्त्र

| क्षमता विधाने |
|---|
| • नैसर्गिक शास्त्र व सामाजिक शास्त्र यांतील भेद सांगतो.<br>• विविध अर्थतज्ज्ञांच्या विचारातील दृष्टिकोनांचा वेध घेऊन भिन्नता स्पष्ट करतो.<br>• अर्थशास्त्राच्या विविध व्याख्यांचे विश्लेषण करतो.<br>• सूक्ष्म व स्थूल अर्थशास्त्रातील विविध संकल्पना उदाहरणांसह स्पष्ट करतो. |
| • वस्तुविनिमयातील अडचणी समजून घेऊन पैशाच्या उदयाची आवश्यकता स्पष्ट करतो.<br>• पैशाच्या विविध व्याख्या स्पष्ट करतो.<br>• पैशाच्या उत्क्रांतीचे टप्पे सांगतो.<br>• चांगल्या पैशाचे गुणधर्म स्पष्ट करतो.<br>• पैशाची प्राथमिक, दुय्यम आनुषंगिक कार्ये समजून घेतो.<br>• काळ्या पैशाबाबत निर्माण होणाऱ्या समस्यांवर चर्चा करतो. |
| • मध्यगा, चतुर्थक, दशमक, शतमक यांचा अर्थ स्पष्ट करतो.<br>• विभाजन मूल्यांची गरज स्पष्ट करतो आणि सरासरीच्या तुलनेत विभाजन मूल्यांचे श्रेष्ठत्व स्पष्ट करतो.<br>• वैयक्तिक, खंडित व अखंडित श्रेणीच्या आधारे चतुर्थके, दशमके, शतमके शोधण्यासाठी संख्याशास्त्रीय कौशल्यांचा वापर करतो. |
| • महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची रचना स्पष्ट करतो.<br>• इतर राज्यांशी तुलना करून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांची चर्चा करतो.<br>• महाराष्ट्राच्या आर्थिक विकासातील विविध क्षेत्राचे योगदान स्पष्ट करतो.<br>• महाराष्ट्रातील कृषी, औद्योगिक व सेवा क्षेत्रातील विविध समस्या स्पष्ट करतो.<br>• महाराष्ट्र सरकारकडून अमलात आणलेल्या विविध उपाययोजनांचा आढावा घेतो. |
| • ग्रामीण विकासाचा अर्थ, व्याख्या व महत्त्व सांगतो.<br>• कर्जाचा हेतू व कालावधीच्या आधारे कृषी पतपुरवठा रचनेचे वर्गीकरण करतो.<br>• संस्थात्मक व बिगर संस्थात्मक पतपुरवठा स्रोतांतील फरक सांगतो.<br>• विविध कृषी पतपुरवठा संस्थांची भूमिका स्पष्ट करतो. |
| • भारतातील लोकसंख्या वाढीच्या प्रवाहाबाबत चर्चा करतो.<br>• भारतातील लोकसंख्या विस्फोटावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचे विश्लेषण करतो.<br>• सरकारने केलेल्या उपाययोजनांचे मूल्यमापन करतो.<br>• भारतातील मानवी संसाधनाचे महत्त्व स्पष्ट करतो. |
| • बेरोजगारीची संकल्पना स्पष्ट करतो.<br>• ग्रामीण व शहरी बेरोजगारीचे प्रकार स्पष्ट करतो.<br>• बेरोजगारीची कारण स्पष्ट करतो.<br>• सरकारने केलेल्या विविध रोजगार निर्मिती योजनांची माहिती जमा करून समजून घेतो. |
| • बहुआयामी दारिद्र्याची माहिती सांगतो.<br>• सापेक्ष व निरपेक्ष दारिद्र्यातील फरक सांगतो.<br>• दारिद्र्यरेषेचा अर्थ सांगून उद्‌दिष्टे स्पष्ट करतो.<br>• ग्रामीण व शहरी दारिद्र्य यांतील फरक सांगतो.<br>• दारिद्र्याची प्रमुख कारणे स्पष्ट करतो.<br>• दारिद्र्य विस्ताराबाबत आढावा घेतो.<br>• दारिद्र्यरेषेची संकल्पना स्पष्ट करतो.<br>• दारिद्र्य निर्मूलनाच्या उपाययोजनांचे मूल्यमापन करतो. |
| • १९९१ च्या आर्थिक धोरणांची उद्‌दिष्टे स्पष्ट करतो.<br>• उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरणाची व्याख्या सांगतो.<br>• १९९१च्या धोरणांतर्गत उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण यांसाठी केलेल्या विविध उपाययोजनांचे विश्लेषण करतो.<br>• १९९१ च्या आर्थिक धोरणांचे मूल्यमापन करतो. |
| • आर्थिक नियोजनाचा अर्थ व व्याख्या सांगतो.<br>• आर्थिक नियोजनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करतो.<br>• विविध पंचवार्षिक योजनांची उद्‌दिष्टे व यशपूर्तीबाबत विश्लेषण करतो.<br>• बाराव्या पंचवार्षिक योजनेचे विश्लेषण करतो.<br>• निती आयोगाची रचना व कार्यपद्‌धती स्पष्ट करतो.<br>• नियोजन आयोग व निती आयोग यांच्या आराखड्याची तुलना करतो. |

# – शिक्षकांसाठी –

इयत्ता ११ वी चे पुनर्रचित पाठ्यपुस्तक आपल्या हातात देताना आम्हाला आनंद होत आहे. पाठ्यपुस्तक बनवताना अध्ययन-अध्यापन सूत्रांचा वापर केला आहे. त्याचबरोबर ज्ञानरचना वादाचा उपयोग करून अध्ययन क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. कृतीयुक्त, प्रायोगिक व नाविन्यपूर्ण शिक्षण ही काळाची गरज आहे. अभ्यासक्रम आराखडा हा विद्यार्थ्याला काय शिकवले जाते व विद्यार्थी बाहेरील जगातून काय अनुभव घेतात यातील एक दुवा आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया समृद्ध करणे आणि अपेक्षित अध्ययन परिणाम साध्य करणे यासाठी खाली दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा उपयोग होईल.

- ✓ पाठ्यपुस्तक प्रथम स्वतः समजून घ्यावे.
- ✓ सदर पाठ्यपुस्तक रचनात्मक पद्धतीने व कृतीयुक्त अध्यापनासाठी तयार केलेले आहे.
- ✓ विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी व वैचारीक कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षकांनी प्रत्येक पाठातील कृतींचे कौशल्यपूर्वक नियोजन करावे.
- ✓ योग्य नियोजन करून पाठाचे अध्यापन करावे.
- ✓ विषयाच्या आकलनासाठी सुयोग्य शैक्षणिक साधनांचा वापर करावा.
- ✓ पाठांचे विषय-विवेचन सविस्तर करावे.
- ✓ अनुक्रमणिकेत दिल्याप्रमाणे पाठांचे अध्यापन करावे कारण ज्ञान संवर्धन सुलभतेने होण्यासाठी घटकांचे नियोजन क्रमबद्ध केलेले आहे.
- ✓ संख्याशास्त्राशी संबंधित तिसऱ्या प्रकरणामध्ये आंतरक्रियात्मक दृष्टीकोनाच्या आधारे अध्यापन करावे. विद्यार्थ्यांना त्यापुढील प्रकरणांमधील अर्थव्यवस्थेसंबंधीच्या समस्या सोडविण्यासाठी संख्याशास्त्रीय ज्ञानाचा वापर करता येईल.
- ✓ संख्याशास्त्रीय माहितीवर आधारीत प्रश्न विचारावेत. त्यांच्या कल व प्रकारानुसार पर्यायी प्रश्न विचारावेत. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना तथ्य संकलन व तथ्य विश्लेषणाचे महत्त्व समजावून सांगावे.
- ✓ अर्थशास्त्राच्या बहुतांश संकल्पना या शास्त्रीय आधारावर व अमूर्त बाबींवर अवलंबून असतात. गटकार्य, परस्पर सहकार्याने शिकणे इत्यादींना प्रोत्साहन द्यावे त्यासाठी आवश्यकतेनुसार वर्गरचनेत बदल करावा.
- ✓ अध्ययन-अध्यापनातील अंतरक्रिया, प्रक्रिया यामध्ये सर्व विद्यार्थ्यांसह आपला सक्रीय सहभाग असावा.
- ✓ अध्ययन-अध्यापनामध्ये अंतरक्रिया, प्रक्रिया यामध्ये सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग आवश्यक आहे आणि त्यासाठी आपले सक्रीय मार्गदर्शन आवश्यक आहे.
- ✓ **'तुम्हांला माहीत आहे का?'** हा भाग मूल्यमापनासाठी विचारात घेऊ नये व त्याबद्दल विद्यार्थी अधिक माहिती मिळवतील याची खातरजमा शिक्षकांनी करावी.
- ✓ **'तुम्हांला माहीत हवं'** हा भाग मूल्यमापनासाठी विचारात घ्यावा.
- ✓ पाठातील स्वाध्याय वेगवेगळ्या निकषानुसार बनवलेले आहेत. उदा. निरीक्षण, सह-संबंध, टिकात्मक विवेचन, विश्लेषणात्मक तर्क इत्यादी. प्रत्येक पाठाला समान भारांक आहेत. मूल्यमापन योजना ही दिलेल्या निकषांवर आधारीत असावी. प्रश्नांच्या स्वरूपामध्ये वैविध्यपूर्ण संयुक्तीकरण असावे. त्याचप्रमाणे एकाच प्रकारच्या प्रश्नांची पुनरावृत्ती टाळावी.
- ✓ पाठ्यपुस्तकात दिलेल्या QR कोडचा वापर करावा. अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी QR कोड सतत तपासत रहावा.
- ✓ संदर्भासाठी संकेतस्थळे दिलेली आहेत व त्याचप्रमाणे संदर्भग्रंथांची यादी देखील दिलेली आहे. याचा उपयोग शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी अवांतर वाचनासाठी आणि विषय सखोल समजण्यासाठी करावा.
- ✓ पारिभाषिक शब्दसूचीमधील शब्द पाठ्यपुस्तकातील प्रत्येक प्रकरणात निळ्या शाईने अधोरेखीत केलेले आहेत.
- ✓ अर्थशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या संक्षिप्त रूपांची यादी पाठ्यपुस्तकात शेवटी दिलेली आहे, त्याचा उपयोग अधिक स्पष्टीकरणासाठी करावा.

अध्यापन अनुभुतीसाठी हार्दिक शुभेच्छा!

# अनुक्रमणिका


| क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठक्रमांक | अपेक्षित/संभाव्य तासिका |
|---|---|---|---|
| १. | अर्थशास्त्रातील मूलभूत संकल्पना | १-८ | १४ |
| २. | पैसा | ९-१३ | १० |
| ३. | विभाजन मूल्य | १४-२३ | १६ |
| ४. | महाराष्ट्राची अर्थव्यवस्था | २४-३० | १४ |
| ५. | भारतातील ग्रामीण विकास | ३१-३५ | १० |
| ६. | भारतातील लोकसंख्या | ३६-४२ | १४ |
| ७. | भारतातील बेरोजगारी | ४३-४९ | १४ |
| ८. | भारतातील दारिद्र्य | ५०-५६ | १४ |
| ९. | भारताचे १९९१ पासूनचे आर्थिक धोरण | ५७-६३ | १४ |
| १०. | भारतातील आर्थिक नियोजन | ६४-६९ | १० |
| — | • अर्थशास्त्रीय सज्ञांचे परिशिष्ट<br>• संक्षिप्त रूपांची यादी<br>• संदर्भ सूची, महत्त्वाची संकेत स्थळे/दुवे | ७०-७८ | १३० |



**S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2019. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

**DISCLAIMER Note :** All attempts have been made to contact copy righters (©) but we have not heard from them. We will be pleased to acknowledge the copy right holder (s) in our next edition if we learn from them.


**मुखपृष्ठ :** इयत्ता दहावीतुन विद्यार्थी आता इयत्ता अकरावीला आलेले आहेत. 'अर्थशास्त्र' हा स्वतंत्र विषय म्हणून ते अभ्यासणार आहेत. मुखपृष्ठावर अर्थशास्त्राचे महत्त्व सांगणाऱ्या सर्व वय समावेशक समुहांचे दृष्य सादरीकरण केलेले आहे. ज्यामध्ये दृष्य प्रतिमांचे सादरीकरण हे आर्थिक गरजांच्या पदानुक्रमा प्रमाणे व वयोगटा प्रमाणे केलेले आहे.

**मलपृष्ठ :** विविध आर्थिक क्रियाकल्प

# प्रकरण – १ : अर्थशास्त्रातील मूलभूत संकल्पना

**प्रस्तावना :**

नवनवीन वैज्ञानिक शोध व नवीन गोष्टी शोधून काढणे या बाबींचा ठसा आजच्या जगावर उमटलेला आहे. शास्त्रातील लक्षणीय प्रगतीमुळे शास्त्र म्हणजे नेमके काय? या प्रश्नाचा शोध लावण्याचा आपण प्रयत्न करू लागतो. शास्त्र ही एक पद्धतशीर मांडणीची ज्ञात शाखा आहे. शास्त्राचे मुख्य दोन प्रकार आहेत.

- नैसर्गिक शास्त्र
- सामाजिक शास्त्र

- ज्या शास्त्रातील नियमांना वैश्विक मान्यता आहे आणि या नियमांची सत्यता बंदिस्त प्रयोगशाळेत नियंत्रणांतर्गत पडताळून पाहता येते अशा शास्त्राला नैसर्गिक शास्त्र म्हणतात. प्रयोग व अनुमान यांवर आधारित अभ्यासामुळे या शास्त्राला तंतोतंत शास्त्र म्हणूनही ओळखले जाते. उदा. गणित, पदार्थविज्ञान, रसायन शास्त्र इत्यादी.

- सामाजिक शास्त्रास वर्तणूक शास्त्र किंवा अमूर्त शास्त्र म्हणतात. या शास्त्रात मानवी वर्तणुकीच्या कोणत्या न कोणत्या पैलूचा अभ्यास केला जातो. उदा. 'मानसशास्त्र' हे मानवी मनाच्या वर्तणुकीशी संबंधित ज्ञान देते. सामाजिक शास्त्र हे मानव समूहातील एक घटक असून त्या संदर्भाने त्याच्या सामाजिक घटकाबाबत ज्ञान देते. मानवी वर्तणूक ही बंदिस्त प्रयोगशाळेत तपासता येत नाही तसेच ती नियंत्रित पद्धतीनेही अभ्यासता येत नाही. सामाजिक शास्त्राच्या नियमांना वैश्विक मान्यता नसते. मात्र हे नियम मानवी प्रवृत्तींच्या संदर्भाने केलेली सर्वसाधारण विधाने असतात.

**अर्थशास्त्राचा अर्थ :** अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे. 'अर्थशास्त्र' (Economics) हा शब्द मूळ ग्रीक शब्द 'ऑइकोनोमिया' (OIKONOMIA) यापासून आला आहे. याचा अर्थ ''कौटुंबिक व्यवस्थापन'' असा आहे.

पॉल सॅम्युल्सन यांनी अर्थशास्त्राचे वर्णन 'सामाजिक शास्त्रांची राणी' असे केले आहे. अर्थशास्त्र हे मानवाच्या आर्थिक वर्तणुकीच्या अभ्यासाशी निगडित आहे. या शास्त्रातून मानव आपल्या अमर्याद गरजा मर्यादित साधनांद्वारे कशा पूर्ण करतो हे हाताळले आहे.

अर्थशास्त्राच्या काही प्रसिद्ध व्याख्यांचा अभ्यास करून या विषयाची अधिक माहिती मिळवूयात.

**थोडे आठवा :**

खालील संबोध तुम्ही कुठे शिकला आहात? आर्थिक प्रणालीचे प्रकार, भांडवलशाही, समाजवाद आणि मिश्र अर्थव्यवस्था इत्यादी.

**कौटिल्य यांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन :**



आकृती १.१
कौटिल्य

कौटिल्य यांच्या मते अर्थ म्हणजे 'संपत्ती' आणि शास्त्र म्हणजे 'विज्ञान', म्हणूनच अर्थशास्त्र म्हणजे संपत्तीचे संपादन आणि व्यवस्थापन. मूलतः कौटिल्य यांचा अर्थशास्त्र हा राजकीय अर्थव्यवस्थेवरील व्यापक ग्रंथ आहे.

**कौटिल्य यांच्या अर्थशास्त्रीय दृष्टीकोनाचे महत्त्वाचे मुद्दे :**

१) सरकार किंवा राज्याची महत्त्वपूर्ण भूमिका.
२) संपत्ती निर्माण करण्यावर लक्ष्य केंद्रित करून राज्याचे कल्याण.
३) सुशासनासाठी कार्यक्षम प्रशासन यंत्रणेची आवश्यकता.
४) अर्थशास्त्रामध्ये राजकीय कल्पनांचे संकलन.

**तुम्हांला माहीत आहे का?**

कौटिल्य हे मौर्य कालखंडातील एक महान राजकारणी, तत्त्वज्ञानी, अर्थशास्त्रज्ञ व राजकीय सल्लागार होते. तसेच त्यांना चाणक्य किंवा विष्णुगुप्त म्हणून ओळखले जाते. त्यांनी प्राचीन भारतातील अर्थव्यवस्थेवर 'अर्थशास्त्र' हा राजकीय ग्रंथ लिहिला आहे.

**अर्थशास्त्राच्या व्याख्या :**

**१) ॲडम स्मिथ यांची संपत्ती संबंधित अर्थशास्त्राची व्याख्या :**



आकृती १.२
ॲडम स्मिथ

ॲडम स्मिथ यांना सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ तसेच ''अर्थशास्त्राचे जनक'' असे मानले जाते. त्यांनी अर्थशास्त्राची संपत्तीविषयक व्याख्या १७७६ मध्ये प्रकाशित केलेल्या 'राष्ट्राची संपत्ती' (''An Inquiry

into the Nature and Causes of the Wealth of Nations.'') या ग्रंथात मांडली. ॲडम स्मिथ यांच्या मते, ''अर्थशास्त्र हे संपत्तीचे शास्त्र आहे.''

### ॲडम स्मिथ यांच्या व्याख्येचे महत्वाचे मुद्दे :

१) निर्हस्तक्षेपाचे धोरण
२) भांडवल व संपत्तीचा साठा
३) आर्थिक घडामोडींमध्ये नैसर्गिक नियम
४) वृद्धीच्या सिद्धांतामध्ये 'श्रम विभाजन' या विशिष्ट पैलूला महत्त्व

**तुम्हांला माहीत आहे का?**

'पॉल रोमर' आणि 'विल्यम नॉरधॉस' यांना २०१८ सालचा अर्थशास्त्रासाठी नोबेल स्मृती पुरस्कार प्राप्त झाला आहे. पॉल रोमर हे आर्थिक वृद्धीचे अभ्यासक आहेत. नॉरधॉस यांनी पर्यावरणीय अर्थशास्त्रामध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे.

**शोधा पाहू!**

अर्थशास्त्रातील इतर नोबेल पारितोषिक विजेते.

### २) प्रा. आल्फ्रेड मार्शल यांची कल्याणकारी अर्थशास्त्राची व्याख्या :


आकृती १.३
प्रा.आल्फ्रेड मार्शल

प्रा. आल्फ्रेड मार्शल यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राची व्याख्या मांडली. ते नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञ असून त्यांनी ''अर्थशास्त्राची मूलतत्त्वे'' (Principles of Economics) हे पुस्तक १८९० साली प्रकाशित केले.

आल्फ्रेड मार्शल यांच्या मते ''अर्थशास्त्र हे मानवी कल्याणाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे, या शास्त्रात प्राप्ती व आवश्यकतेनुसार उपलब्ध साधनांचा पर्याप्त वापर यासंबंधित वैयक्तिक व सामाजिक वर्तणुकीचा अभ्यास केला जातो.''

### मार्शल यांच्या व्याख्येचे महत्वाचे मुद्दे :

१) अर्थशास्त्र म्हणजे सामान्य माणसाचा अभ्यास.
२) अर्थशास्त्र म्हणजे आर्थिक वर्तनाचे शास्त्र.
३) अर्थशास्त्र म्हणजे भौतिक कल्याणाचा अभ्यास.
४) अर्थशास्त्र केवळ संपत्तीचा अभ्यास नाही.

### ३) लिओनेल रॉबिन्स यांची दुर्मिळतेवर आधारित अर्थशास्त्राची व्याख्या :


आकृती १.४
लिओनेल रॉबिन्स

अर्थशास्त्राची ही अतिशय प्रसिद्ध व्याख्या आहे. रॉबिन्स यांनी १९३२ साली ''अर्थशास्त्राचे स्वरूप व महत्त्व'' (An Essay on the Nature and Significance of Economic Science) हे पुस्तक प्रकाशित केले. यात त्यांनी अर्थशास्त्राची दुर्मिळतेवर आधारित व्याख्या सांगितली.

''अमर्याद गरजा आणि मर्यादित परंतु दुर्मिळ व पर्यायी उपयोगाची साधने यांचा मेळ घालताना करण्यात येणाऱ्या मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय''.

### रॉबिन्स यांच्या व्याख्येचे महत्वाचे मुद्दे :

१) अमर्याद गरजा/साध्ये
२) मर्यादित साधने
३) गरजांचा प्राधान्यक्रम
४) साधनांचे पर्यायी उपयोग

**तुम्हांला माहीत आहे का?**

| विचार | अर्थशास्त्रज्ञांची नावे |
|---|---|
| सनातन संप्रदाय - १८ वे शतक | ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, जे.एस्.मिल, टी.आर्.माल्थस इत्यादी. |
| नव सनातन संप्रदाय - १९ वे शतक व २० व्या शतकाच्या सुरवातीचा अर्धा भाग | आल्फ्रेड मार्शल, ए.सी. पिगू, आयर्विंग फिशर इत्यादी. |
| आधुनिक संप्रदाय - २० व्या शतका पासून आज पर्यंत. | जे.एम.केन्स, लिओनेल रॉबिन्स, पॉल सॅम्युल्सन इत्यादी. |

### अर्थशास्त्राच्या शाखा :

सर रॅग्नर फ्रिश, यांनी १९३३ साली अर्थशास्त्राची दोन शाखांमध्ये विभागणी केली. त्या शाखा म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र होय. हे शब्द ग्रीक शब्द 'मायक्रोस' (Mikros) व 'मॅक्रोस' (Makros) यापासून आले आहेत.

### अ) सूक्ष्म अर्थशास्त्र :

'सूक्ष्म' म्हणजे लहान. सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक घटकांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. उदा. कुटुंब, कामगार, फर्म, उद्योग इत्यादी.

**केनेथ बोल्डींग यांची सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याख्या :**

''विशिष्ट उत्पादन संस्था, विशिष्ट कुटुंब, वैयक्तिक किंमती, वेतन, उत्पन्न, वैयक्तिक उद्योग आणि विशिष्ट वस्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र होय''.

**सूक्ष्म अर्थशास्त्राच्या मूलभूत संकल्पना :**

**१) गरजा :** मोजक्या शब्दांमध्ये गरजेची व्याख्या करणे कठीण आहे, पण अर्थशास्त्रीयदृष्टीने समाधानाच्या अभावाची जाणीव म्हणजे 'गरज' होय. या जाणीवेतून मानव वैयक्तिक गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

मानवी गरजा वाढण्याची मुख्य दोन कारणे आहेत.

- नवीन शोध आणि नवप्रवर्तनामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारण्याची इच्छा.
- लोकसंख्येमध्ये झालेली वाढ.

**गरजांची वैशिष्ट्ये :**

i) **अमर्यादित गरजा :** गरजा या पुन्हा पुन्हा निर्माण होत असून, त्या कधीही न संपणाऱ्या असतात. एक गरज पूर्ण करेपर्यंत दुसरी गरज पुन्हा निर्माण होते. गरजा सातत्याने निर्माण होतात.

ii) **गरजा या पुनरुद्‌भवी असतात :** काही गरजा पुन्हापुन्हा निर्माण होतात. तर काही गरजा प्रसंगानुरूप निर्माण होतात.




आकृती १.५ अ, ब, क : वय आणि गरज

iii) **गरजा वयानुसार बदलतात :** वेगवेगळ्या गरजा व त्यांचे समाधान वयोपरत्वे बदलत असते. (आकृती १.५ अ, ब, क)

iv) **गरजा लिंगभेदानुसार बदलतात :** स्त्री-पुरुषांच्या गरजा आवश्यकतेनुसार बदलतात.

v) **गरजा पसंतीक्रमानुसार बदलतात :** प्रत्येक व्यक्ती आपापल्या सवयी, आवडीनिवडी आणि पसंतीनुसार गरजांची निवड करतो.



आकृती १.६ ऋतू आणि गरजा

vi) **गरजा हवामानानुसार बदलतात :** गरजा या वेगवेगळ्या हवामानानुसार, ऋतुमानानुसार बदलत असतात. (आकृती १.६)

vii) **गरजा संस्कृतीनुसार बदलतात :** गरजा या संस्कृतीनुसार बदलत असतात. गरजांच्या निवडीवर संस्कृतीचा प्रभाव पडतो. विशेषत: आहार, वेशभूषा इत्यादी.

**गरजांचे वर्गीकरण :**

गरजांचे वर्गीकरण खालील प्रकारे करता येते.

i) **आर्थिक आणि आर्थिकेत्तर गरजा :**

- ज्या गरजांची पूर्तता पैशांच्या साहाय्याने केली जाते त्यांना आर्थिक गरजा असे म्हणतात. वैयक्तिकरित्या त्यांचा मोबदला पैशाच्या स्वरूपात दिला जातो. उदा. अन्न , औषधे इत्यादी.
- ज्या गरजा पैशांशिवाय पूर्ण करता येतात त्या म्हणजे आर्थिकेत्तर गरजा होय. उदा. हवा, सूर्यप्रकाश इत्यादी.

ii) **वैयक्तिक गरजा आणि सामूहिक गरजा :**

- ज्या गरजा वैयक्तिक पातळीवर पूर्ण केल्या जातात त्यांना वैयक्तिक गरजा असे म्हणतात. उदा. डॉक्टरांचा स्टेस्थास्कोप, न्यायाधिशाचा कोट.
- सामूहिक गरजा या सामाजिक गरजा आहेत जेथे गरजांची सामूहिक पूर्तता होते. उदा. रेल्वे प्रवास.

iii) **जीवनावश्यक, सुखसोयीच्या आणि चैनीच्या गरजा :**

- मूलभूत गरजा म्हणजे जीवनावश्यक गरजा होय. उदा. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य इत्यादी.
- ज्या गरजा व्यक्तीला जीवनामध्ये सुखसमाधान देतात त्यांना सुखसोयीच्या गरजा असे म्हणतात. उदा. धुलाई यंत्र, मिक्सर, प्रेशर कुकर इत्यादी.
- ज्या गरजांमुळे व्यक्तीला आनंद व सामाजिक प्रतिष्ठा मिळते त्यांना चैनीच्या गरजा असे म्हणतात. **उदा.** वातानुकूलित गाडी, फर्निचरयुक्त घर.

**२) वस्तू आणि सेवा :** ही एक अर्थशास्त्रामधील प्रसिद्ध संकल्पना आहे.

- ज्या घटकाद्वारे मानवी गरज पूर्ण केली जाते त्यास वस्तू असे म्हणतात. वस्तूंना भौतिक अस्तित्व असते. उदा. शिक्षकाने वापरलेला खडू.
- सेवादेखील मानवी गरजा भागवतात. परंतु सेवांना भौतिक अस्तित्व नसते. उदा. शिक्षकांचे शिकवणे.

**३) उपयोगिता :** वस्तू व सेवांमध्ये असणारी मानवी गरज भागवण्याची क्षमता म्हणजे उपयोगिता होय.

**४) मूल्य :** अर्थशास्त्रामध्ये 'मूल्य' दोन प्रकारे सांगितले जाते. उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य.

- **उपयोगिता मूल्य** : उपयोगिता मूल्य हे एखाद्या वस्तूच्या मूल्याशी संबंधित आहे. सोप्या शब्दात सांगायचे झाल्यास एखाद्या वस्तूची उपयुक्तता म्हणजे त्या वस्तूंचे उपयोगिता मूल्य होय. उदा. कोणालाही सूर्यप्रकाशासाठी किंमत द्यावी लागत नाही, परंतु प्रत्येकासाठी तो आवश्यक आहे. अर्थशास्त्रीय परिभाषेत सूर्यप्रकाशाला उपयोगिता मूल्य आहे. हे विनामूल्य वस्तूचे उदाहरण आहे.
- **विनिमय मूल्य** : विनिमय मूल्य म्हणजे एखाद्या वस्तूचे दुसऱ्या वस्तूच्या किंवा सेवेच्या रूपात व्यक्त केलेले मूल्य होय. हे मूल्य पैशांच्या स्वरूपात सांगितले की ती वस्तूची किंमत असते. ज्या वस्तूला पैशांत किंमत मोजावी लागते त्याला आर्थिक वस्तू म्हणतात. उदा. टीव्ही, कार इत्यादी.
- **हिरे–पाणी विरोधाभास** : काही वस्तूंचे उपयोगिता मूल्य जास्त तर विनिमय मूल्य कमी असते. उदा. पाणी तसेच काही वस्तूंचे उपयोगिता मूल्य कमी, पण दुर्मिळतेमुळे विनिमय मूल्य जास्त असते. उदा. हिरा. (आकृती १.७)



आकृती १.७ हिरे–पाणी विरोधाभास

**शोधा पाहू :**

**खालील उदाहरणांवरून विनामूल्य वस्तू किंवा आर्थिक वस्तू शोधा.**

- नदीचे पाणी
- ऑक्सिजन सिलेंडर
- सूर्यप्रकाश
- शुद्धीकरण केलेले पिण्याचे पाणी
- हवा

**५) संपत्ती :** ''संपत्ती म्हणजे ज्या वस्तूला बाजार मूल्य असते व त्याच वस्तूची देवाणघेवाण करता येते अशा वस्तूंना संपत्ती असे म्हणतात.''

संपत्तीची वैशिष्ट्ये :

i) उपयोगिता
ii) दुर्मिळता
iii) विनिमयता
iv) मनुष्यबाह्यता

i) **उपयोगिता :** वस्तूंमध्ये मानवाची गरज पूर्ण करण्याची क्षमता असली पाहिजे. उदा. फर्निचर, फ्रिज इत्यादी.

ii) **दुर्मिळता :** मागणीच्या तुलनेत वस्तूंचा पुरवठा दुर्मिळ असेल तरच त्याचा समावेश संपत्तीमध्ये होतो. उदा. सर्व आर्थिक वस्तू, ज्या वस्तूसाठी किंमत मोजली जाते.

iii) **विनिमयता :** वस्तूंचा विनिमय एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी करता आला पाहिजे. ज्या वस्तू मूर्त असतात त्यांचेच हस्तांतरण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होते. उदा. वाहने, दागदागिने इत्यादी.

iv) **मनुष्यबाह्यता :** वस्तू ही केवळ मानवी शरीरबाह्य असेल तरच ती हस्तांतरीत केली जाऊ शकते. हे त्याच्या बाह्य आणि वैयक्तिक गुणधर्मानुसार झाले पाहिजे. उदा. पिशवी, खुर्ची इत्यादी.

**तुम्हांला माहीत आहे का?**

जन्मजात मिळणाऱ्या गुणवत्तेचा समावेश संपत्तीत होत नाही. उदा. सौंदर्य, आवाज इत्यादी. हे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरण करता येत नाही.

**करून पहा.**

भौतिक हस्तांतरण क्षमता व मालकी हस्तांतरण क्षमतेनुसार वस्तूंची यादी तयार करा.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**भौतिक हस्तांतरण क्षमता :** यामध्ये प्रत्यक्ष वस्तू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरित केली जाते. उदा. वाहने

**मालकी हस्तांतरणक्षमता :** यामध्ये काही बदल करू शकत नाही, परंतु त्यांच्या मालकी हक्काचे हस्तांतर करता येते. उदा. जमीन

**६) वैयक्तिक उत्पन्न :** व्यक्तीला त्याच्या सर्व स्त्रोतांकडून मिळणारे मोबदले म्हणजे त्याचे वैयक्तिक उत्पन्न होय.

**७) वैयक्तिक व्ययशक्य उत्पन्न :** वैयक्तिक उत्पन्नातील असा भाग जो प्रत्यक्ष कर म्हणजे उत्पन्न कर, वैयक्तिक संपत्ती कर इत्यादी, भरल्यानंतर उरतो त्याला वैयक्तिक व्ययशक्य उत्पन्न म्हणतात.

**तुम्हांला माहीत हवे:**

**उत्पन्नाचे खालील प्रमाणे विविध प्रकार आहेत.**

**अ) स्थिर उत्पन्न :** विशिष्ट कालावधीत स्थिर असणारे उत्पन्न होय. उदा. भाडे, वेतन इत्यादी.

**ब) अस्थिर उत्पन्न :** विशिष्ट कालावधीत अस्थिर असणारे उत्पन्न होय. उदा. नफा. नफा हा धनात्मक, ऋणात्मक व शून्य असू शकतो.

**क) पैशातील उत्पन्न (प्राप्ती) :** जे उत्पन्न देशाच्या चलनात प्राप्त होते. त्याला पैशातील उत्पन्न किंवा मौद्रीक उत्पन्न म्हणतात. उदा. ₹ ५००० उत्पन्न.

**ड) वास्तव उत्पन्न :** प्रत्यक्ष खर्च करण्यायोग्य उत्पन्न होय. उदा. पैशाच्या मोबदल्यात वस्तूची खरेदी.

**इ) करारात्मक उत्पन्न :** विशिष्ट नियम व शर्तीनुसार मिळणारे उत्पन्न होय. उदा. खंड, मजुरी इत्यादी.

**ई) उर्वरित/शेष उत्पन्न :** उत्पादन घटकांना सर्व मोबदले दिल्यानंतर शिल्लक राहणारे उत्पन्न म्हणजे उर्वरित उत्पन्न होय. उदा. नफा.

**उ) अर्जित उत्पन्न :** उत्पादन प्रक्रियेत सहभागी झाल्यानंतर मिळणाऱ्या उत्पन्नास अर्जित उत्पन्न म्हणतात. उदा. खंड, वेतन, व्याज, नफा इत्यादींपासून मिळणारे उत्पन्न.

**ऊ) अनर्जित उत्पन्न :** कोणत्याही उत्पादन प्रक्रियेत सहभागी न होता इतर मार्गाने प्राप्त होणारे उत्पन्न म्हणजे अनर्जित उत्पन्न होय. उदा. लॉटरी, अनपेक्षित लाभ इत्यादी.

**८) आर्थिक क्रिया :** आर्थिक क्रियांचे वर्गीकरण चार प्रकारे केले जाते, ज्यामध्ये उत्पादन, वितरण, विनिमय व उपभोग यांचा समावेश होतो.




आकृती १.८ आर्थिक क्रिया

अ) उत्पादन : ''उपयोगितांची निर्मिती म्हणजे उत्पादन होय''. भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजक हे चार उत्पादनाचे प्रमुख घटक आहेत.

**हे नेहमी लक्षात ठेवा.**

जे उपक्रम केवळ दान छंद केले जातात तिथे आर्थिक विनिमय नसते तेथे अर्थव्यवस्थेला अनुत्पादक मानले जाते. त्याद्वारे जीवनात अमुल्य मूल्य वाढवू शकतात.

**उत्पादनाचे चार घटक :**

१) **भूमी :** 'भूमी' हा उत्पादनाचा नैसर्गिक घटक असून विनामूल्य देणगी आहे. ''भूपृष्ठालगत, भूपृष्ठाच्यावर व भूपृष्ठाच्या खाली उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीस अर्थशास्त्रामध्ये 'भूमी' असे म्हणतात''. उदा. खनिजे ही भूपृष्ठाखाली मिळतात, मृदा व पाणी हे भूपृष्ठालगत मिळते तर हवा व सूर्यप्रकाश भूपृष्ठावर मिळतात. म्हणजे अर्थशास्त्रात भूमी ही व्यापक संकल्पना आहे. उत्पादन कार्यात सहभागी झाल्याबद्दल भूमीला खंड मिळतो.

२) **श्रम :** उत्पादन प्रक्रियेत श्रम हा मानवी घटक आहे. आर्थिक मोबदला मिळविण्याच्या हेतूने मानवाने केलेले कोणतेही शारीरिक व बौद्धिक काम म्हणजे 'श्रम' होय. श्रम या उत्पादन घटकाला वेतन, मजुरी या स्वरूपात मोबदला मिळतो. उदा. सुतार, लेखनिक, अभियंता इत्यादींची कामे.

३) **भांडवल :** पुढील उत्पादन वाढीसाठी भांडवलाची निर्मिती केली जाते. भांडवल हा उत्पादनाचा मानवनिर्मित घटक आहे. भांडवल या उत्पादन घटकाला व्याजाच्या स्वरूपात मोबदला मिळतो. उदा. यंत्रसामग्री, तंत्रज्ञान, कारखान्याची इमारत इत्यादी.

४) **संयोजक :** ''उद्योगाचा प्रमुख व्यवस्थापक व कप्तान म्हणजेच संयोजक होय''. उत्पादन प्रक्रियेतील संयोजन कौशल्याबद्दल त्याला नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळतो.

आ) **वितरण :** उत्पादनाचे समाजाच्या विविध भागांमध्ये वितरण होते. उत्पादन घटकांचे मोबदले खंड, वेतन, व्याज, नफा या स्वरूपात वितरण व्यवस्थे द्वारे वितरीत केले जातात.

इ) **विनिमय :** ''विनिमय म्हणजे आर्थिक वस्तू व सेवांची देवाण-घेवाण किंवा खरेदी-विक्री होय''. अर्थशास्त्रामध्ये विनिमय हा प्रामुख्याने आर्थिक व्यवहाराशी संबंधित आहे.

ई) **उपभोग :** ''उपभोग म्हणजे मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी वस्तू व सेवांचा उपयोग करणे होय''.

## ब) स्थूल अर्थशास्त्र :

स्थूल म्हणजे मोठे किंवा एकूण. स्थूल अर्थशास्त्रामध्ये एकूण घटकांचा म्हणजेच एकूण रोजगार, राष्ट्रीय उत्पादन, एकूण गुंतवणूक, एकूण बचत, एकूण उपभोग, एकूण पुरवठा व एकूण मागणी, सामान्य किंमत पातळी इत्यादींचा अभ्यास केला जातो.

**केनेथ बोल्डींग यांची स्थूल अर्थशास्त्राची व्याख्या :**

''स्थूल अर्थशास्त्राचा संबंध वैयक्तिक परिमाणांशी नसून एकूण परिमाणांशी येतो, वैयक्तिक उत्पन्नाशी नसून राष्ट्रीय उत्पनाशी येतो, वैयक्तिक किंमतीशी नसून सर्वसाधारण किंमत पातळीशी येतो. तसेच वैयक्तिक उत्पादनाशी नसून राष्ट्रीय उत्पादनाशी येतो.''

**स्थूल अर्थशास्त्राच्या मूलभूत संकल्पना :**

१) **राष्ट्रीय उत्पन्न :** राष्ट्रीय उत्पन्न हे देशाच्या आर्थिक व्यवहारांशी संबंधीत असते त्याला देशाचे एकूण उत्पन्न असेही म्हणतात.

''एका आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादित झालेल्या अंतिम वस्तू व सेवांची बाजारभावानुसार केलेली गणना म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय''.

**राष्ट्रीय उत्पन्न समितीने दिलेली व्याख्या :**

"राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एखाद्या विशिष्ट कालखंडात उत्पादित करण्यात आलेल्या वस्तू व सेवांची दुहेरी गणना टाळून केलेले मापन होय".

**२) बचत :** उत्पन्नाचा असा भाग, जो भविष्यातल्या गरजा पूर्ण करण्यासाठी सध्याच्या उपभोगाचा त्याग करून शिल्लक राहतो त्यास बचत म्हणतात. तसेच बचत म्हणजे उत्पन्नाचा असा भाग, जो चालू उपभोगावर खर्च केला जात नाही.

**३) गुंतवणूक :** बचतीतून भांडवलाची निर्मिती होते आणि भांडवलाचा वापर उत्पादन प्रक्रियेसाठी करणे म्हणजे गुंतवणूक होय. उदा. यंत्रसामग्री, उपकरणे इत्यादी.

**४) व्यापार चक्र :** अर्थव्यवस्थेत घडून येणाऱ्या आर्थिक चढ-उतारामुळे जे व्यापारात बदल घडून येतात त्यांना व्यापारचक्रे असे म्हणतात. ते प्रामुख्याने आर्थिक क्रियांमधील चढ-उतारांमुळे निर्माण होतात.

**चढ आणि उतार** म्हणजे तेजी व मंदी होय.

- **तेजी :** सातत्याने सामान्य किंमत पातळीत होणारी वाढ म्हणजे तेजी होय.
- **मंदी :** सातत्याने सामान्य किंमत पातळीत होणारी घट म्हणजे मंदी होय.

**तुम्हांला माहीत आहे का?**

व्यापारातील चक्रीय बदलामुळे निर्माण होणाऱ्या बेकारीस 'चक्रीय बेकारी' असे म्हणतात.

**५) आर्थिक वृद्धी :** आर्थिक वृद्धी या संकल्पनेला संख्यात्मक दृष्टिकोन आहे. सोप्या शब्दांत सांगायचे तर आर्थिक वृद्धी म्हणजे दीर्घकाळात देशाच्या वास्तव उत्पन्नात झालेली संख्यात्मक वाढ होय.

**६) आर्थिक विकास :** आर्थिक विकास ही व्यापक संकल्पना असून यात एक गुणात्मक दृष्टिकोन आहे. आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वृद्धींसोबत मानवाच्या कल्याणासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांमध्ये गुणात्मक बदल घडवून आणणे होय. उदा. शिक्षण, आरोग्य इत्यादी.

**शोधा पाहू :**

**खालीलपैकी कोणत्या संज्ञा सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्राच्या आहेत.**

- जागतिक दारिद्र्य
- वस्तूची किंमत
- व्यवहार तोल
- उद्योगाचा नफा
- राष्ट्रीय उत्पन्न

**कायम लक्षात ठेवा**

| आर्थिक वृद्धी | आर्थिक विकास |
|---|---|
| १) आर्थिक वृद्धी म्हणजे देशाच्या वास्तव उत्पन्नात होणारी वाढ. | १) आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वृद्धीबरोबरच महत्त्वपूर्ण आर्थिक घटकात परिवर्तनशील बदल जे लोकांच्या कल्याणात वाढ करतात. |
| २) ही संकल्पना संकुचित व संख्यात्मक आहे. | २) ही संकल्पना व्यापक व गुणात्मक आहे. |
| ३) आर्थिक वृद्धी आर्थिक विकासाशिवाय शक्य आहे. | ३) आर्थिक विकास आर्थिक वृद्धीशिवाय शक्य नाही. |
| ४) आर्थिक वृद्धी ही एकांगी संकल्पना आहे. | ४) आर्थिक विकास सर्वसमावेशक संकल्पना आहे. |
| ५) आर्थिक वृद्धी ही स्वयंस्फूर्त आणि प्रतिगामी होणारा बदल आहे. | ५) आर्थिक विकास हा सहेतुक व पुरोगामी होणारा बदल आहे. |
| ६) आर्थिक वृद्धी ही राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नाद्वारे मोजली जाते. | ६) आर्थिक विकास हा कृषी उत्पादकता, औद्योगिक उत्पादकता, जीवनमान दर्जा इत्यादींद्वारे मोजला जातो. |

**तक्ता : १.१**

## स्वाध्याय

**प्र.१. योग्य पर्याय निवडा :**

**१) अर्थशास्त्राच्या बाबतीत पुढील विधाने लागू होतात.**

अ) अर्थशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे.

ब) अर्थशास्त्र या संकल्पनेचे मूळ ग्रीक शब्द 'ऑइकोनोमिया' (OIKONOMIA) पासून आले आहे.

क) अर्थशास्त्र हे मानवाच्या आर्थिक वर्तणुकीच्या अभ्यासाशी निगडित आहे.

ड) अर्थशास्त्र हे कौटुंबिक वा संपत्तीचे व्यवस्थापन करणारे शास्त्र आहे.

**पर्याय :** १) अ, ब, क  २) अ आणि ब
३) ब आणि क  ४) अ, ब, क आणि ड

**२) ॲडम स्मिथ यांच्याबाबतीत कोणते विधान किंवा विधाने लागू होत नाहीत.**

अ) ॲडम स्मिथ यांना सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ म्हणतात.

ब) ॲडम स्मिथ यांनी 'राष्ट्राची संपत्ती' हा ग्रंथ लिहिला.

क) 'अर्थशास्त्र' हे संपत्तीचे शास्त्र आहे.

ड) अर्थशास्त्र हे सामान्य माणसाचा अभ्यास करते.

**पर्याय :** १) ड  २) अ,ब आणि क
३) अ आणि ड  ४) क आणि ड

**३) लिओनेल रॉबिन्स यांच्या व्याख्येत पुढील मुद्द्यांचा विचार केला आहे.**

अ) अमर्याद गरजा  ब) मर्यादित साधने
क) गरजांना अग्रक्रम नसतो  ड) साधनांचे पर्यायी उपयोग

**पर्याय :** १) अ आणि ब  २) ब आणि क
३) अ, ब, क आणि ड  ४) अ, ब आणि ड

**४) संपत्तीच्या बाबतीत खालील विधाने लागू होतात.**

अ) संपत्ती म्हणजे अशी कोणतीही वस्तू जिला बाजारमूल्य आहे आणि त्याची देवाणघेवाण करते.

ब) संपत्तीत मनुष्यबाह्यता आहे.

क) संपत्तीत उपयोगिता नसते.

ड) संपत्तीत दुर्मिळता आणि विनिमयता आहे.

**पर्याय :** १) अ, ब, ड  २) अ, क आणि ड
३) ब, क आणि ड  ४) यापैकी नाही.

**५) राष्ट्रीय उत्पन्नात खालील घटकांचा विचार केला जातो.**

अ) राष्ट्रीय उत्पन्नात अंतिम वस्तू व सेवांचा समावेश होतो.

ब) यात आर्थिक वर्षातील उत्पादित वस्तू व सेवांचा समावेश होतो.

क) दुहेरी मोजदाद टाळली जाते.

ड) बाजारभावानुसार मूल्य विचारात घेतले जाते.

**पर्याय :** १) अ आणि क  २) ब आणि क
३) अ, ब आणि ड  ४) अ, ब, क आणि ड

**प्र. २. सहसंबंध पूर्ण करा :**

१) नैसर्गिक शास्त्र : तंतोतंत शास्त्र :: सामाजिक शास्त्र : ______

२) भौतिक शास्त्र : ______ :: मानसशास्त्र : सामाजिक शास्त्र

३) अर्थशास्त्र : कौटिल्य :: राष्ट्राची संपत्ती : ______

४) आवश्यक गरजा : ______ :: सुखसोयीच्या गरजा : धुलाई यंत्र

५) विनामूल्य वस्तू : उपयोगिता मूल्य :: आर्थिक वस्तू : ______

**प्र. ३. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा**

१) वडिलांनी मला दुचाकी गाडी विकत घेऊन दिली. त्यामुळे माझी रोजच्या प्रवासाची गरज भागते.

२) रमेशच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा अभ्यास.

३) आर्थिक वर्ष २०१८-१९ नुसार देशाच्या उत्पादनात वस्तू व सेवांमध्ये २० टक्के वृद्धी झाली.

४) करुणाची आई तिच्या पगारातून दरमहा ₹ १००० वाचवते.

५) रामच्या वडिलांनी त्यांना मिळालेला प्रॉव्हीडंट फंड किराणामालाचे दुकान थाटण्यासाठी वापरला.

**प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) संपत्तीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) मानवी गरजांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**प्र. ५. खालील विधानाशी सहमत/असहमत आहात काय? सकारण स्पष्ट करा :**

१) सर्वच गरजा एकाच वेळी पूर्ण होत असतात.

२) मानवी गरजा ह्या हवामान व पसंतीक्रमानुसार बदलत असतात.

३) उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य दोन्ही एकच आहेत.

**प्र.६. सविस्तर उत्तरे लिहा :**

१) स्थूल अर्थशास्त्राच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट करा.

# प्रकरण २ : पैसा

**प्रस्तावना :**

मानव हा बुद्धिमान प्राणी आहे. पैशाचा शोध हा जगातील अनेक महत्वपूर्ण व मूलभूत शोधांपैकी एक आहे. क्राऊथर यांच्या मते ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत काही मूलभूत संशोधन असते. उदा. विज्ञानात अग्नीचा शोध, यांत्रिक शास्त्रात चाकांचा शोध इत्यादी. पैशाचा शोध हा असाच एक महत्वपूर्ण शोध असून, त्याने मानवाच्या आर्थिक आयुष्यात क्रांतिकारी बदल घडवून आणला आहे. पैशांद्वारे विविध वस्तू व सेवांची खरेदी-विक्री करता येते. पैशामुळे गरजांचे समाधान होते. आधुनिक अर्थव्यवस्था पैशावर अवलंबून आहे. दैनंदिन व्यवहारात पैसा हा वस्तुविनिमयातील समस्या दूर करतो.



आकृती २.१ वस्तुविनिमय




**वस्तुविनिमय :** वस्तूच्या बदल्यात वस्तू देणे-घेणे म्हणजे वस्तू विनिमय होय.

**वस्तुविनिमयातील अडचणी :**

१) **गरजांच्या दुहेरी संयोगाचा अभाव :** वस्तुविनिमय व्यवस्थेची मुख्य मर्यादा म्हणजे गरजांच्या दुहेरी संयोगाचा अभाव होय. उदा. 'अ' व्यक्तीकडे कापड आहे त्याबदल्यात त्याला तांदूळ हवा आहे. 'ब' व्यक्तीकडे तांदूळ आहे पण त्याला 'अ' व्यक्तीकडून कापड नको आहे यामध्ये दुहेरी संयोगाचा अभाव असल्याने वस्तूविनिमय शक्य नाही.

२) **मूल्याच्या सामायिक मापदंडाचा अभाव :** वस्तुविनिमय पद्धतीत वस्तूचे मूल्य मोजण्यासाठी प्रमाणित मापकाचा अभाव होता. उदा. दोन लीटर दुधाची तुलना दोन किलो तांदळाबरोबर करता येत नाही.

३) **वस्तूंचा साठा करण्यातील अडचण :** भविष्याच्या उपभोगासाठी वस्तू साठवणे गरजेचे असते. परंतु नाशवंत वस्तूंचा साठा करणे अवघड होते. उदा. दूध, अंडी, मासे, भाजीपाला इत्यादी, तसेच जागेच्या अभावामुळे अवजड वस्तू साठवणे कठीण होते.

४) **वस्तूच्या विभाज्यतेची अडचण :** प्राणी, घर इत्यादींचे छोट्या भागात विभाजन करणे गैरसोयीचे होते, त्यामुळे एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूशी विनिमय करणे अवघड होते. उदा. 'अ' या व्यक्तीकडे गव्हाचे पोते आहे. त्याला विनिमयात शेळी हवी आहे. 'ब' या व्यक्तीकडे शेळी आहे, त्याला गव्हाचे अर्धेच पोते हवे आहे. अशा वेळेस गव्हाचे अर्धे पोते असे विभाजन करणे शक्य आहे, परंतु जिवंत शेळीचे विभाजन करणे शक्य नाही. विभाज्यतेची अडचण निर्माण झाल्यामुळे विनिमय होऊ शकत नाही.

५) **विलंबित देणी देण्यातील अडचण :** विलंबित देणी म्हणजे भविष्यातील देणी व कर्जाची परतफेड होय, परंतु वस्तू विनिमयात वस्तूरूपाने कर्ज परत करणे हे अवघड होते.

उदा. भविष्यात नाशवंत वस्तूंची त्याच स्वरूपात परतफेड करणे अवघड होते.

**पैशाची व्याख्या :**

१) **प्रा. क्राऊथर :** ''जी वस्तू विनिमय माध्यम म्हणून सर्वसाधारणपणे स्वीकार्य असते आणि त्याचबरोबर जी वस्तू मूल्यमापनाचे व मूल्यसंचयनाचे कार्य करते अशी कोणतीही वस्तू म्हणजे पैसा''.

२) **प्रा. वॉकर :** ''जो पैशाची कार्ये करतो तो पैसा होय''.

**पैशाची उत्क्रांती :** 'पैसा' अस्तित्वात येण्याचे कारण 'उत्क्रांती' आहे 'क्रांती' नव्हे. पैशाचे स्वरूप काळाची गरज व संस्कृतीचा विकास यांनुसार सतत बदलले आहे.




आजच्या आधुनिक काळात वापरल्या जाणाऱ्या पैशाचे स्वरूप हा काळाप्रमाणे झालेल्या बदलांचा परिणाम आहे.

पैशाच्या उत्क्रांतीनुसार चलनाचे विविध प्रकार खालीलप्रमाणे आहेत. (आकृती २.२)



आकृती २.२
पैशांची उत्क्रांती

**पैशाचे प्रकार :**

१) **पशू पैसा :** इतिहास पूर्वकाळात देवाणघेवाणीचे माध्यम म्हणून पशूपैसा वापरला जात होता. उदा. गायी, शेळ्या, मेंढ्या इत्यादी. परंतु विभाजनाच्या अडचणीमुळे वस्तू पैसा अस्तित्वात आला.

२) **वस्तू पैसा :** जुन्या काळात ज्या वस्तू पैसा देवाणघेवाणीचे माध्यम म्हणून वापरल्या जात होत्या त्या हवामानाची स्थिती व संस्कृती यांवर अवलंबून होत्या. उदा. प्राण्यांची कातडी, धान्य, शिंपले, पीसे, हस्तिदंत, मीठ, दगड व दुर्मिळ वस्तू हे विनिमयाचे माध्यम म्हणून वापरले जात होते, परंतु वस्तूंचा साठा करण्याच्या अडचणीमुळे धातू पैसा अस्तित्वात आला.

३) **धातू पैसा :** धातू पैसा तयार करताना सोने, चांदी, तांबे, ॲल्युमिनिअम, निकेल इत्यादी धातूंचा वापर केला जात होता. परंतु मौल्यवान धातू व धातूंच्या तुकड्यातील समानतेच्या अभावामुळे धातूंच्या नाण्यांचा शोध लागला.

४) **धातूंची नाणी :** पूर्वीच्या काळी विविध राज्यांचे राजे त्यांची मुद्रा असलेली नाणी बनवत असत. काळपरत्वे शासकीय धोरणानुसार मौद्रीक नाण्यांमध्ये एकवाक्यता व कायदेशीर स्थिरता आणण्याच्या उद्देशाने प्रणाली निश्चित केली गेली. नाण्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे–

**अ) प्रमाणित किंवा प्रधान नाणी :** प्रमाणित नाणी म्हणजे ज्यांचे दर्शनी मूल्य व अंतरिक मूल्य सारखे असते. अधिकृत यंत्रणेद्वारे दर्शनी मूल्याचे विनीमय मूल्य निश्चित केले जाते. ही नाणी सोने, चांदी, इत्यादी धातूंपासून बनविलेली असतात. ब्रिटिश कालखंडात काही दिवस प्रमाणित नाणी वापरली जात होती.

**ब) गौण नाणी किंवा लाक्षणिक नाणी :** लाक्षणिक नाणी म्हणजे ज्यांचे दर्शनी मूल्य हे अंतरिक

मूल्यापेक्षा जास्त असते. ही नाणी ॲल्युमिनिअम, निकेल यांसारख्या कमी दर्जाच्या धातूपासून बनविलेली असतात. भारताच्या चलनातील सर्व नाणी लाक्षणिक किंवा गौण नाणी आहेत. गौण नाणी ही कमी मूल्याची असल्याने तुलनेने कमी रकमेच्या व्यवहारांमध्ये वापरली जातात. गौण नाण्यांच्या वहनियतेच्या अडचणीमुळे कागदी पैसा अस्तित्वात आला.

५) **कागदी पैसा :** कागदी पैसा हा धातूच्या पैशाला पर्याय आहे. भारतात नोटा चलनात आणण्याचा एकाधिकार मध्यवर्ती बँकेकडे आहे. भारत सरकार व मध्यवर्ती बँकेकडून अंमलात आणलेल्या कागदी चलनाचा समावेश कागदी पैशात होतो.

भारतामध्ये एक रुपयाची नोट व सर्व प्रकारची नाणी भारत सरकारकडून चलनात आणली जातात व त्यापुढील चलनाच्या निर्मितीचे अधिकार मध्यवर्ती बँकेकडे (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) आहेत. कागदी पैसा हाताळण्यातील गैरसोय व पैसा साठवण्यातील जोखीम या कारणांमुळे बँक पैसा अस्तित्वात आला.

६) **पतपैसा किंवा बँक पैसा :** पतपैसा म्हणजे बँक पैसा होय. बँका लोकांकडून ठेवलेल्या ठेवींच्या आधारे पतपैसा निर्माण करतात. त्याचा वापर पतपैसा निर्मितीसाठी केला जातो. हा केव्हाही काढता येतो, किंवा ज्याचे दुसऱ्या व्यक्तीकडे धनादेश, धनाकर्ष इत्यादींच्या साहाय्याने हस्तांतरण करता येते. हा धनादेश, धनाकर्ष इत्यादी पैशासारखे कार्य करतो. परंतु पैसा नव्हे, तर ठेवी हस्तांतरित करण्याचे पतसाधन आहे. पतपैसा देशाच्या आर्थिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडतो. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात पैसाविरहित देवाणघेवाण अधिक महत्त्वाची असल्याने प्लॅस्टिक पैसा अस्तित्वात आला.

७) **प्लॅस्टिक पैसा :** प्लॅस्टिक पैसा वापरणे आधुनिक तंत्रज्ञानामुळे सोपे झाले आहे. डेबिट व क्रेडिट कार्ड्स प्लॅस्टिक पैसा म्हणून वापरले जातात. नवनवीन शोधाचे पुढचे पाऊल म्हणजेच इलेक्ट्रॉनिक पैसा होय.

**शोधा पाहू :**

प्लॅस्टिक पैशाच्या सुरक्षित वापरासाठी केलेल्या नवीन सुधारणा.

८) **इलेक्ट्रॉनिक पैसा :** इ-पैसा किंवा इलेक्ट्रॉनिक पैशाला मौद्रीक मूल्य असून ते इलेक्ट्रॉनिक यंत्रणेच्या साहाय्याने हस्तांतरित केले जाते. उदा. मोबाईल फोन, टॅब्लेट, स्मार्ट कार्ड्स, संगणक इत्यादी. इलेक्ट्रॉनिक पैशाला मध्यवर्ती बँकेचे पाठबळ असते. इलेक्ट्रॉनिक पैसा जागतिक व्यवहारामध्ये वापरला जातो. अंका त्मक किंवा संगणकीय पाकीट (Digital wallets) हा देखील साठविलेल्या इलेक्ट्रॉनिक पैशाचा प्रकार आहे.

**शोधा पाहू :**

अंकीय (डिजिटल) देवाणघेवाण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध साधनांची यादी तयार करा.

**तुम्हांला माहीत हवं :**

**अ) विधिग्राह्य पैसा :** या पैशाला कायद्याचे पाठबळ असल्यामुळे कोणत्याही व्यवहारात स्वीकारला जातो. भारतातील सर्व नाणी व चलनी नोटा इत्यादी.

**ब) अविधिग्राह्य पैसा :** हा पैसा लोक अंतिम देवाणघेवाण करण्यासाठी वापरतात. कोणतेही कायदेशीर पाठबळ नसल्याने हा पैसा नाकारता येतो. याला पर्यायी पैसा किंवा ऐच्छिक पैसा असेही म्हणतात. धनादेश, विनिमय पत्रे इत्यादी.

### पैशाचे गुणधर्म :

१) **सार्वत्रिक स्वीकार्यता :** पैसा या वस्तूमध्ये सार्वत्रिक स्वीकार्यता हा गुणधर्म असल्याने तो विनिमयाचे माध्यम म्हणून वापरला जातो.

२) **विभाज्यता :** छोट्या व्यवहारामध्ये पैशाचे छोट्या मूल्यात विभाजन करणे सोपे जाते.

३) **टिकाऊपणा :** पैशाच्या अंगी टिकाऊपणा हा गुणधर्म असल्याने चलनी नोटा व नाणे दीर्घकाळात पुन्हा पुन्हा वापरता येतात.

४) **सुज्ञेयता :** पैसा ही वस्तू सुलभतेने ओळखता येते. देवाणघेवाण करणाऱ्या व्यक्तीकडून निर्माण होणारी संदिग्धता टाळता येते.

५) **वहनीयता :** एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजगत्या, सोयीनुसार वाहून नेता येते. उदा. चलनी नोटा.

६) **एकजिनसीपणा :** एखाद्या विशिष्ट परिमाणाचे पैसे गुणवैशिष्ट्यांमुळे एक जिनसी दिसतात.

७) **स्थिरता :** पैशाला स्थिर मौद्रिक मूल्य आहे. ते वस्तू व सेवांचे विनिमय मूल्य मोजण्यासाठी वापरतात. या वस्तूंची देवाणघेवाण भविष्यातील गरजांनुसार केली जाते.

## पैशाची कार्ये :

### अ) प्राथमिक कार्ये :

१) **विनिमयाचे माध्यम :** पैशाचे सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे विनियमाचे माध्यम होय. पैशाच्या आधारे वस्तूची खरेदी विक्री केली जाते.

२) **मूल्यमापनाचे साधन किंवा हिशोबाचे परिमाण :** वस्तू व सेवांची किंमत पैशात व्यक्त केली जाते. पैशामुळे वस्तूंच्या किंमतीची तुलना करता येते. विविध चलनांद्वारे विविध देशांतील वस्तूंचे मूल्य व्यक्त करता येते. उदा. भारतातील रुपया, संयुक्त अमेरिकेच्या संस्थानामधील डॉलर, युनायटेड किंगडमचे पौंड, जपानचे येन इत्यादी. तसेच सर्व प्रकारचे उत्पन्न, खर्च, मालमत्ता, देणी पैशाच्या स्वरूपात व्यक्त करता येतात.

### ब) दुय्यम कार्ये :

१) **विलंबित देणी देण्याचे साधन :** वस्तुविनिमय व्यवस्थेत कर्ज घेणे सोपे होते पण त्याची परतफेड करणे अवघड होते. उदा. धान्य, गुरे या स्वरूपातील कर्ज. जी देणी भविष्यात द्यावी लागतात त्याला विलंबित देणी असे म्हणतात. पैसा हे देणी देण्याचे साधन आहे. पैशांमुळे कर्ज देणे व कर्ज घेणे सोपे जाते. पैशाने ही समस्या सोडविली आहे.

२) **मूल्यसंचयनाचे साधन :** पैसा मूल्यसंचयनाचे कार्य करतो. पैसा वर्तमानकाळातील गरजांची पूर्तता करण्याबरोबरच भविष्यकाळातील गरजांची पूर्तता करण्यासाठी वापरला जातो. हे बचतीमुळे शक्य होते. लॉर्ड. जे. एम केन्स यांच्या मते ''पैसा वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांच्यातील दुवा आहे''.

३) **मूल्य हस्तांतरणाचे साधन :** पैशामुळे एका व्यक्तींकडून दुसऱ्या व्यक्तीकडे व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मूल्याचे हस्तांतरण केले जाते. स्थावर मालमत्ता, इमारत, प्लॉट, दुकान, शेतजमीन इत्यादीची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी खरेदी विक्री करता येते.

### क) अनुषंगिक कार्ये :

प्रा. किन्ले यांच्या मते, आधुनिक काळात पैसा प्रत्येक आर्थिक व्यवहारात महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

१) **राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन :** राष्ट्रीय उत्पन्न हे पैशाच्या स्वरूपात मोजले जाते. राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण उत्पादनाच्या चार घटकांमध्ये मौद्रीक मोबदल्याच्या स्वरूपात केले जाते. उदा. खंड, वेतन, व्याज, नफा इत्यादी.

२) **पतपैशाचा आधार :** व्यापारी बँका प्राथमिक ठेवींच्या आधारावर पतपैसा निर्माण करतात. पैसा हा पत निर्मितीसाठी रोखतेचा आधार आहे.

३) **संपत्तीचे रोखतेत रूपांतरण :** पैसा ही सर्वांत मोठी तरल संपत्ती आहे. ती कोणत्याही मालमत्तेत रूपांतरित करता येते आणि कोणतीही मालमत्ता पैशात रूपांतरीत करता येते. उदा. एखादी व्यक्ती सोने खरेदी करून परत विकू शकते त्यातून सरकारी कर्जरोखे खरेदी करू शकते.

४) **स्थूल आर्थिक चलांचे मापन :** स्थूल राष्ट्रीय उत्पादन(GNP), एकूण बचत, एकूण गुंतवणूक इत्यादींसारख्या स्थूल आर्थिक चलांची मोजदाद मौद्रीक चलनाच्या रूपात पैशामुळे करता येते. तसेच पैशामुळे शासकीय कर आकारणी व अर्थसंकल्प बांधणी करणे सोईचे होते.

## काळा पैसा संकल्पना :

उत्पन्नावरील कर न भरल्याने काळ्या पैशाची निर्मिती होते. हा पैसा कायदेशीर, बेकायदेशीर पद्धतीने व कर चुकवेगिरी करून मिळवला जातो. काळ्या पैशामुळे भ्रष्टाचार, लाच, काळाबाजार, साठवणूक इत्यादीत वाढ होते. काळ्या पैशामुळे अशा बेकायदेशीर घडामोडींना चालना मिळते. त्यामुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. काळ्या पैशामुळे आर्थिक, राजकीय व सामाजिक अस्थिरता निर्माण होते. काळ्या पैशावर नियंत्रण आणणाऱ्या विविध साधनांपैकी विमुद्रीकरण हे एक साधन आहे. जागतिक स्तरावर अनेक राष्ट्रांनी या मार्गाचा अवलंब केला आहे.

# स्वाध्याय

**प्र. १. सहसंबंध पूर्ण करा :**

१) पैशाचे प्राथमिक कार्य : विनिमयाचे साधन :: [ ] : मूल्य हस्तांतरण

२) [ ] : पतपैशाचा आधार :: पैशाची दुय्यम कार्ये : विलंबित देणी देण्याचे साधन

३) वस्तूपैसा : शंख-शिंपले :: [ ] : क्रेडीट कार्ड

४) विभाज्यता : कमी मूल्यांमध्ये विभागणी :: [ ] पैशाचे स्थलांतरण करणे सोपे होते

५) वस्तुविनिमय : वस्तू ::आधुनिक अर्थव्यवस्था : [ ]

**प्र. २. आर्थिक पारिभाषिक शब्द सांगा :**

१) वस्तूची वस्तूशी केलेली देवाणघेवाणीची क्रिया..........

२) भविष्यात परतफेड करण्याची तरतूद..........

३) अशी यंत्रणा ज्यामध्ये चलनाद्‌वारे फेड करण्याची सोय आहे..........

४) तारण या साधनाचा वापर करून खात्यावरील रकमेचे स्थानांतरण करता येते..........

५) पैशाचे मूल्य संगणकाच्या सहाय्याने हार्ड ड्राईव्ह किंवा सर्व्हर वर साठवता येणे व इलेक्ट्रॉनिकने स्थानांतरीत करता येणे..........

६) असा पैसा जो खाती जमा नाही व सरकारला ही याबाबत माहिती दिलेली नाही..........

**प्र. ३. योग्य पर्याय निवडा :**

**१) पैशाच्या उत्क्रांतीनुसार क्रम लावा.**

अ) धातू पैसा

आ) पशू पैसा

इ) धातूची नाणी

ई) वस्तू पैसा

**पर्याय :** १) अ, आ, इ, ई  २) आ, ई, अ, इ
३) ई, इ, अ, आ  ४) इ, अ, आ, ई

**२) पैशाच्या उत्क्रांतीनुसार क्रम लावा.**

अ) प्लॅस्टिक पैसा

आ) कागदी पैसा

इ) इलेक्ट्रॉनिक पैसा

ई) पत पैसा

**पर्याय :** १) आ, ई, अ, इ  २) अ, आ, इ, ई
३) ई, इ,आ, अ  ४) इ, आ, अ, ई

**प्र. ४. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा :**

१) वसंतशेट त्याच्या दुकानातील कोळसा शेतकऱ्यांना त्याच्या धान्यांच्या बदल्यात देतो.

२) बबनराव त्यांचे पैसे राष्ट्रीयकृत बँकेत ठेवतात.

३) चारूने तिच्या लहान भावासाठी डेबीट कार्ड वापरून शर्ट खरेदी केला.

४) मालतीने मध्यस्थामार्फत घर खरेदी केले. मध्यस्थाने तिच्याकडून मध्यस्थीचे पैसे रोख घेतले आणि त्याची पावती दिली नाही.

५) राष्ट्रीय चलनाचा अपव्यय/अयोग्य वापर टाळण्यासाठी काही वेळेस प्रचलित चलन प्रतिबंधित करण्यात येते.

**प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात की नाहीत ते सकारण स्पष्ट करा :**

१) वस्तूविनिमयात कोणत्याही अडचणी दिसून येत नाही.

२) आधुनिक चलनाची अनेक चांगली गुणधर्म दिसून येतात.

३) पैशाद्‌वारे अनेक कार्ये पूर्ण केली जातात.

४) पैसा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्‌वारे कुठेही सहज स्थानांतरीत करता येतो.

**प्र. ६. दिलेल्या माहितीच्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

गणेश बसने मॉलला गेला. त्याने तिकिट काढण्यासाठी वाहकाला दहा रूपयांचे नाणे दिले. मॉल मधून त्याने अनेक वस्तू घेतल्या.

घेतलेल्या वस्तूंचे पैसे देण्यासाठी त्याने क्रेडिट कार्ड वापरले. परंतु पैसे घेणाऱ्या माणसाने त्याला आम्ही फक्त डेबिट कार्ड घेतो असे सांगितले. गणेशचे डेबिट कार्ड घरी राहिल्याने त्याने रोख पैशाने देयक भरले.

१) वरील व्यवहारात कोणकोणत्या प्रकारचे पैसे वापरले ते सांगा.

२) त्यापैकी कोणतेही दोन प्रकारचे पैसे स्पष्ट करा.

◈◈◈

# प्रकरण – ३ : विभाजन मूल्य

**आठवून पाहूया :**

- 'सरासरी' ह्या शब्दाशी तुम्ही परीचित आहात काय?
- वैयक्तिक खंडित आणि अखंडित श्रेणी यांचा अर्थ सांगता येईल का?
- तुम्ही पूर्वी शिकलेल्या स्थितीमध्य सरासरी प्रकारांची नावे सांगा.

| सरासरीचे प्रकार | वैयक्तिक श्रेणी | खंडित श्रेणी | अखंडित श्रेणी |
|---|---|---|---|
| १) अंकगणितीय मध्य | $\overline{x} = \frac{\Sigma x}{n}$ | $\overline{x} = \frac{\Sigma f_i x_i}{n}$ | प्रत्यक्ष पद्धत $\overline{x} = \frac{\Sigma f_i x_i}{n}$ |
| २) बहुलक | पदमालेत सर्वात जास्त वेळा येणारी संख्या | सर्वाधिक वारंवारतेचे मूल्य | बहुलक $= l + \left[\frac{f_१ - f_०}{२f_१ - f_० - f_२}\right] \times h$ |
| ३) मध्यगा | $M = \frac{n+१}{२}$ च्या पदाचे मूल्य | $M = \frac{n+१}{२}$ च्या पदाचे मूल्य | $M = l + \left(\frac{\frac{n}{२} - cf}{f}\right) \times h$ |

**प्रस्तावना :**

'सामग्रीची समान भागांमध्ये विभागणी करणे म्हणजे विभाजन होय'. सामग्रीची विभागणी करताना आवश्यक संख्या समान प्रमाणात विभागणे याला 'विभाजन मूल्य' असे म्हणतात.

केंद्रीय प्रवृत्तीची मापके म्हणजेच सरासरी–अंकगणिय मध्य, मध्यक व बहुलक यांचा अभ्यास यापूर्वी दहावी इयत्तेत केलेला आहे. दिलेली सामग्री चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडून मध्यभागी येणाऱ्या निरीक्षणाचे मूल्य म्हणजे मध्यक होय. 'मध्यक' हे विशेष प्रकारचे विभाजन मूल्य आहे. मध्यकाच्या दोन्ही बाजूला निरीक्षणाची संख्या समान असते. मध्यकाप्रमाणेच चतुर्थके, दशमके व शतमके ही सुद्धा विभाजन मूल्ये आहेत. या मूल्यामध्येही निरीक्षणांची संख्या समान भागात विभागली जाते. सर्वसाधारणपणे विभाजनमूल्ये ही भागक(भाजक) म्हणून ओळखली जातात. विभाजन मूल्ये हा वर्णनात्मक संख्याशास्त्रातील एक भाग आहे.

लोकसंख्या, बेकारी, दारिद्र्य या प्रकरणांमध्ये आर्थिक सामग्रीचे विश्लेषण करताना विभाजन मूल्यांचा वापर कसा करता येईल याची ओळख विद्यार्थ्यांना या प्रकरणात करून देत आहोत.

**तुम्हांला माहित आहे का?**

**संख्याशास्त्र दिन :** प्रा. प्रसन्त चंद्र महालनोबीस हे भारतीय संख्याशास्त्रज्ञ होते. त्यांनी भारताचा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत (१९५६–६१) औद्योगिकरणाची रचना तयार केली. यालाच 'महालनोबीस प्रारूप' (model) असे म्हणतात.

पी. सी. महालनोबीस यांनी दोन सामग्री संचाची तुलनात्मक गणना करण्यासाठी मापन तयार केले. यालाच 'महालोबनीस अंतर गणना' असे म्हटले जाते. तसेच त्यांनी वेगवेगळ्या गटातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीची तुलना करण्यासाठी 'भाजक आलेखी विश्लेषण' ही संख्याशास्त्रीय पद्धत तयार केली. आर्थिक नियोजन व संख्याशास्त्रीय विकास या क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन भारत सरकारने २९ जून हा त्यांचा जन्मदिन 'संख्याशास्त्र दिन' म्हणून घोषित केला. राष्ट्रीय पातळीवर दरवर्षी हा दिवस 'संख्याशास्त्र दिन' म्हणून विशेष दिन साजरा केला जातो.

### विभाजन मूल्यांची गरज :

एखादी सामग्री चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडली असता तिच्या टोकाकडील संख्या म्हणजे बाह्यवर्धक मूल्य होय. अशा किमती वेगळ्या पडतात. त्यामुळे अशा सांख्यिकिय माहितीचे सरासरीने केलेले वाचन बहुधा चुकीचे होते. यावर मात करण्यासाठी विभाजनमूल्यांचा वापर केला जातो. जसे की मध्यक, चतुर्थक, दशमक आणि शतमक.

**हे कायम लक्षात ठेवा :**

दुसरे चतुर्थक ($Q_2$) = पाचवे दशमक ($D_5$) = पन्नासावे शतमक ($P_{50}$) = मध्यगा

**तुम्हाला माहीत हवे :**

**चतुर्थक, दशमक आणि शतमक यांची अर्थशास्त्रातील व्यवहारिक उपयोग :**

- चतुर्थकांचा उपयोग सर्व प्रकारच्या अर्थशास्त्रीय सांख्यिकीय आकडेवारीशी संबंधित आर्थिक माहिती गोळा करण्यासाठी होतो.
- रोजगारातील चढउतार, चलनवाढ अशा आर्थिक बदलांमधील वैयक्तिक उत्पन्न गटांमधील बदलांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी उत्पन्न चतुर्थक काढणे ही अतिशय वस्तूनिष्ठ पद्धती आहे.
- वित्त आणि अर्थशास्त्रामध्ये दशमकांची व्यावहारिक उपयुक्तता भरपूर आहे. आर्थिक विषमता, दारिद्र्यरेषेचे मोजमाप, दुष्काळजन्य परिस्थिती इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी शासनाकडून 'दशमक पद्धती' वापरली जाते.
- दशमकांचा वापर गुंतवणूक क्षेत्रामध्ये विशेषकरून म्युच्युअल फंडासारख्या पोर्टफोलीओ गुंतवणूक क्षेत्राची कामगिरी अभ्यासण्यासाठी केला जातो.
- मूल्यमापन चाचण्या, आरोग्य निर्देशांक, कौटुंबिक उत्पन्न, कौटुंबिक संपत्ती, शतमक रोजगार इत्यादींच्या मापनासाठी शतमके वापरली जातात.
- शतमकांचा उपयोग विविध मापदंड तसेच आधारभूत हेतूंची आखणी करण्यासाठी होतो.

### हे शिकूया :

**चतुर्थक (Quartiles) :**

**अर्थ :** ज्या संख्या संपूर्ण निरीक्षणाचे समान चार भाग करतात त्यांना 'चतुर्थके' असे म्हणतात. चतुर्थके तीन असतात. हे या तीन मूल्यांना अनुक्रमे पहिले चतुर्थक, दुसरे चतुर्थक आणि तिसरे चतुर्थक असे म्हणतात. दुसरे चतुर्थक म्हणजे मध्यक/मध्यगा असते. सर्वसाधारणपणे चतुर्थक काढण्यासाठी संख्या श्रेणी चढत्या क्रमाने जोडली जाते.




अ) सामान्यतः वैयक्तिक श्रेणी आणि खंडित श्रेणीसाठी खालील सूत्रे वापरली जातात.

$$Q_i = i\left(\frac{n+१}{४}\right) \text{ च्या पदाचे मूल्य} \qquad i = १, २, ३$$

ब) अखंडित वारंवारिता वितरण दिले असताना खालील सूत्राचा वापर केला जातो.

$$Q_i = l + \left(\frac{\frac{in}{४} - cf}{f}\right) \times h \qquad i = १, २, ३$$

***l*** = चतुर्थक वर्गाची कनिष्ठ मर्यादा

***f*** = चतुर्थक वर्गाची वारंवारता

***cf*** = चतुर्थक वर्गाच्या आधीच्या वर्गाची संचित वारंवारता

***n*** = एकूण वारंवारता

***h*** = चतुर्थक वर्गाची वरिष्ठ मर्यादा – चतुर्थक वर्गाची कनिष्ठ मर्यादा

**चतुर्थकाची गणना**

**सोडवलेले उदाहरणार्थ**

**अ) वैयक्तिक श्रेणी :**

१) प्रथम सत्रातील परीक्षेत विद्यार्थ्यांना मिळालेले गुण पुढीलप्रमाणे. त्यावरून पहिले चतुर्थक व तिसरे चतुर्थक काढा.

४०, ८५, ८४, ८३, ८२, ६९, ६८, ६५, ६४, ५५, ४५

**रीत :** प्रथम संख्या चढत्या क्रमाने मांडू : ४०, ४५, ५५, ६४, ६५, ६८, ६९, ८२,८३,८४,८५

$n$ = एकूण संख्येचे निरीक्षण

$n = ११$

$$Q_१ = \left(\frac{n+१}{४}\right) \text{ च्या पदाचे मूल्य}$$

$$Q_१ = \left(\frac{११+१}{४}\right) \text{ च्या पदाचे मूल्य}$$

$$Q_१ = \left(\frac{१२}{४}\right) \text{ च्या पदाचे मूल्य}$$

$Q_१$ = ३ च्या पदाचे मूल्य

$Q_१$ = तिसऱ्या क्रमांकाची संख्या ५५ आहे.

∴ **पहिले चतुर्थक ($Q_१$) = ५५**

**तिसरे चतुर्थक :**

$Q_३ = ३\left(\frac{n + १}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ३\left(\frac{११ + १}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ३\left(\frac{१२}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ३ \times ३$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ९$ क्रमांकावर ८३ संख्या आहे.

∴ **तिसरे चतुर्थक ($Q_३$) = ८३**

**उत्तर : पहिले चतुर्थक ($Q_१$) = ५५, तिसरे चतुर्थक ($Q_३$) = ८३**

**२) खालील माहितीच्या आधारे तिसरे चतुर्थक ($Q_३$) काढा.**

२०, २८, ३१, १८, १९, १७, ३२, ३३, २२, २१

**रीत :** प्रथम संख्या चढत्या क्रमाणे मांडू या

१७, १८, १९, २०, २१, २२, २८, ३१, ३२, ३३

एकूण संख्या $(n)$ = १०

$Q_३ = ३\left(\frac{n + १}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ३\left(\frac{१० + १}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = \left(३ \times \frac{११}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = \left(\frac{३३}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ८.२५$ पदाचे मूल्य

$Q_३ = ८$ व्या पदाचे मूल्य + ०.२५ (९ व्या पदाचे मूल्य – ८ व्या पदाचे मूल्य).

$Q_३ = ३१ + ०.२५ (३२ - ३१)$

$Q_३ = ३१ + ०.२५ \times १$

∴ **$Q_३$ = ३१.२५**

**उत्तर : तिसरे चतुर्थक ($Q_३$) = ३१.२५**

**ब) खंडित श्रेणी :** चढत्या किंवा उतरत्या क्रमाने दिलेल्या निरीक्षणाची मांडणी करून खंडीत श्रेणीची चतुर्थके काढली जातात.

$Q_i = i\left(\frac{n + १}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य $\qquad i = १, २, ३$

१) खालील सामग्रीवरून पहिले चतुर्थक ($Q_१$) व तिसरे चतुर्थक ($Q_३$) काढा.

| **उत्पन्न (लाख ₹)** | ५ | ४ | ९ | १२ | १५ | ६ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **व्यक्तींची संख्या** | ८ | ६ | १२ | ८ | ६ | ९ | १० |

**रीत :** प्रथम संख्या चढत्या क्रमाने मांडून त्याची संचित वारंवारिता काढा.

| उत्पन्न (लाख ₹) $(x)$ | व्यक्तींची संख्या $(f)$ | संचित वारंवारता $(cf)$ |
|---|---|---|
| ४ | ६ | ६ |
| ५ | ८ | १४ |
| ६ | ९ | २३ |
| ९ | १२ | ३५ |
| १० | १० | ४५ |
| १२ | ८ | ५३ |
| १५ | ६ | ५९ |
| | $n$ = ५९ | |

$Q_१ = \left(\frac{n + १}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_१ = \left(\frac{५९ + १}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_१ = \left(\frac{६०}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_१ = १५$ च्या पदाचे मूल्य

संचित वारंवारता १५ ही संचित वारंवारतेच्या २३ या गटामध्ये येते आणि याचे मूल्य ६ लाख ₹ आहे.

∴ **पहिले चतुर्थक ($Q_१$) = ६ लाख ₹**

$Q_३ = ३\left(\frac{n + १}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ३\left(\frac{५९ + १}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ३\left(\frac{६०}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = (३ \times १५)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ४५$

संचित वारंवारता ४५ ही संचित वारंवारतेच्या ४५ या गटामध्ये येते आणि याचे मूल्य १० लाख ₹ आहे.

तिसरे चतुर्थक ($Q_३$) = १० लाख ₹

∴ **($Q_३$) = १० लाख ₹**

**उत्तर : पहिले चतुर्थक ($Q_१$) = ६ लाख ₹, तिसरे चतुर्थक ($Q_३$) = १० लाख ₹**

**क) अखंडित श्रेणी :** अखंडित श्रेणीनुसार पहिले चतुर्थक ($Q_१$) व तिसरे चतुर्थक ($Q_३$) काढताना खालील पायऱ्या वापरल्या जातात.

१) प्रथम संख्या चढत्या व उतरत्या क्रमाने मांडावी.
२) प्रत्येक गटाची वारंवारता त्या-त्या गटासमोर लिहा.
३) संचित वारंवारता काढा.
४) चतुर्थक वर्ग निश्चित करा.

**पायरी – I** : प्रथम चतुर्थक वर्ग निश्चित करा.

$Q_१ = \left(\frac{n}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = \left(\frac{३n}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

**पायरी – II** :

$$Q_1 = l + \left(\frac{\frac{in}{४} - cf}{f}\right) \times h \qquad i = १, २, ३$$

$l$ = चतुर्थक वर्गाची कनिष्ठ मर्यादा

$f$ = चतुर्थक वर्गाची वारंवारता

$cf$ = चतुर्थक वर्गाच्या आधीच्या वर्गाची संचित वारंवारता

$n$ = एकूण वारंवारता

$h$ = चतुर्थक वर्गाची वरिष्ठ मर्यादा – चतुर्थक वर्गाची कनिष्ठ मर्यादा

१) खालील सामग्रीचे पहिले चतुर्थक ($Q_१$) आणि तिसरे चतुर्थक ($Q_३$) काढा.

| **पाऊस – सेमी** | २०-३० | ३०-४० | ४०-५० | ५०-६० |
|---|---|---|---|---|
| **वर्षांची संख्या** | ७ | २० | १७ | ६ |

| **पाऊस – सेमी वर्गांतर ($x$)** | **वारंवारिता वर्षांची संख्या ($f$)** | **संचित वारंवारता ($cf$)** |
|---|---|---|
| २०-३० | ७ | ७ |
| ३०-४० | २० | २७ |
| ४०-५० | १७ | ४४ |
| ५०-६० | ६ | ५० |
| | $n = ५०$ | |

**पायरी – I**

$Q_१ = \left(\frac{n}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_१ = \left(\frac{५०}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_१ = (१२.५)$ च्या पदाचे मूल्य

१२.५ या पदाचे मूल्य २७ या संचित वारंवारिता गटात येते म्हणून त्याचा गट ३०-४० या वर्गामध्ये येते.

$l = ३०, \quad f = २०, \quad cf = ७, \quad n = ५०, \quad h = १०$

**पायरी – II**

$$Q_१ = l + \left(\frac{\frac{n}{४} - cf}{f}\right) \times h$$

$$Q_१ = ३० + \left(\frac{\frac{५०}{४} - ७}{२०}\right) \times १०$$

$$Q_१ = ३० + \left(\frac{१२.५ - ७}{२०}\right) \times १०$$

$$Q_१ = ३० + \left(\frac{५.५}{२०}\right) \times १०$$

$$Q_१ = ३० + \left(\frac{५५}{२०}\right)$$

$$Q_१ = ३० + २.७५$$

$$Q_१ = ३२.७५$$

**∴ पहिले चतुर्थक ($Q_१$) = ३२.७५**

**पायरी – I**

$Q_३ = \left(\frac{३n}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = \left(\frac{३ \times ५०}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = \left(\frac{१५०}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३$ = ३७.५ च्या पदाचे मूल्य

$Q_३$ = ३७.५ च्या पदाचे मूल्य ४०-५० या वर्गामध्ये होते.

$l = ४०, \quad f = १७, \quad cf = २७, \quad n = ५०, \quad h = १०$

**पायरी – II**

$$Q_३ = l + \left(\frac{\frac{३n}{४} - cf}{f}\right) \times h$$

$$Q_३ = ४० + \left(\frac{\frac{३ \times ५०}{४} - २७}{१७}\right) \times १०$$

$$Q_३ = ४० + \left(\frac{३७.५ - २७}{१७}\right) \times १०$$

$$Q_३ = ४० + \left(\frac{१०.५}{१७}\right) \times १०$$

$$Q_३ = ४० + \frac{१०५}{१७}$$

$$Q_३ = ४० + ६.१८$$

$$Q_३ = ४६.१८$$

$\therefore Q_३ = ४६.१८$

**उत्तर : पहिले चतुर्थक ($Q_१$) = ३२.७५, तिसरे चतुर्थक ($Q_३$) = ४६.१८**

## दशमक (Decile) :

ज्या संख्या संपूर्ण निरीक्षणाचे समान दहा भाग करतात, त्यांना 'दशमके' असे म्हणतात. दशमके हे नऊ असतात. सर्वसाधारणपणे दशमक काढण्यासाठी संख्या श्रेणी चढत्या क्रमाने मांडली जाते. दशमकाचे एकूण नऊ भाग असतात. दशमके ही $D_१$ ते $D_९$ अशी मोजली जातात.

अ) वैयक्तिक श्रेणी व खंडित श्रेणी दिलेली असताना दशमके खालील सूत्रा नुसार काढली जातात.

$$D_j = j\left(\frac{n+१}{१०}\right) \text{ च्या पदाचे मूल्य} \qquad j = १, २...९$$

ब) अखंडित वारंवारता वितरण दिलेले असताना खालील सूत्रांचा वापर केला जातो.

$$Dj = l + \left(\frac{\frac{jn}{१०} - cf}{f}\right) \times h \qquad j = १, २...९$$

**D** = दशमक

***l*** = दशमक वर्गाची कनिष्ठ मर्यादा

***f*** = दशमक वर्गाची वारंवारता

***cf*** = दशमक वर्गाच्या आधीच्या वर्गाची संचित वारंवारता

***h*** = दशमक वर्गाची वरिष्ठ मर्यादा – दशमक वर्गाची कनिष्ठ मर्यादा

### दशमकाची गणना

### सोडवलेले उदाहरण

### अ) वैयक्तिक श्रेणी :

१) खालील सामग्रीचा चौथे दशमक ($D_४$) आणि आठवे दशमक ($D_८$) शोधा.

१०, १५, ७, ८, १२, १३, १४, ११, ९

**रीत :** संख्या प्रथम चढत्या क्रमाने मांडू.

७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५

$D_४ = ४\left(\frac{n+१}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_४ = ४\left(\frac{९+१}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_४ = ४\left(\frac{१०}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_४ = ४ \times १$ च्या पदाचे मूल्य

$D_४ = ४$ च्या पदाचे मूल्य

$D_४$ = चौथ्या दशमकाचे मूल्य ($D_४$) = १०

$\therefore \mathbf{D_४ = १०}$

**आठव्या दशमकाची गणना**

$D_८ = ८\left(\frac{n+१}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_८ = ८\left(\frac{९+१}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_८ = ८ \times \left(\frac{१०}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_८ = \left(\frac{८०}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_८ = (८ \times १)$ च्या पदाचे मूल्य

$D_८ = ८$ च्या पदाचे मूल्य = १४

$\therefore \mathbf{D_८ = १४}$

**उत्तर : चौथे दशमक ($D_४$) = १०, आठवे दशमक ($D_८$) =१४**

२) खालील माहितीच्या आधारे आठवे दशमक ($D_८$) काढा.

**उदाहरण :** १४, १३, १२, ११, १५, १६, १८, १७, १९, २०

रीत : प्रथम संख्या चढत्या क्रमाणे मांडू या

११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०

पदाची एकूण संख्या ($n$) = १०

$D_८ = ८\left(\frac{n+१}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_८ = ८\left(\frac{१०+१}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_८ = ८\left(\frac{११}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_८ = (८ \times १.१)$ च्या पदाचे मूल्य

$D_८ = (८.८)$ पदाचे मूल्य

$D_८ = ८$ व्या पदाचे मूल्य + ०.८ (९ व्या पदाचे मूल्य – ८ व्या पदाचे मूल्य).

$D_८ = १८ + ०.८\ (१९ - १८)$

$D_८ = १८ + ०.८ \times १$

$\therefore \mathbf{D_८ = १८.८}$

**उत्तर : आठवे दशमक ($D_८$) = १८.८**

**ब) खंडित श्रेणी :**

१) खालील सामग्रीवरून दुसरे दशमक ($D_२$) व चौथे दशमक ($D_४$) काढा.

| गुण | १० | २० | ३० | ४० | ५० | ६० |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | ५ | ६ | ४ | ५ | १० | ९ |

| गुण | विद्यार्थी संख्या (*f*) | संचित वारंवारता *cf* |
|---|---|---|
| १० | ५ | ५ |
| २० | ६ | ११ |
| ३० | ४ | १५ |
| ४० | ५ | २० |
| ५० | १० | ३० |
| ६० | ९ | ३९ |
| | $n$ = ३९ | |

**दुसऱ्या दशमकाची ($D_२$) गणना :**

$D_२ = २\left(\frac{n + १}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_२ = २\left(\frac{३९ + १}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_२ = २\left(\frac{४०}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_२ = २ \times ४$ च्या पदाचे मूल्य

$D_२ = ८$ च्या पदाचे मूल्य

८ ही संख्या संचित वारंवारतेच्या ११ या संख्येच्या जवळ येते त्यामुळे त्याचे मूल्य संलग्नश्रेणी २० मध्ये येते.

$\therefore$ दुसरे दशमक $D_२$ = २० गुण

$\therefore$ **$D_२$ = २०**

**$D_४$ गणना :**

$D_४ = ४\left(\frac{n + १}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_४ = ४\left(\frac{३९ + १}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_४ = ४\left(\frac{४०}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_४ = ४ \times ४$ च्या पदाचे मूल्य

१६ ही संख्या संचित वारंवारता २० या संख्येच्या जवळ येते त्यामुळे त्यास संलग्नश्रेणी मूल्य ४० येते

चौथे दशमक ($D_४$) = ४० गुण

$\therefore$ **$D_४$ = ४०**

**उत्तर : दुसरे दशमक ($D_२$) = २०, चौथे दशमक ($D_४$) = ४०**

**क) अखंडित श्रेणी :**

चतुर्थकासाठी दिलेल्या अखंडित श्रेणीमधील पायऱ्यांचा येथे ही वापर करा.

१) वर्ग चाचणीमध्ये १०० विद्यार्थ्यांच्या गुणांच्या माहितीवरून पाचवे दशमक ($D_५$) आणि सातवे दशमक ($D_७$) काढा.

| गुण | ०-१० | १०-२० | २०-३० | ३०-४० | ४०-५० |
|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | १० | १० | ४० | २० | २० |

| गुण | विद्यार्थी संख्या | संचित वारंवारता |
|---|---|---|
| ०-१० | १० | १० |
| १०-२० | १० | २० |
| २०-३० | ४० | ६० |
| ३०-४० | २० | ८० |
| ४०-५० | २० | १०० |
| | $n$ = १०० | |

**पाचव्या दशमकाची ($D_५$) गणना :**

**पायरी – I**

$D_५ = \left(\frac{५n}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_५ = \left(\frac{५ \times १००}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_५ = \left(\frac{५००}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_५$ = ५० च्या पदाचे मूल्य

५० ही संख्या संचित वारंवारता ६० च्या अंतर्गत येते. त्याचा गुण वर्ग २०-३० आहे.

$\therefore l = २० \quad f = ४० \quad cf = २० \quad n = १०० \quad h = १०$

**पायरी – II**

$$D_५ = l + \left(\frac{\frac{५n}{१०} - cf}{f}\right) \times h$$

$$D_५ = २० + \left(\frac{\frac{५ \times १००}{१०} - २०}{४०}\right) \times १०$$

$$D_५ = २० + \left(\frac{\frac{५००}{१०} - २०}{४०}\right) \times १०$$

$$D_५ = २० + \left(\frac{५० - २०}{४०}\right) \times १०$$

$$D_५ = २० + \left(\frac{३०}{४०}\right) \times १०$$

$D_५ = २० + \frac{३००}{४०}$

$D_५ = २० + ७.५$

$D_५ = २७.५$

$\therefore$ **$D_५$ = २७.५**

**सातव्या दशमकाची ($D_७$) गणना :**

**पायरी – I**

$D_७ = \left(\frac{७n}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_७ = \left(\frac{७ \times १००}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_७ = \left(\frac{७००}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य

$D_७$ = ७० च्या पदाचे मूल्य

७० ही संख्या संचित वारंवारता ८० च्या अंतर्गत येते. त्याचा गुण वर्ग ३० – ४० हा आहे.

$\therefore l = ३० \quad f = २० \quad cf = ६० \quad n = १०० \quad h = १०$

**पायरी – II**

$$D_७ = l + \left(\frac{\frac{७n}{१०} - cf}{f}\right) \times h$$

$$D_७ = ३० + \left(\frac{\frac{७ \times १००}{१०} - ६०}{२०}\right) \times १०$$

$$D_७ = ३० + \left(\frac{\frac{७००}{१०} - ६०}{२०}\right) \times १०$$

$$D_७ = ३० + \left(\frac{७० - ६०}{२०}\right) \times १०$$

$$D_७ = ३० + \left(\frac{१०}{२०}\right) \times १०$$

$$D_७ = ३० + \left(\frac{१००}{२०}\right)$$

$D_७ = ३० + ५$

$D_७$ = ३५ गुण

$\therefore$ **$D_७$ = ३५ गुण**

**उत्तर : पाचवे दशमक $D_५$ = २७.५ गुण, पाचवे दशमक $D_७$ = ३५ गुण**

## शतमके (Percentiles) :

ज्या संख्या संपूर्ण निरीक्षणाचे समान शंभर भाग करतात. त्यांना 'शतमके' असे म्हणतात. शतमके ही ९९ असतात. म्हणजेच ९९ बिंदूच्या प्रत्येक मूल्याला शतमके असे म्हणतात. ती $P_१$, $P_२$, ..... $P_{९९}$ अशी दर्शवितात. सर्वसाधारणपणे शतमक काढण्यासाठी संख्याश्रेणी चढत्या क्रमाने मांडली जाते.

अ) वैयक्तिक श्रेणी व खंडित श्रेणी दिलेली असताना शतमके खालील सूत्रानुसार काढली जातात.

$P_k = k\left(\frac{n+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य $\qquad k = १,२,३....९९$

ब) अखंडित वारंवारिता वितरण दिलेले असताना खालील सूत्राचा वापर केला जातो.

$$P_k = l + \left(\frac{\frac{kn}{१००} - cf}{f}\right) \times h \qquad k = १,२,३....९९$$

**P** = शतमक

***l*** = शतमक वर्गाची कनिष्ठ मर्यादा

***f*** = शतमक वर्गाची वारंवारता

***cf*** = शतमक वर्गाच्या आधीच्या वर्गाची संचित वारंवारता

***h*** = शतमक वर्गाची वरिष्ठ मर्यादा – शतमक वर्गाची कनिष्ठ मर्यादा

**अ) वैयक्तिक श्रेणी :** खालील माहितीवरून चाळीसावे शतमक ($P_{४०}$) काढा.

१०, १५, ८, १६, १९, ११, १२, १४, ९

**रीत :** प्रथम दिलेली माहिती चढत्या क्रमाने मांडा.

८, ९, १०,११, १२, १४, १५, १६, १९

$n = ९$

$P_{४०} = ४०\left(\frac{९+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{४०} = ४० \times \left(\frac{१०}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{४०} = \left(\frac{४० \times १०}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{४०} = \left(\frac{४००}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{४०}$ = ४ क्रमांकाची संख्या ११ येते.

$\therefore$ **$P_{४०}$ = ११**

**उत्तर : चाळीसावे शतमक ($P_{४०}$) = ११**

२) खालील माहितीच्या आधारे पंच्याऐंशीवावे शतमक $(P_{८५})$ काढा.

७९, ८२, ३६, ३८, ५१, ७२, ६८, ७०, ६४, ६३

**रीत :** प्रथम संख्या चढत्या क्रमाने मांडू या

३६, ३८, ५१, ६३, ६४, ६८, ७०, ७२, ७९, ८२

पदाची एकूण संख्या $(n)$ = १०

$P_{८५} = ८५\left(\frac{n+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{८५} = ८५\left(\frac{१०+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{८५} = ८५\left(\frac{११}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{८५} = (८५ \times ०.११)$ च्या पदाचे मूल्य

$P_{८५} = (९.३५)$ पदाचे मूल्य

$P_{८५}$ = ९ व्या पदाचे मूल्य + ०.३५ (१० व्या पदाचे मूल्य – ९ व्या पदाचे मूल्य).

$P_{८५} = ७९ + ०.३५\ (८२ - ७९)$

$P_{८५} = ७९ + ०.३५ \times ३$

$P_{८५} = ७९ + १.०५$

$\therefore$ **$P_{८५}$ = ८०.०५**

**उत्तर : पंच्याऐंशीवावे शतमक $(P_{८५})$ = ८०.०५**

## ब) खंडित श्रेणी :

१) खालील सामग्रीवरून $P_{२०}$ आणि $P_{६०}$ शतमके काढा.

| उंची – इंचामध्ये | ५८ | ५९ | ६० | ६१ | ६२ | ६३ | ६४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यक्तींची संख्या | ४ | ५ | ६ | १० | १२ | ०२ | ०१ |

**रीत :** प्रथम संख्या चढत्या क्रमाने मांडू या

| उंची – इंचामध्ये $(x)$ | व्यक्तींची संख्या $(f)$ | संचित वारंवारता $(cf)$ |
|---|---|---|
| ५८ | ४ | ४ |
| ५९ | ५ | ९ |
| ६० | ६ | १५ |
| ६१ | १० | २५ |
| ६२ | १२ | ३७ |
| ६३ | ०२ | ३९ |
| ६४ | ०१ | ४० |
| | $n$ = ४० | |

$P_{२०} = २०\left(\frac{n+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{२०} = २०\left(\frac{४०+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{२०} = २०\left(\frac{४१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{२०} = \left(\frac{२० \times ४१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{२०} = \left(\frac{८२०}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{२०} = ८.२$

८.२ हे ९ या संचित वारंवारतेच्या गटात येते. त्याचे मूल्य ५९ इंच उंची येते.

$\therefore$ **$P_{२०}$ = ५९**

**साठाव्या शतमकाची $(P_{६०})$ गणना :**

$P_{६०} = ६०\left(\frac{n+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{६०} = ६०\left(\frac{४०+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{६०} = ६०\left(\frac{४१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{६०} = \left(\frac{६० \times ४१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{६०} = \left(\frac{२४६०}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

२४.६ हे २५ या संचित वारंवारतेच्या गटात येते. त्याचे मूल्य ६१ इंच उंची येते.

$\therefore$ **$P_{६०}$ = ६१**

**उत्तर : विसावे शतमक $P_{२०}$ = ५९, साठावे शतमक $P_{६०}$ = ६१**

### क) अखंडित श्रेणी :

चतुर्थकासाठी दिलेल्या अखंडीत श्रेणीमधील पायऱ्यांचा येथे ही वापर करा.

१) खालील माहितीवरून पासष्ठावे शतमक ($P_{६५}$) काढा.

| गुण | ०-५ | ५-१० | १०-१५ | १५-२० | २०-२५ |
|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | ३ | ७ | २० | १२ | ०८ |

| गुण | विद्यार्थी संख्या ($f$) | संचित वारंवारता ($cf$) |
|---|---|---|
| ०-५ | ३ | ३ |
| ५-१० | ७ | १० |
| १०-१५ | २० | ३० |
| १५-२० | १२ | ४२ |
| २०-२५ | ८ | ५० |
| | $n = ५०$ | |

**पायरी - I**

$P_{६५} = \left(\frac{६५n}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{६५} = \left(\frac{६५ \times ५०}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{६५} = \left(\frac{३२५०}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{६५} = ३२.५$

३२.५ हा संचित वारंवारतेच्या ४२ मध्ये येतो. याचा गुण वर्ग १५-२० येतो.

$l = १५ \quad f = १२ \quad cf = ३० \quad n = ५० \; h = ५$

**पायरी - II**

$$P_{६५} = l + \left(\frac{\frac{६५n}{१००} - cf}{f}\right) \times h$$

$$P_{६५} = १५ + \left(\frac{\frac{६५ \times ५०}{१००} - ३०}{१२}\right) \times ५$$

$$P_{६५} = १५ + \left(\frac{\frac{३२५०}{१००} - ३०}{१२}\right) \times ५$$

$$P_{६५} = १५ + \left(\frac{३२.५ - ३०}{१२}\right) \times ५$$

$$P_{६५} = १५ + \left(\frac{२.५}{१२}\right) \times ५$$

$$P_{६५} = १५ + \left(\frac{२.५ \times ५}{१२}\right)$$

$$P_{६५} = १५ + \left(\frac{१२.५}{१२}\right)$$

$$P_{६५} = १५ + १.०४$$

$$P_{६५} = १६.०४$$

**उत्तर : $P_{६५}$ = १६.०४**

## स्वाध्याय

**प्र. १. योग्य पर्याय निवडा :**

**१) खालील विधाने चतुर्थकासाठी लागू होत नाही.**

अ) प्रथम संख्या चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडून घ्यावी.

ब) यात निरीक्षणाचे समान ४ भाग करता येतात.

क) ते $Q_१$, $Q_२$, $Q_३$ असे सांकेतिक दाखवितात.

ड) $Q_२$ हा सारणीचा मध्यगा असते.

**पर्याय :** १) अ   २) ब आणि क   ३) अ, ब आणि क   ४) यापैकी नाही

**२) खालील सारणीचे सातवे दशमक ($D_७$) कोणते?**

सारणी - ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२

**पर्याय :** १) ७   २) ९   ३) १०   ४) १२

**३) कोणती विधाने बरोबर ते निवडा.**

अ) शतमकात सारणीचे १०० समान भाग करून एकूण ९९ बिंदू येतात.

ब) दशमकाचे एकूण ९ भाग होतात.

क) चतुर्थके $Q_१$, $Q_२$, $Q_३$ असे दर्शविली जातात.

ड) शतमक आणि दशमक अनुक्रमे P आणि D ने दर्शवितात.

**पर्याय :** १) अ आणि क   २) अ आणि ब   ३) अ, ब आणि क   ४) अ, क आणि ड

**प्र.२. योग्य पर्यायांची जोडी ओळखा :**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) चतुर्थक | अ) $D_j = j\left(\frac{n+१}{१०}\right)$ च्या पदाचे मूल्य |
| २) दशमक | ब) $P_k = l + \left(\frac{\frac{kn}{१००} - cf}{f}\right) \times h$ |
| ३) शतमक | क) $Q_i = l + \left(\frac{\frac{in}{४} - cf}{f}\right) \times h$ |

**पर्याय :** १) १-ब, २-क, ३-अ २) १-क, २-अ, ३-ब

३) १-क, २-ब, ३-अ ४) १-अ, २-ब, ३-क

**प्र. ३. अर्थशास्त्रीय परिभाषिक शब्द सांगा :**

१) समान भागांमध्ये माहितीचे/आकडेवारीचे विभाजन करण्याची प्रक्रिया....

२) जे मूल्य दिलेल्या सामग्रीचे दहा समान भागांमध्ये विभागणी करते....

३) जे मूल्य संपूर्ण निरीक्षणाचे चार समान भागांमध्ये विभागणी करते....

**प्र. ४. खालील उदाहरणे सोडवा :**

१) खालील आकडेवारी वरून पहिले चतुर्थक ($Q_१$), चौथे दशमक ($D_४$) व सव्वीसावे शतमक ($P_{२६}$) काढा.

१८, २४, ४५, २९, ४, ७, २८, ४९, १६, २६, २५, १२, १०, ९, ८

२) खालील आकडेवारी वरून तिसरे चतुर्थक ($Q_३$), पाचवे दशमक ($D_५$) आणि पस्तीसावे शतमक ($P_{३५}$) काढा.

| उत्पन्न (₹) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| कुटुंबाची संख्या | २ | ५ | २० | २५ | १५ | १२ |

३) खालील आकडेवारी वरून पन्नासावे शतमक ($P_{५०}$) काढा.

| वेतन (₹) | कामगार संख्या |
|---|---|
| ०-२० | ४ |
| २०-४० | ६ |
| ४०-६० | १० |
| ६०-८० | २५ |
| ८०-१०० | १५ |

४) खालील आकडेवारी वरून तिसरे चतुर्थक ($Q_३$) काढा.

| विक्री संख्या | १०-२० | २०-३० | ३०-४० | ४०-५० | ५०-६० | ६०-७० |
|---|---|---|---|---|---|---|
| उद्योग संख्या | २० | ३० | ७० | ४८ | ३२ | ५० |

५) खालील आकडेवारी वरून सातवे दशमक ($D_७$) काढा.

| नफा (₹) | १०-२० | २०-३० | ३०-४० | ४०-५० | ५०-६० | ६०-७० |
|---|---|---|---|---|---|---|
| उद्योग संख्या | २० | ३० | ७० | ४८ | ३२ | ५० |

६) खालील आकडेवारी वरून पंधरावे शतमक ($P_{१५}$) काढा.

| गुंतवणूक (₹) | ०-१० | १०-२० | २०-३० | ३०-४० | ४०-५० | ५०-६० |
|---|---|---|---|---|---|---|
| उद्योगांची संख्या | ५ | १० | २५ | ३० | २० | १० |

**प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात की नाही ते सकारण स्पष्ट करा :**

१) विभाजन मूल्यांचा वापर फक्त सैद्धांतिकदृष्ट्या केला जातो, परंतु व्यावहारिक दृष्ट्या नाही.

२) सरासरी मूल्य हे प्रातिनिधिक मूल्यांचे अयोग्य प्रतिनिधित्व करू शकते.

३) 'मध्यगेला' 'दुसरे चतुर्थक' असेही म्हणतात.

**प्र. ६. दिलेल्या तक्त्याच्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

| गुण | ३० | १० | २० | ४० | ५० |
|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | १३ | ४ | ७ | ८ | ६ |

१) पहिले चतुर्थक ($Q_१$) आणि तिसरे चतुर्थक ($Q_३$) यांची सुत्रे लिहा.

२) दिलेल्या माहितीच्या आधारे श्रेणीतील शेवटच्या मूल्याची संचित वारंवारिता शोधा.

३) वरील माहितीच्या आधारे एकूण वारंवारिता (n) शोधा.

❖❖❖

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. लोकांच्या संघटित प्रयत्नामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला एक वेगळा दर्जा प्राप्त झाला आहे.




**महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग :**

महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षण पाहणी २०१७-१८ च्या अहवालानुसार, महाराष्ट्र राज्याचे प्रशासकीय कारणांसाठी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर असे सहा महसूल विभाग असून त्यामध्ये ३६ जिल्हे समाविष्ट आहेत.

**महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये :**

१) महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य आहे. राज्याची लोकसंख्या २०११ मध्ये ११.२४ कोटी होती.

२) महाराष्ट्र राज्य भौगोलिकदृष्ट्या देशातील तिसरे मोठे राज्य असून त्याचे क्षेत्रफळ ३.०८ लाख चौ.किमी. आहे.

३) महाराष्ट्र हे नागरीकरण झालेले राज्य असून ४५.२०% लोकसंख्या नागरी भागात राहात आहे.

४) जनगणना २०११ च्या अहवालानुसार महाराष्ट्रातील लिंग-गुणोत्तर प्रमाण दरहजारी पुरुषांमागे ९२९ स्त्रिया इतके आहे.

५) २०११ च्या जनगणनेनुसार राज्याचा साक्षरता दर ८२.३% होता.

६) महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१६-१७ नुसार इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचे स्थूल राज्यांतर्गत उत्पादन (GSDP) आणि दरडोई उत्पन्न (SPCI) सर्वाधिक आहे.

७) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे

i) विपुल नैसर्गिक साधन संपत्ती.
ii) कुशल मनुष्यबळाची उपलब्धता.
iii) अद्ययावत तांत्रिक सुधारणा.
iv) विकसित पायाभूत सुविधा.

८) महाराष्ट्र हे नवनिर्मिती, कौशल्यविकास, गुंतवणूक व पर्यटन यांसाठी लोकप्रिय आहे.

**महाराष्ट्राचा आर्थिक विकास :**




आकृती ४.१ : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

**अ) कृषी क्षेत्र :** कृषी क्षेत्र व संलग्न क्षेत्र राज्याच्या आर्थिक विकासामध्ये प्रमुख भूमिका पार पाडतात. महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार कृषी व संलग्न क्षेत्रातील राज्याचे एकूण उत्पादनाचे मूल्यवर्धित प्रमाण २००१-२००२ मध्ये १५.३ टक्के इतके होते. या तुलनेत २०१६-१७ मध्ये हे प्रमाण १२.२ टक्के इतके कमी झाल्याचे दिसून येते.



आकृती ४.२ : कृषी

**कृषी क्षेत्रातील सर्वसाधारण समस्या :**

i) जमीनधारणेचा कमी आकार व कमी उत्पादकता.
ii) सीमांत अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ.
iii) रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अति वापरामुळे शेतजमिनीची अवनती.
iv) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा
v) भू-सुधारणा कायदा व पीक पद्धती यांची सदोष अंमलबजावणी
vi) कोरडवाहू जमीन आणि जलसिंचन सुविधांचा अभाव.
vii) भांडवलाची कमतरता
viii) ग्रामीण विकास योजनांची अयोग्य अंमलबजावणी.
ix) विपणन व्यवस्थेची कमतरता
x) हवामान बदलांचा परिणाम.

**याचा विचार करा :**

शेतकऱ्याने आपला माल मध्यस्थाशिवाय थेट ग्राहकांना विकल्यास काय होईल?

**महाराष्ट्र आर्थिक पहाणी २०१७-१८ नुसार कृषिक्षेत्राच्या विकासासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना :**

१) वाजवी दरात दर्जेदार बी-बियांणाचे वितरण.
२) खते व कीटकनाशकांच्या वितरण केंद्रात झालेली वाढ.
३) जलसिंचन सोयींचा विकास.
४) शेती पंपांचे विद्युतीकरण व मागणीनुसार वीजपुरवठा.
५) आवश्यकतेनुसार पतपुरवठा.
६) कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC), कृषी उत्पादन निर्यात क्षेत्रे, फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र, प्रभावी वितरणासाठी श्रेणीकरण व बांधणी सुविधांची उपलब्धतता.
७) प्रसार माध्यमांच्या द्वारे कृषिविषयक माहितीचा प्रसार करून कृषी व्यवसाय हा नफा देणारा व्यवसाय आहे अशा दृष्टिकोनाची निर्मिती.

**ब) उद्योग क्षेत्र :** महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य आहे. वार्षिक औद्योगिक पाहणी (ASI)

२०१६-१७ नुसार महाराष्ट्र हे आद्योगिक क्षेत्रात अग्रेसर आहे. महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या आर्थिक विकासात राज्याच्या औद्योगिक क्षेत्राचा मोठा वाटा आहे. उद्योग क्षेत्रामध्ये शेती क्षेत्रातील अतिरिक्त कामगार सामावून घेण्याची क्षमता आहे. यामुळे बाजारांमध्ये विविधता, उच्च उत्पन्न व उच्च उत्पादकता निर्माण होते. भारताच्या निव्वळ मूल्य जमा वर्धित (NVA) उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा सुमारे १८% आहे. प्रादेशिक व विदेशी गुंतवणूकदार महाराष्ट्रातील उद्योगात गुंतवणूक करण्यास प्राध्यान्य देतात.



आकृती ४.३ : उद्योग

**शोधा पाहू :**

महाराष्ट्रातील खालील उत्पादन क्षेत्रांसाठी असणाऱ्या प्रत्येकी पाच उद्योगांची नावे शोधा. उदा. रसायने, अन्नप्रक्रिया, कापडनिर्मिती, माहितीतंत्र, औषध निर्मिती.

### प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (FDI) :

१९९० च्या सुरुवातीस भारत सरकारने विशिष्ट क्षेत्रात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आणण्यास सुरुवात केली. १९९१ च्या उदारीकरणाच्या कायद्याने प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा मार्ग मोकळा झाला. भारतात महाराष्ट्र हे गुंतवणुकीबाबत पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्र राज्य हे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीबाबतीत (FDI) अग्रेसर आहे. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे प्रमाण एप्रिल २००० पासून सप्टेंबर २०१७ पर्यंत ₹ ६,११,७६० कोटी इतके होते. हे प्रमाण भारतातील एकूण प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीच्या ३१% आहे.

### औद्योगिक क्षेत्रातील सर्वसाधारण समस्या :

१) शासकीय दफ्तर दिरंगाई
२) कौशल्य विकासाच्या संधींची कमतरता
३) सुधारित तंत्रज्ञानाचा अभाव.
४) पायाभूत सुविधांचा अभाव.
५) नवीन उद्योजकांना प्रोत्साहनांचा अभाव
६) विकास कार्यक्रमांचा अभाव
७) प्रादेशिक असमतोल

### महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१७-१८ नुसार औद्योगिक विकासाकरिता सरकारने केलेल्या उपाययोजना :

१) संभाव्य गुंतवणूकदारांना सर्व प्रकारच्या मान्यता देण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करण्यात आली.

२) महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा केंद्रामार्फत (MAITRI) - गुंतवणूकदारांना आवश्यक असलेल्या सुविधा व माहिती पुरविली जाते.

३) लघु उद्योगांचा आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभाग वाढावा म्हणून निर्यातीस प्रोत्साहन व जागेच्या भाड्यासाठी अनुदानाची उपलब्धतता करून दिली.

४) औद्योगिक वृद्धीसाठी विशेष आर्थिक क्षेत्राची (SEZ) निर्मिती करण्यात आली.

५) महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास कार्यक्रम (MSICDP) लघु, मध्यम व सूक्ष्म उद्योजकांसाठी सुरू करण्यात आला.

**क) सेवा क्षेत्र :** या क्षेत्रात विमा, पर्यटन, बँकिंग,शिक्षण व सामाजिक सेवा इत्यादींचा समावेश होतो, तसेच व्यावसायिक सेवा व अंतिम ग्राहक सेवा यांचाही समावेश होतो.

सेवा क्षेत्र हे मोठ्या प्रमाणात रोजगार पुरविणारे व वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत या क्षेत्राचे योगदान मोठे आहे. इतर क्षेत्राच्या तुलनेत स्थूल राज्यांतर्गत उत्पादनात (GSDP) सेवा क्षेत्राचे योगदान, सर्वांत जास्त असून २०१७-१८ मध्ये ५४.५% इतके होते.

सेवा क्षेत्राच्या वाढीस चालना देणारे काही प्रमुख उद्योग आहेत त्या मध्ये प्रामुख्याने अर्थतंत्र, माहिती तंत्र IT/ITES, स्टार्टअप्स, क्लाऊड कॉम्प्युटींग, वीजे वरील वाहने, संरक्षण, पर्यटन व खाजगी विद्यापीठे होय. शासनातर्फे सेवा क्षेत्रातील वाढ द्वितीय श्रेणीच्या शहरामध्येही करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेतलेले आहेत.

**करून पहा :**

मागील परिच्छेदातील सेवांचे वर्गीकरण व्यावसायिक व अंतिम ग्राहक सेवांमध्ये करा.

## सेवा क्षेत्राचे मुख्य घटक :

**• पायाभूत संरचना :**

आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधा या अत्यंत गरजेच्या आहेत. सशक्त पायाभूत सुविधा या राज्याच्या सामाजिक आर्थिक विकासाची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे इतर राज्यांच्या तुलनेत अधिक गुंतवणूकदार आकर्षित होऊन स्पर्धात्मक वातावरणाची निर्मिती होते. पुरेशा पायाभूत सुविधा या वेगवान व शाश्वत आर्थिक वृद्धीसाठी अत्यंत गरजेच्या आहेत.

**पायाभूत सुविधांचे वर्गीकरण**




**अ) आर्थिक पायाभूत सुविधा :** आर्थिक पायाभूत सुविधांमुळे विकासासाठी वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण करणे सोयीचे होते.

### आर्थिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी योजलेले उपाय :

१) वीजनिर्मितीची क्षमता वाढविणे.

२) ग्रामीण विद्युतीकरण, नेटवर्क सुधारणा, ऊर्जा संवर्धनासाठी कार्यक्रम.

३) राज्यातील ग्राहकांना सुधारित एल.पी.जी. गॅस योजनांचा थेट लाभ.

४) राज्यात रस्ता विकास योजनेची (२००१-२०२१) अंमलबजावणी झाली असून ३.३ लाख कि. मी. रस्ते विकसित करणे हे या योजनेचे लक्ष्य आहे.

५) मुंबई, नागपूर येथे मेट्रो रेल्वे सुरू झाली आहे.

६) बंदरांच्या सर्वांगीण विकासाकरिता महाराष्ट्र बंदर विकास धोरण सुरू करण्यात आले. या धोरणांतर्गत केंद्रशासनाच्या सागरमाला कार्यक्रमाला प्रोत्साहन दिले आहे.

७) ३० सप्टेंबर २०१७ रोजी महाराष्ट्रात नोंदणीकृत इंटरनेट ग्राहकांची संख्या ५.४५ कोटी इतकी असून हे प्रमाण इतर राज्यापेक्षा सर्वाधिक आहे.

**ब) सामाजिक पायाभूत सुविधा :**

सामाजिक पायाभूत सुविधा हा अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे कारण मानवी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच आर्थिक विकासाला गती देण्यासाठी त्याची आवश्यकता असते. केवळ दर्जा सुधारणेच नव्हे तर ज्ञानसंवर्धनासाठीही त्यांची गरज असते. सामाजिक पायाभूत सुविधांतर्गत साक्षरता अभियान कार्यक्रम, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, गृहनिर्माण, पिण्याचा पाण्याचा पुरवठा आणि स्वच्छता सुविधा इत्यादींचा समावेश होतो.

### सामाजिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी योजलेले उपाय :

**१) शिक्षण :**

शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज आहे. कुठल्याही देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा शिक्षण हा कणा आहे. तसेच मानवी संसाधनाच्या विकासासाठी (HRD) तो आत्यंतिक महत्त्वाचा घटक आहे. सद्यस्थितीत भारतात तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. लोकसंख्येच्या ह्या लाभांशामुळे शिक्षणाला प्राधान्य देणे राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर गरजेचे ठरते. भारतात शिक्षणाचे चार स्तर आहेत.

१) प्राथमिक २) माध्यमिक

३) उच्च माध्यमिक ४) उच्च शिक्षण

**अ) प्राथमिक शिक्षण :** महाराष्ट्र राज्य सरकारने केंद्र सरकारच्या सर्व शिक्षा अभियानांतर्गत (SSA) ६ ते १४ वयोगटांतील मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (RTE) प्रदान केला आहे. २०१६-१७ या आर्थिक वर्षात प्राथमिक शिक्षणावरील राज्य सरकारचा खर्च ₹ १९,४८६ कोटी इतका होता.

**प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ली ते ८ वी) शैक्षणिक संस्था व नोंदणी**

| वर्ष | शाळांची संख्या | एकूण नोंदणी (लाखात) | शिक्षक संख्या (लाखात) | शिक्षक विद्यार्थी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | १०,४९७१ | १५९.८६ | ५.३० | ३०:१ |

**संदर्भ :** महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१७-१८

**ब) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण :** माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारावा तसेच प्रवेश संख्या वाढावी या उद्‌देशाने राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाची (RMSA) सुरुवात २००९ मध्ये करण्यात आली. २०१६-१७ मध्ये राज्य सरकारचा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च ₹ १६,०८९ कोटी इतका होता.

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण (इयत्ता ९ वी ते १२ वी) शैक्षणिक संस्था व नोंदणी**

| वर्ष | शाळांची संख्या | एकूण नोंदणी (लाखात) | शिक्षक संख्या (लाखात) | शिक्षक विद्यार्थी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | २५,७३७ | ६६.१५ | २.१३ | ३१:१ |

**संदर्भ :** महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१७-१८

**क) उच्च शिक्षण :** प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा बरोबरच महाराष्ट्र सरकार उच्च शिक्षणाच्या संधी विस्तारण्यासाठी प्रयत्नशील आहे. उच्च शिक्षणामुळे सुधारीत तंत्र व कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी मदत झाली आहे. उच्च शिक्षण देण्यासाठी २२ विद्यापीठे असून त्यांपैकी ४ कृषी विद्यापीठे, १ आरोग्यविज्ञान विद्यापीठ, पशु- वैद्यकीय विद्यापीठ, १ तंत्रज्ञान विद्यापीठ व १५ सामान्य विद्यापीठे आहेत. याशिवाय २१ अभिमत विद्यापीठे, १ केंद्रीय विद्यापीठ, ४ खाजगी अभिमत विद्यापीठे व राष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या महत्त्वाच्या ५ संस्था राज्यात आहेत.

राज्याने उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाची आव्हाने पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ अधिनियमित केला. उच्च शिक्षणात लोकशाही तत्वाचा वापर करून शैक्षणिक स्वायत्तता, गुणवत्तापूर्ण व कौशल्याधिष्ठित शिक्षण यांचा समावेश करणे हे या कायद्याचे प्रमुख ध्येय आहे.

राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत संशोधन, नवोपक्रम, गुणवत्तापूर्ण सुधारणा, नवोन्मेष व आधुनिक तंत्र संकुलाची स्थापना यासाठी २० कोटी रूपयांचे अनुदान मिळविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. भारत सरकारने २०१३ साली उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) सुरू केले.

**ड) इतर :**

**१) सर्वसमावेशक शिक्षण :** विशेष गरजांची तरतूद व गुणात्मक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्‌देशाने विशेष दिव्यांगासाठी सर्वसमावेशक कार्यक्रमाची राज्य सरकारने अंमलबजावणी केली.

**२) मुलींचे शिक्षण :** मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन मिळावे म्हणून उच्च माध्यमिक स्तरापर्यंत मोफत शिक्षण, ग्रामीण भागातील मुलींना एस.टी. प्रवास मोफत सेवा, शाळेपासून ५ किलोमीटर अंतरापर्यंत राहणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप यांसारख्या योजना महाराष्ट्र शासनाने राबविल्या आहेत.

**३) प्रौढ साक्षरता :** प्रौढ साक्षरता वाढावी म्हणून प्रत्येकासाठी शिक्षण, साक्षर भारत अभियान यांसारख्या योजना लोकांच्या सहभागातून राज्य सरकारच्या पुढाकाराने राबविण्यात आल्या.

**४) आदिवासींचे शिक्षण :** राज्याचा कक्षेत येणाऱ्या आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने निवासी आश्रम शाळा सुरू केल्या. आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत निवासाची सुविधा, आहार, गणवेश, शैक्षणिक साहित्य आणि अन्य सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत. राज्यात सध्या ५५६ अनुदानीत आश्रम शाळा आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे म्हणून सरकारने विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**शोधा पाहू :**

खालील अभियानाची सांकेतिक चिन्हे (Symbol)

- सर्व शिक्षा अभियान - SSA
- राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान - RMSA
- प्रौढ साक्षरता अभियान - ALM



### २) आरोग्य सेवा :

३१ मार्च २०१७ पर्यंत महाराष्ट्रामध्ये एकूण १८१४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३६० सार्वजनिक आरोग्य केंद्रे होती. महाराष्ट्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) आणि राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यावर भर दिला. या कार्यक्रमांतर्गत सुरक्षित

पेयजल, पोषक आहार, आरोग्य आणि स्वच्छता या बाबींवर सर्वांत जास्त भर दिला आहे. महाराष्ट्र सरकारने व्यापक आरोग्य सेवा पुरविण्यासाठी त्रिस्तरीय पायाभूत सुविधांची निर्मिती केली.

प्राथमिक स्तरावर प्राथमिक आरोग्य केंद्रे व सार्वजनिक आरोग्य केंद्र. दुय्यम स्तरावर उपजिल्हा रुग्णालये व जिल्हा रुग्णालय यांचा समावेश असतो.

तृतीय स्तरावर सुसज्ज वैद्यकीय महाविद्यालये व प्रमुख शहरांतील सुपर स्पेशॅलिटी दवाखाने इत्यादींचा समावेश होतो.

### • पर्यटन :

महाराष्ट्रात वेगवेगळ्या राज्यातून पर्यटक व विदेशी पर्यटक आकर्षित होतात. महाराष्ट्रात पर्यटनाचा विकास व्हावा म्हणून राज्य सरकारने महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६ अंमलात आणले.

**पर्यटन धोरणात खालील उदि्दष्टांचा समावेश होतो :**

- २०२५ पर्यंत महाराष्ट्राला अग्रगण्य पर्यटन स्थळ बनिवणे.
- पर्यटनातील गुंतवणूकदारांना आकर्षित करून ₹ ३०,००० कोटीपर्यंत रक्कम वाढविणे.
- पर्यटन उद्योगामध्ये दहा लाख अधिक रोजगारांची निर्मिती करणे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ही एक नोडल संस्था असून ती या धोरणाची अंमलबजावणी करते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) विविध कार्यक्रम आयोजित करते उदा. वेरूळ महोत्सव (एलोरा फेस्टिवल), घारापुरी महोत्सव (एलीफंटा फेस्टीवल) इत्यादी.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून (MTDC) 'महाभ्रमण' ही योजना कार्यान्वीत करण्यात आली. या अंतर्गत कृषी पर्यटन, ग्रामीण पर्यटन, अन्न पर्यटन, वन विहार, आदिवासी जीवनशैली इत्यादी प्रकल्प एकाच अधिपत्याखाली राबविले जातात.

### • आतिथ्य सेवा :

आतिथ्य सेवा उद्योग हा इतर उद्योगांपेक्षा खूप विस्तारित आहे. महाराष्ट्रात आतिथ्य सेवा झपाट्याने वाढण्याचे कारण पर्यटन क्षेत्रात होणारी वाढ हे आहे. ह्या उद्योगाचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे ग्राहकाचे समाधान. उपहारगृह हे आतिथ्य उद्योगाचा एक भाग असून पर्यटकांना वाहतुकीची सेवा पुरवतात. तसेच हवाई प्रवास, जलप्रवास मुंबई-गोवा (क्रूझशीप), आरामदायी आणि अलिशान रेल्वे प्रवास (डेक्कन ओडिशी), उपहार गृह, सामान्य पर्यटन व कार्यक्रमांचे व्यवस्थापन इत्यादी सेवा पुरवितात.

### • मनोरंजन उद्योग :

जगाच्या तुलनेत भारतामध्ये सर्वांत जास्त चित्रपट निर्मिती केली जाते. यात महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका आहे. महाराष्ट्रातील मनोरंजन क्षेत्र अनेकांना रोजगार संधी उपलब्ध करून देते. कोल्हापूर हे शहर विशेष प्रादेशिक सिनेमासाठी प्रसिध्द आहे. जागतिक सिनेमा उद्योगात मुंबई 'बॉलिवूड' म्हणून प्रसिद्ध असलेले शहर आहे.

### महाराष्ट्रातील सहकार चळवळ :

सहकार चळवळ हे महाराष्ट्राने देशाला दिलेले एक मोठे योगदान आहे.



आकृती ४.४ : सहकार चळवळ

महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी सहकार चळवळ हे एक प्रभावी साधन आहे. सहकारी संस्थांची प्रमुख तत्त्वे ही स्वयंसहाय्यता, लोकशाही, समता व एकता इत्यादींना प्रोत्साहन देणारी आहेत.

सुरुवातीला महाराष्ट्रात सहकार चळवळ ही मुख्यत्वे कृषी क्षेत्रातील पतपुरवठ्यापर्यंत मर्यादित होती, परंतु नंतर इतर क्षेत्रातही या चळवळीचा विस्तार झाला. उदा.

- कृषी प्रक्रिया
- कृषी विपणन
- सहकारी साखर कारखाने
- मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था
- सहकारी दूध उत्पादक संस्था
- कापड उद्योग

- गृहनिर्माण सहकारी संस्था
- ग्राहक भांडारे

३१ मार्च २०१७ नुसार राज्यात १.९५ लाख सहकारी संस्था असून त्यांचे ५.२५ लाख सभासद आहेत.

## स्वाध्याय

**प्र. १. अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सांगा :**

१) परकीय/विदेशी कंपन्यांनी आपल्या देशात केलेली गुंतवणूक

२) लघु, मध्यम आणि सूक्ष्म उद्योजकांसाठी सुरू करण्यात आलेला विकास कार्यक्रम.

३) आर्थिक विकासासाठी वस्तू व सेवांचे उत्पादन व विभाजन सुलभ करणे.

४) स्वयंसाहाय्यतेचे मूल्य प्रोत्साहित करणे, लोकशाही, समता आणि एकता जपणे.

**प्र.२. विसंगत शब्द ओळखा :**

१) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, कोरडवाहू जमीन, भांडवलाची कमतरता, अभियांत्रिकी.

२) पर्यटन, बँकिंग, वाहन उत्पादन, विमा.

३) पुणे, हैद्राबाद, नाशिक, नागपूर.

४) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC), महाराष्ट्र उद्योग व्यापार व गुंतवणूक सुलभ केंद्र (MAITRI), विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC).

५) प्राथमिक शिक्षण, आतिथ्य सेवा, उच्च शिक्षण, कौशल्यधिष्ठित शिक्षण.

**प्र.३. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :**

१) यंत्रमानव तंत्रातील संशोधनासाठी जपानने भारतात एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.

२) प्राजक्ता व तिचे कुटुंब दिवाळीच्या सुट्टीत आठ दिवस समुद्र किनारी फिरण्यासाठी गेले.

३) लातूरचा प्रविण मुंबई येथे चित्रपटसृष्टीत तंत्रज्ञ म्हणून काम करतो.

४) चंद्रपूरची राणीगोंद ही मुंबई-गोवा जहाजावर (क्रुझशीप) जहाजसुंदरी म्हणून काम करते.

**प्र.४. फरक स्पष्ट करा :**

१) आर्थिक पायाभूत सुविधा आणि सामाजिक पायाभूत सुविधा.

२) शेती क्षेत्र आणि सेवा क्षेत्र.

३) पर्यटन आणि आतिथ्य सेवा.

४) शिक्षण आणि आरोग्य सेवा.

**प्र. ५. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची भूमिका स्पष्ट करा.

२) महाराष्ट्रातील कृषीक्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र सरकारने केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

३) महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रातील समस्या स्पष्ट करा.

४) महाराष्ट्रातील सामाजिक पायाभूत सुविधांमधील विकासासाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

**प्र. ६. खालील उतारा वाचून काळजीपूर्वक खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

आधुनिक युगाची कास धरत देशातील ग्रामीण भाग हायस्पीड ब्रॉडबँड इंटरनेट सेवेच्या माध्यमातून जोडण्यासाठी केंद्र शासनाने 'भारतनेट' हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. देशातील एक लाखाहून अधिक ग्रामपंचायती 'भारतनेट' च्या पहिल्या टप्प्यात हायस्पीड ब्रॉडबँडव्दारे जोडण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतींना हायस्पीड ब्रॉडबँडव्दारे जोडण्याच्या कामात महाराष्ट्र उत्कृष्ट राज्य ठरले आहे. १२ हजार ३७८ ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्राबरोबर उत्तरप्रदेश (पूर्व), मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान आणि झारखंड ही राज्येसुध्दा भारत नेटच्या पहिल्या टप्प्यात उत्कृष्ट ठरली आहेत.

१) केंद्र शासनाने 'भारतनेट' हा कार्यक्रम का हाती घेतला ?

२) देशातील किती ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध झाली आहे ?

३) महाराष्ट्राशिवाय इतर कोणती राज्ये भारतनेट मध्ये उत्कृष्ट ठरली आहेत ?

४) 'इंटरनेटमुळे जग जवळ आले आहे' याबद्दल तुमचे मत सांगा.

## प्रस्तावना :

भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्था आहे. देशाची आर्थिक वृद्धी ही ग्रामीण विकासाला गतिशील करते. भारत हा खेड्यांचा देश आहे. ग्रामीण विकास हा विकासाच्या विस्तृत संकल्पनेचा एक महत्वाचा घटक आहे. ग्रामीण विकासाचा अर्थ ग्रामीण भागाचा एकूण विकास ज्यामुळे जीवनमानाच्या गुणवत्तेत सुधारणा होते. २०११ च्या जनगणनेनुसार, देशातील ग्रामीण लोकसंख्या ८३.२५ कोटी (एकूण लोकसंख्येतील ६८.८%) इतकी आहे. ग्रामीण विकास हा सर्वसाधारणपणे दारिद्र्याचे निर्मूलन करणारा सर्वसमावेशक व शाश्वत असावा.

## ग्रामीण विकास :

'ग्रामीण विकास' या संकल्पनेचा उदय कृषी क्षेत्राशी निगडित असून भारतातील दीर्घकालीन कृषी विकासाशी संबंधित आहे.




## जागतिक बँकेने केलेली व्याख्या :

ग्रामीण विकास ही एक अशी व्यूहरचना आहे की ज्यामुळे ग्रामीण भागातील विशिष्ट लोकांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावण्यास मदत होते. उदरनिर्वाहाची पातळी उंचावण्यास मदत होते. यामध्ये कूळ, अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर इत्यादींचा समावेश होतो.

**ग्रामीण लोकसंख्येचे व्यावसायिक वर्गीकरण**




**अ) कृषी क्षेत्र :** भारतातील ग्रामीण लोकसंख्येचे कृषी क्षेत्रात विभाजन होते. तसेच शेती व संलग्न उपक्रमात विभागणी होते. शेतीमध्ये अल्पभूधारक, सीमांत शेतकरी व मोठ्या शेतकऱ्यांचा समावेश होतो. शेतीशी संबंधित क्षेत्रात वृक्षारोपण, वनीकरण, मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय आणि बागायती शेती यांचा समावेश होतो.

**ब) औद्योगिक क्षेत्र :** औद्योगिक क्षेत्र म्हणजे कच्च्या मालावर प्रक्रिया करून वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या आर्थिक क्रियांचा समावेश असणारे क्षेत्र होय. याचे वर्गीकरण लघुउद्योग, कुटीरोद्योग व ग्रामीण उद्योग या प्रकारे आहे.

**क) सेवा क्षेत्र :** या क्षेत्राला तृतीय क्षेत्र असे म्हटले जाते. त्यामध्ये व्यापार व अंतिम ग्राहक सेवांचा समावेश होतो. उदा. लेखाकर्म सेवा (Accounting), व्यापार सेवा, संगणक सेवा, उपहारगृह, पर्यटन, तसेच किरकोळ व घाऊक व्यापार, वाहतूक यंत्रणा इत्यादी.

## भारतातील ग्रामीण विकास :

भारतात ग्रामीण विकासासाठी सरकारी व निमसरकारी स्तरावर विविध योजना व धोरणे राबविली आहेत. ग्रामीण विकासाच्या व्यूहरचनेमुळे देशात आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास शक्य होईल.

## ग्रामीण विकासाचे महत्त्व :

**१) सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता :** आरोग्य आणि स्वच्छताविषयक सेवा-सुविधा, शुद्ध पाणीपुरवठा, आणि माफक आरोग्यविषयक सुविधांमुळे ग्रामीण विकासात सुधारणा होतात. यामुळे ग्रामीण भागातील जीवनमानाचा स्तर उंचावला जातो.

**२) ग्रामीण साक्षरता प्रमाण :** सामाजिक व आर्थिक बदल घडविण्यासाठी साक्षरता हे अत्यंत महत्वाचे साधन आहे. नागरी व ग्रामीण भागात साक्षरतेच्या प्रमाणात फारच मोठी तफावत आढळते. ग्रामीण विकासाच्या माध्यमातून विविध

शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी करून ही तफावत कमी करता येते.

३) **महिला सक्षमीकरण :** ग्रामीण विकासाद्‌वारे लिंग भेदभाव कमी करणे, ग्रामीण महिलांच्या विविध गरजांची पूर्तता करणे, सामाजिक विकासाच्या कार्यक्रमात महिलांचे योगदान वाढविणे इत्यादींमुळे महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन मिळते.

४) **कायदा आणि सुव्यवस्थेची अंमलबजावणी :** सामाजातील वंचित गटांच्या अधिकारांची सुरक्षा ग्रामीण विकासामुळे साध्य करता येते. ग्रामीण विकासामुळे कायदा आणि सुव्यवस्थेची योग्य प्रकारे अंमलबजावणी करता येते.

५) **भू-सुधारणा :** ग्रामीण विकासांतर्गत भू-सुधारणा कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी करता येते. उदा. कमाल भू-धारणा, जमिनीची मालकी, खंडाबाबतचे नियमन व भूधारकाची सुरक्षा यांमुळे ग्रामीण भागातील विषमता कमी करता येते.

६. **पायाभूत सुविधांचा विकास :** ग्रामीण विकासाद्‌वारे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करता येतात. विशेषतः वीजपुरवठा, रस्ते विकास, जलसिंचनाच्या सोई इत्यादी.

७) **पतपुरवठ्याची उपलब्धता :** ग्रामीण विकासांतर्गत वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांमध्ये वाढ करता येते. ज्यामुळे ग्रामीण भागात वित्त/पतपुरवठा सुलभतेने होऊ शकतो. उदा. प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्था, सहकारी बँक इत्यादी. या संस्थांद्‌वारे शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात पतपुरवठा करणे शक्य होते.

८) **दारिद्र्य निर्मूलन :** ग्रामीण विकासाद्‌वारे व्यक्तीचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्यास मदत होते. यामुळे ग्रामीण भागातील दारिद्र्याचे निर्मूलन करणे शक्य होते.





**आकृती ५.१ : कृषी क्षेत्रातील बदल**

### भारतातील कृषी पतपुरवठा :

कृषीमधील उत्पादन वाढीसाठी कृषी क्षेत्राला दिला जाणारा पतपुरवठा हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुबलक व वेळेत वित्तसहाय्य मिळण्यासाठी शेतीविषयक धोरणांमध्ये वेळोवेळी पुनर्रचना केली आहे. ग्रामीण पतपुरवठा प्रक्रियेत असे गृहीत धरले आहे की, बहुतांश भारतीय ग्रामीण कुटुंबाकडे बचतीचा अभाव असून शेती व इतर आर्थिक कार्यासाठी पुरेसा वित्तपुरवठा नसतो.




### कृषी पतपुरवठ्याचे प्रकार :

कृषी क्षेत्रातील पतपुरवठ्याचे वर्गीकरण खालील गोष्टीवर आधारित आहे.

१) **कालावधीनुसार कृषी पतपुरवठा :** हे कालावधीनुसार दिले जाणारे कर्ज असून याचे तीन प्रकारे वर्गीकरण केले जाते.

अ) **अल्पकालीन पतपुरवठा :** हे कर्ज दोन वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी दिले जाते. शेतकऱ्यांच्या तत्कालीन गरजांसाठी हे कर्ज दिले जाते. उदा. खते, दर्जेदार बी-बियाणे खरेदी, धार्मिक व सामाजिक समारंभ इत्यादी.

**ब) मध्यमकालीन पतपुरवठा :** हे कर्ज दोन ते पाच वर्षापर्यंत दिले जाते. हे कर्ज जमिनीत सुधारणा करणे, पशुधन व शेतीची उपकरणे खरेदी करणे, कालवा बांधणी, नाला (Canal) बंडिंग इत्यादी वित्तीय गरजांसाठी दिले जाते.

**क) दीर्घकालीन पतपुरवठा :** हे कर्ज पाच वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी दिले जाते. सामान्यत: ट्रॅक्टर खरेदी करणे, जमिनीवरील कायमस्वरूपी सुधारणा करणे इत्यादींसाठी दिले जाते.

**२) हेतूनुसार कृषी पतपुरवठा :** विशिष्ट हेतूनुसार दिले जाणारे कर्ज असून याचे दोन प्रकारे वर्गीकरण केले जाते.

**अ) उत्पादक :** उत्पादक कर्ज हे शेतीतील उत्पादनाशी संबंधित असून आर्थिकदृष्ट्या न्याय्य असतात. उदा. ट्रॅक्टर, जमीन, बियाणे इत्यादी खरेदी करणे.

**ब) अनुत्पादक :** अनुत्पादक कर्ज हे वैयक्तिक उपभोगासाठी असून त्याचा उत्पादक उपक्रमाशी संबंध नसतो. उदा. लग्न कार्यासाठी खर्च, धार्मिक सण-समारंभासाठी खर्च इत्यादी.

### भारतातील कृषी पतपुरवठ्याचे मार्ग :

१) बिगर संस्थात्मक मार्ग

२) संस्थात्मक मार्ग

**१) बिगर संस्थात्मक मार्ग :** भारतातील ग्रामीण पतपुरवठ्यामध्ये, बिगर संस्थात्मक वित्त हा एक महत्त्वपूर्ण घटक असून, जवळजवळ भारतातील ४०% पतपुरवठा हा बिगर संस्थात्मक आहे. बिगर संस्थात्मक कर्जाचा व्याजदर खूप उच्च असतो. जमीन व इतर संपत्ती तारण म्हणून ठेवली जाते. बिगर संस्थात्मक मार्ग खालीलप्रमाणे आहेत.

**अ) सावकार :** ग्रामीण भागात सावकारी हा सर्वसामान्य व्यवसाय आहे. सावकार भरपूर व्याज दराने कर्ज देतात व शेतकऱ्यांची जमीन तारण ठेवतात.

**ब) इतर वैयक्तिक मार्ग :**

अ) व्यापारी, जमीनदार, अडते इत्यादी.

ब) नातेवाईक, मित्रमंडळी इत्यादी कडून घेतले जाणारे कर्ज.

**२) संस्थात्मक मार्ग :** कृषी पतपुरवठा करण्यासाठी संस्थात्मक मार्ग हे एक प्रगतिशील धोरण आहे. वेळेत व मुबलक प्रमाणात पतपुरवठा करणे, शेतीतील उत्पादन व उत्पादनक्षमता वाढवणे हे प्रमुख धोरण आहे. संस्थात्मक मार्गाने लहान व किरकोळ शेतकऱ्यांना आणि इतर दुर्बल घटकांना कर्ज उपलब्ध करून देणे, तसेच आधुनिक तंत्रज्ञान व आधुनिक शेती पद्धती हा या धोरणाचा प्रमुख भाग आहे.

भारतातील कृषी पतपुरवठा करणाऱ्या काही संस्था खालीलप्रमाणे

**अ) राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड – NABARD) :** कृषी व ग्रामीण विकासाला वित्तपुरवठा करणारी नाबार्ड ही सर्वोच्च वित्तसंस्था आहे. नाबार्डची स्थापना १२ जुलै १९८२ रोजी झाली. नाबार्डचे सुरुवातीचे भांडवल ₹ १०० कोटी असून त्यामध्ये भारत सरकार व मध्यवर्ती बँक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) चे ५०:५० असे योगदान आहे. ही एक सर्वोच्च संस्था असून शेती, लघु उद्योग, कुटीर व ग्रामीण उद्योग, हस्तव्यवसाय इत्यादींच्या विकासाला प्रोत्साहन देते.

३१ मार्च २०१८ रोजी नाबार्डचे भांडवल ₹१०,५८० कोटी इतके होते. भारत सरकार आणि मध्यवर्ती बँक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) यांच्यातील भागभांडवलाच्या रचनेनुसार नाबार्ड ही एक पूर्णपणे भारत सरकारच्या आधिपत्याखालील संस्था आहे.

**ब) ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्था :** ग्रामीण पतपुरवठा हा अल्पकालीन सहकारी पतसंस्था व दीर्घकालीन सहकारी पतसंस्था यांत विभागला आहे.

**१) अल्पकालीन सहकारी पतसंस्था :** अल्पकालीन पतसंस्था या अल्पकाळासाठी कर्ज पुरवितात. त्यांची त्रिस्तरीय रचना खालीलप्रमाणे आहे.

- प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS)
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (DCCB)
- राज्य सहकारी बँक (SCB)

२) **दीर्घकालीन ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्था :** या सहकारी संस्था शेतकऱ्यांना दीर्घकालीन पतपुरवठा करून त्यांच्या गरजा पूर्ण करतात. या संस्था दोन स्तरांवर कार्य करतात.

- **प्राथमिक सहकारी शेती व ग्रामीण विकास बँक :** या बँका स्वतंत्रपणे ग्रामीण पातळीवर कार्य करतात.
- **राज्य सहकारी शेती व ग्रामीण विकास बँका (SCB) :** या बँका त्यांच्या शाखांद्वारे राज्य पातळीवर खेड्यांमध्ये कार्य करतात.

**क) व्यापारी बँका (CBs):** व्यापारी बँका ग्रामीण भागांत आपल्या शाखा स्थापन करून ग्रामीण पतपुरवठा करण्याचे काम करतात.

**ड) प्रादेशिक ग्रामीण बँका (RRBs) :** प्रादेशिक अधिनियम, १९७६ अंतर्गत प्रादेशिक ग्रामीण बँकांची निर्मिती करण्यात आली. या विशिष्ट बँका असून ग्रामीण भागातील दुर्बल घटकांच्या गरजा पूर्ण करतात. प्रादेशिक ग्रामीण बँका ग्रामीण भागात स्थापन झालेल्या व व्यापारी बँकांचे व्यावसायिक अनुशासन असलेल्या बँका आहेत.

**इ) सूक्ष्म वित्तपुरवठा संस्था (MFIs) :** सूक्ष्म वित्तपुरवठा संस्था या सवलतीच्या व्याजदराने ग्रामीण पतपुरवठा करतात, परंतु कर्ज पद्धतीत कमी उत्पादकता, कर्ज मिळण्यासाठी विलंब, कर्ज प्रक्रिया खर्च या सर्व कारणांमुळे लहान शेतकऱ्यांना या सवलतीच्या कर्जाचा लाभ घेता येत नाही. म्हणून अशासकीय संस्थांनी १९७० पासून (NGOs) दुर्बल घटकांना कुटुंबांना कर्ज पुरवठा करण्याचे पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिले आहेत.

**शोधा पाहू :**

नाबार्डच्या अलीकडच्या कामगिरीची माहिती मिळवा.

## स्वाध्याय

**प्र.१. खालील विधाने पूर्ण करा :**

**१) ग्रामीण पतपुरवठा महत्वपूर्ण मानला जातो, कारण .....**

अ) ग्रामीण भागातील उत्पन्न वाढण्यास मदत होते.

ब) बचतीचा अभाव असून शेती व इतर आर्थिक कार्यासाठी पुरेसा वित्तपुरवठा नसतो.

क) यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होतो.

ड) ग्रामीण भागातील असमानता कमी होते.

**२) उत्पादक कर्ज ही आर्थिकदृष्ट्या न्याय्य असतात, कारण .....**

अ) ते शेती उत्पादनाशी संबंधित आहे.

ब) त्याचा वापर वैयक्तिक उपभोगासाठी केला जातो.

क) ते दारिद्र्य निर्मूलनास मदत करतात.

ड) ते जीवनमान दर्जा उंचावण्यास मदत करतात.

**३) छोटे शेतकरी बँकांकडून देण्यात येणाऱ्या कर्जासाठी अपात्र ठरतात, कारण .....**

अ) सावकारांची उपस्थिती

ब) ग्रामीण भागात बँकांच्या शाखा नसणे.

क) उच्च व्यवहार खर्च/प्रक्रिया खर्च जास्त

ड) मोठ्या शेतकऱ्यांना प्राधान्य

**४) सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचे हक्क सुरक्षितपणे संरक्षित केले जाऊ शकतात कारण .....**

अ) महिला सक्षमीकरण

ब) कायदा आणि सुव्यवस्थेची अंमलबजावणी

क) पायाभूत सुविधांच्या सुधारणा

ड) जीवनमान दर्जा उंचावणे.

**५) ग्रामीण लोकांचा जीवनमान दर्जा सुधारला जाऊ शकतो, कारण .....**

अ) स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य आणि स्वच्छता इत्यादी सुविधा पुरविणे/देणे.

ब) भू-सुधारणा कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी

क) अनुदाने उपलब्ध करून देणे.

ड) ग्रामीण असमानता कमी करणे.

**प्र. २. चुकीची जोडी शोधा :**

१)

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| **कृषी पतपुरवठा** | **आवश्यकता** |
| १) अल्पकालीन | खतांची खरेदी |
| २) मध्यमकालीन | लग्नकार्यासाठी कर्जे |
| ३) दीर्घकालीन | ट्रॅक्टर खरेदी करणे. |

२)

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| **ग्रामीण व्यावसायिक वर्गीकरण** | **उपक्रम** |
| १) कृषी/शेती क्षेत्र | बँकिंग आणि विमा |
| २) उद्योग क्षेत्र | कच्च्या मालावर प्रक्रिया |
| ३) सेवा क्षेत्र | संगणीकृत सेवा |

**प्र.३. विधान आणि तर्क प्रश्न –**

**१) विधान 'अ' :** '' भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्था आहे.''

**तर्क विधान 'ब'** : २०११ च्या जनगणनेनुसार देशातील ग्रामीण लोकसंख्या जवळपास ८३.२५ कोटी (एकूण लोकसंख्येतील ६८.८%) इतकी आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.

४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**२) विधान 'अ' :** सामाजिक व आर्थिक बदलास साक्षरता हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.

**तर्क विधान 'ब' :** महिला सक्षमीकरण हे लिंग भेदभाव कमी करण्यास मदत करते.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.

४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**३) विधान 'अ' :** कृषी पतपुरवठ्याचा वापर अनुत्पादक कार्यासाठी केला जातो.

**तर्क विधान 'ब'** : शेतीमधील वाढीसाठी कृषी क्षेत्राला दिला जाणारा पतपुरवठा हा अत्यंत महत्त्वाचा आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

३) दोन्ही विधान ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.

४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**४) विधान 'अ' :** भारतातील ग्रामीण पतपुरवठ्यामध्ये, बिगर संस्थात्मक वित्त हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे.

**तर्क विधान 'ब' :** असुरक्षित उत्पादनामुळे लहान शेतकऱ्यास बँका पतपुरवठा करण्यास असक्षम आहेत.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.

४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**प्र.४. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा.**

१) कुसुमताईंनी त्यांचा व्यवसाय ग्रामीण भागामध्ये सुरू केला. त्यामुळे तेथील लोकांना रोजगार मिळून त्यांच्या राहणीमानात सुधारणा झाली.

२) रावजींनी कर्ज घेऊन ट्रॅक्टर खरेदी केला.

३) उच्च प्रतीची बि-बियाणे खरेदी करण्यासाठी बँक लहान/छोट्या शेतकऱ्यांना अनुदान पुरविते.

४) दामाजींनी यावेळी सावकाराकडून कर्ज घेण्याऐवजी गावातील पतसंस्थेकडून कर्ज घेतले.

५) रामरावजींनी शेतीमध्ये सिंचन व्यवस्थेच्या उद्देशाने बँकेच्या अटी व नियमानुसार दहा वर्षासाठी कर्ज घेतले.

**प्र. ५. खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

ग्रामीण विकास हा प्रशासनाचा एक वंचित भाग आहे. महात्मा गांधी यांच्या मते भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास साध्य करणे अशक्य आहे. विकासाच्या धोरणांचे एकत्रीकरण करण्यासाठी सर्व गरजांचे नियोजन करणे आवश्यक आहे. तळागाळातील लोकांच्या विकासासाठी प्रभावी प्रशासनाद्वारे ग्राम पातळीवर हे शक्य आहे. पंचायती राज्यव्यवस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय व राज्य सरकारांच्या विक्रेंद्रीकरणाच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी 'आदर्श गाव' या संकल्पनेचा संपूर्ण भारतातील यशस्वी यशोगाथांच्या माध्यमातून अभ्यास करणे गरजेचे आहे. शिक्षणातील विषमता कमी करण्यासाठी आणि साक्षरतेच्या प्रमाणात वाढ करण्यासाठी भारताची वाटचाल योग्य दिशेने सुरू असली तरी अजून बरेच काही करणे आवश्यक आहे. पूर्वीपासून वंचित असलेल्या भारतीय नागरीकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची स्वयंशासन हमी घेते.

१) महात्मा गांधीचे विचार थोडक्यात सांगा.

२) ग्रामीण विकासाबाबत शासनाच्या भूमिकेवर प्रकाश टाका.

३) ग्रामीण विकास साधण्यासाठी कोणत्या उपाययोजना सुचवल्या आहेत ?

४) गावाचा उत्कृष्ट नमुना तुमच्या शब्दांत मांडा.

◈◈◈

# प्रकरण – ६ : भारतातील लोकसंख्या



आकृती ६.१ : भारतातील लोकसंख्या

**प्रस्तावना :**

भारत हा विकसनशील देश आहे. देशाच्या आर्थिक विकासाचा दर हा संख्यात्मक व गुणात्मक वृद्धीवर अवलंबून असतो. त्याचे मापन लोकसंख्या, राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न इत्यादींनुसार केले जाते.

लोकसंख्या म्हणजे लोकांची संख्या, जी एका ठराविक कालावधीसाठी एका विशिष्ट भागात वास्तव्य करते. भारताची लोकसंख्या प्रत्येक दहा वर्षांनी दशकाच्या शेवटी मोजली जाते. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०२ कोटी होती. लोकसंख्या वाढीबाबत चीननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो.

जागतिक लोकसंख्येच्या एकूण टक्केवारीत भारताची लोकसंख्या १७.५ टक्के इतकी आहे. जागतिक भू-भागात २.४ टक्के इतका वाटा आहे. लोकसंख्येसंबंधीची माहिती ही रजिस्ट्रार जनरल यांचे कार्यालय आणि भारताची जनगणना समिती यांच्यामार्फत संकलित करून प्रकाशित केली जाते.

**तुम्हांला माहीत हवं : लोकसंख्येचे वास्तव**

- तिसऱ्या शतकात कौटिल्याने 'अर्थशास्त्र' ग्रंथामध्ये असे लिहिले आहे की, लोकसंख्या ही राज्याची कर प्रणाली (धोरण) मोजण्यासाठी एक घटक असतो.
- लोकसंख्येची पद्धतशीर गणना १८६५-१८७२ या कालावधीत देशाच्या विविध भागांमध्ये करण्यात आली. भारताची पहिली जनगणना १८७२ मध्ये करण्यात आली.
- ११ जुलै १९८७ ला संपूर्ण जगाची लोकसंख्या ५०० कोटी इतकी होती. ११ जुलै हा जागतिक लोकसंख्या दिवस म्हणून साजरा केला जातो.

**स्त्रोत : censusindia.gov.in**

**स्मरणशक्तीला चालना द्या.**

इ.९ वी व १० वीच्या भूगोल विषयामध्ये भारताच्या लोकसंख्येची जी वैशिष्ट्ये अभ्यासली ती शोधा. (उदा. लिंग गुणोत्तर, लोकसंख्येची घनता, वयोगट नागरीकरण इत्यादी.)

**लोकसंख्या वाढीतील बदल :**

भारताची लोकसंख्या ही आकाराने खूप मोठी आहे. ती वेगाने वाढते आहे. जनगणनेच्या सर्वेक्षणाद्वारे भारताच्या लोकसंख्येचा आकार, रचना व इतर वैशिष्ट्ये दिसून येतात.

खालील तक्ता ६.१ वरून लोकसंख्या वाढीतील बदल लक्षात येतो.

**भारतातील लोकसंख्या वाढ**

| वर्ष | लोकसंख्या (कोटीमध्ये) | सरासरी वार्षिक वृद्धी दर (टक्क्यांमध्ये) |
|---|---|---|
| १९११ | २५.२ | – |
| १९२१ | २५.१ | -०.०३ |
| १९३१ | २७.९ | १.० |
| १९४१ | ३१.९ | १.३ |
| १९५१ | ३६.१ | १.३ |
| १९६१ | ४३.९ | २.० |
| १९७१ | ५४.८ | २.२ |
| १९८१ | ६८.३ | २.२ |
| १९९१ | ८४.६ | २.१ |
| २००१ | १०२.७ | १.९ |
| २०११ | १२१.०२ | १.४ |

**तक्ता क्र. ६.१** **संदर्भ :** भारतातील जगणना सर्वेक्षण अहवाल

१) **लोकसंख्येतील अत्यल्प घट (१९११-१९२१) :** १९११-१९२१ या कालावधीत स्थिर लोकसंख्येमध्ये २५.२ कोटी वरून २५.१ कोटी इतकी अत्यल्प घट झाली. त्यामुळे तिथे नकारात्मक वृद्धी दर दिसून येतो. याचे प्रमुख कारण म्हणजे साथीचे रोग उदा. कॉलरा, फ्ल्यू, प्लेग, मलेरिया इत्यादी.

२) **महाविभाजन वर्ष :** १९११ ते १९२१ या कालावधीत लोकसंख्या वाढीचा दर नकारात्मक होता. १९२१ नंतर लोकसंख्या सातत्याने वाढत गेली, म्हणून भारताच्या जनगणनेच्या आयुक्तांनी १९२१ हे वर्ष 'महाविभाजनाचे वर्ष' जाहीर केले.

३) **सकारात्मक वृद्धी दर (१९३१-१९४१) :** भारताचा वार्षिक वृद्धी दर जवळपास १ ते १.३% इतका नों-दविण्यात आला.

४) **लोकसंख्येत सुधारीत वाढ (१९५१ च्या पुढे) :** १९५१-१९७१ या काळातील कालावधीवरून लोकसंख्या ३६.१ कोटी ते ५४.८ कोटी इतकी वाढली. स्वातंत्र्यानंतर लोकसंख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

५) **लोकसंख्येचा विस्फोट (१९७१-२००१) :** या कालावधीत भारताने लोकसंख्येचा विस्फोट अनुभवला, कारण या तीन दशकात लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर हा प्रति वर्ष २% हून अधिक होता.

६) **लोकसंख्या वृद्धी दरात घट (२००१-२०११) :** लोकसंख्येच्या वृद्धी दरात घट झाल्याचे दिसून येत आहे कारण ही घट २००१ मध्ये १.९% तर २०११ मध्ये १.४% इतकी आहे. यावरून हा सरासरी वार्षिक वृद्धी दर कमी होताना दिसून येत आहे.

## लोकसंख्या वाढीचे सिद्धांत :

१) **माल्थस्चा लोकसंख्या वाढीचा सिद्धांत :** थॉमस रॉबर्ट माल्थस यांनी १७९८ मध्ये "An Essay on the Principle of Population" आणि १८०३ मध्ये लिहिलेल्या सुधारीत आवृत्तीत काही उपाय सुचविले.

माल्थसच्या सिद्धांतानुसार लोकसंख्या ही भूमितीय गतीने वाढते (२, ४, ८, १६, ३२, ६४ .....) परंतु अन्नधान्याचा पुरवठा हा गणितीय गतीने वाढतो (१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९ ......). यामुळे लोकसंख्या व अन्नपुरवठा यामध्ये असमतोल निर्माण होतो. हा असमतोल उशीरा विवाह, नैतिक संयम यांसारख्या प्रतिबंधक उपायांनी कमी करता येऊ शकतो. माल्थसने सकारात्मक किंवा नैसर्गिक नियंत्रणाची ही संकल्पना सांगितली. नैसर्गिक आपत्तीमुळे ही अतिरिक्त लोकसंख्या कमी होऊ शकते आणि या असमतोलावर नियंत्रण आणता येते. तथापि हे प्रतिबंधात्मक उपाय हे स्त्री व पुरुष या दोघांवर अवलंबून आहेत.

### लोकसंख्या वाढीसंबंधित संकल्पना :

१) **जन्मदर :** जन्मदर म्हणजे एका वर्षात प्रति १००० लोकसंख्येमागे जन्माला आलेल्या बालकांची संख्या होय. यालाच जननदर असेही म्हणतात.

२) **मृत्यूदर :** मृत्यूदर म्हणजे एका वर्षात प्रति १००० लोकसंख्येमागे मृत्यू पावलेल्या व्यक्तींची संख्या होय. यालाच मर्त्यतादर असेही म्हणतात.

३) **जीवित प्रमाणदर :** जन्मदर व मृत्यूदर यांच्यातील फरक म्हणजे जगण्याचा दर किंवा जीवित प्रमाणदर होय. हा दर लोकसंख्येतील खरी वाढ दर्शविते.

जीवित प्रमाण दर = जन्मदर - मृत्यूदर

२) **लोकसंख्या संक्रमणाचा सिध्दांत :** ए.जे. कोल व इ.एम. हुवर यांनी 'लोकसंख्या वाढ आणि निम्न उत्पन्न देशातील आर्थिक विकास' (१९५८) या पुस्तकात लोकसंख्या संक्रमणाचा सिद्धांत मांडला.

या सिद्धांतानुसार प्रत्येक देश, लोकसंख्या संक्रमणाच्या तीन टप्प्यांमधून जातो. या सिद्धांतामध्ये संक्रमण हे उच्च ते निम्न जन्म आणि मृत्यूदर दाखवतो.

## लोकसंख्या संक्रमणाचे टप्पे :

या सिद्धांतात आर्थिक विकास व लोकसंख्येतील वाढ यांमधील संबंध तीन टप्प्यांमध्ये स्पष्ट केला आहे. या सिद्धांतानुसार, देश आर्थिकदृष्ट्या प्रगत होतो तेव्हा लोकसंख्या तीन टप्प्यांमधून जाते ती खालीलप्रमाणे :

अ) **पहिला टप्पा (लोकसंख्येतील घटता दर) :** हा पूर्व औद्योगिक व प्राचीन टप्पा होता. यात जन्मदर व मृत्यूदर दोन्हीचे प्रमाण जास्त होते. म्हणजेच सर्व

विकसनशील देश या टप्प्यात होते. सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे लोकसंख्येत कमी वृद्धी झाली. उदा. जास्त प्रमाणात निरक्षरता, अंधविश्वास, दारिद्र्य, रूढीवादी, वैद्यकीय सुविधांचा अभाव इत्यादी. १९२१ पूर्वी भारताचा समावेश लोकसंख्या संक्रमण सिद्धांताच्या पहिल्या टप्प्यात होता.

**आ) दुसरा टप्पा (लोकसंख्येतील वाढता दर) :** औद्योगिकरण व आर्थिक विकासाने दुसऱ्या टप्प्याची सुरुवात झाली. आर्थिक विकासामुळे मृत्यूदर झपाट्याने कमी झाला, पण जन्मदर वाढतच राहिला. यामुळे लोकसंख्येचा विस्फोट झाला. भारतासह सर्व विकसनशील देश या दुसऱ्या टप्प्यात होते. भारताची वाटचाल आता तिसऱ्या टप्प्याकडे सुरू झाली आहे.

**इ) तिसरा टप्पा (कमी व स्थिर लोकसंख्या) :** वाढते औद्योगीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा विस्तार व राहणीमानातील बदल यांमुळे आर्थिक विकासाबरोबरच जन्मदर व मृत्यूदरात घट झाली. सर्व विकसित देश या टप्प्यात होते.

लोकसंख्या संक्रमण सिद्धांत खाली दिलेल्या आकृती ६.२ द्वारे स्पष्ट करता येतो.

**भारतातील जन्मदर व मृत्यूदर**

| वर्ष | जन्मदर | मृत्यूदर |
|---|---|---|
| १९०१ | ४९.२ | ४२.६ |
| १९११ | ४८.१ | ४७.२ |
| १९२१ | ४६.३ | ३६.३ |
| १९३१ | ४५.२ | ३१.२ |
| १९४१ | ३९.९ | २७.४ |
| १९५१ | ४१.७ | २२.८ |
| १९६१ | ४१.२ | १९.० |
| १९७१ | ३७.२ | १५.० |
| १९८१ | ३२.५ | १५.० |
| १९९१ | २९.५ | ९.८ |
| २००१ | २८.३ | ९.० |
| २०११ | २०.९७ | ७.४८ |

**तक्ता क्र. ६.२** **संदर्भ :** भारतातील जगणना सर्वेक्षण अहवाल




**आकृती ६.२ : लोकसंख्या संक्रमण**

**हे करून पहा :**

६.२ या तक्त्याच्या आधारे लोकसंख्या संक्रमणाचा सिद्धांत भारतास कशाप्रकारे लागू होतो ते पहा.

## भारतातील लोकसंख्येचा विस्फोट :




**आकृती ६.३ लोकसंख्या विस्फोट**

**सांगा पाहू :**

आकृती ६.३ चे निरीक्षण करून अनुमान काढा.

लोकसंख्येचा विस्फोट ही एक अशी अवस्था आहे की, लोकसंख्येतील वाढ ही अर्थव्यवस्थेची वृद्धी व विकासापेक्षा वेगाने होते. भारतातील लोकसंख्येचा विस्फोट हा वाढत्या जन्मदरामुळे व घटत्या मृत्यूदरामुळे झाला आहे.

**वाढत्या जन्मदराची कारणे :**

१) **निरक्षरता :** देशात निरक्षरतेचे प्रमाण खूप जास्त आहे. निरक्षर लोकांची लग्न व अपत्य यांच्या बाबतीतील प्रवृत्ती अत्यंत ताठर असते. स्त्रियांच्या निरक्षरतेमुळे जन्मदरात वाढ झाली आहे.

२) **विवाहाची सार्वत्रिकता :** भारतात विवाह म्हणजे धार्मिक व सामाजिक कर्तव्य समजले जाते. शिक्षणाचा विस्तार होऊन सुद्धा लोकांची विवाहाकडे बघण्याची प्रवृत्ती अजूनही बदललेली दिसून येत नाही.

३) **विवाहाचे वय :** भारतामध्ये इतर देशांच्या तुलनेत लग्नाचे सरासरी वय कमी आहे. स्त्रियांसाठी १८ वर्षे व पुरुषांसाठी २१ वर्षे इतके आहे. कमी वयात विवाह केल्याने जन्मदरात जलद गतीने वाढ दिसून येते.

४) **मुलगाच हवा :** अजूनही अनेक भारतीय पालकांचा इच्छित पुत्रसंख्या प्राप्त होईपर्यंत मुले जन्माला घालण्याकडे कल असतो. याला मुलासाठीचे सर्वाधिक प्राधान्य असे म्हणतात (मेटा प्राधान्य).

५) **संयुक्त कुटुंब पद्धती :** कोणा एकावर आर्थिक जबाबदारी नसल्यामुळे एकत्र कुटुंब पद्धतीत जन्मदराचे प्रमाण जास्त असते.

६) **शेतीवरील अवलंबित्व :** भारतीय शेती मनुष्यबळावर आधारित आहे. त्यामुळे कुटुंबातील अपत्यांची संख्या जेवढी जास्त, तेवढी शेतात काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढते असा समज आहे.

७) **दारिद्र्य :** गरीब लोकांचा कल मोठ्या कुटुंबाकडे जास्त असतो. कारण जास्त मुलं म्हणजे अधिक उत्पन्न अशी धारणा असते.

८) **कुटुंब कल्याण कार्यक्रमाविषयीचे अज्ञान –** बहुतांश लोकांना कुटुंब नियोजनाच्या विविध साधनांची माहिती नसते.

**शोधा पाहू :**

वेगवेगळ्या देशातील स्त्री-पुरुषांची कायदेशीर विवाहाची वयोमर्यादा शोधा.

**माहीत करून घ्या :**

- **न्यूनतम लोकसंख्या :** नैसर्गिक संसाधने लोकसंख्या वाढीपेक्षा जास्त आहेत.
- **अधिकतम लोकसंख्या :** लोकसंख्या वाढ नैसर्गिक संसाधनांपेक्षा जास्त आहे.
- **पर्याप्त लोकसंख्या :** लोकसंख्या वाढ व उपलब्ध नैसर्गिक संसाधने समान आहेत.

**मृत्यूदर कमी होण्याची कारणे :**

१) **वैद्यकीय व आरोग्य सुविधांमधील सुधारणा :** वैद्यकीय सोयीसुविधांमध्ये झालेल्या सुधारणांमुळे प्लेग, पटकी, हिवताप, कांजण्या, क्षयरोग इत्यादी साथीच्या रोगांवर नियंत्रण करण्यात आले आहे.

२) **माता मृत्यूदर :** काळानुरूप आरोग्य सुविधेमधील सुधारणांमुळे प्रसूती दरम्यान मृत्यू पावणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी झाले.

३) **बालमृत्यू दरातील घट :** चांगल्या वैद्यकीय सुविधांमुळे बाल मृत्यूदरात घट झाली आहे. बाल मृत्यूदराप्रमाणे १९५१ मध्ये दर हजारी १४६, २००२ मध्ये दर हजारी ६४ आणि २०११ मध्ये दर हजारी ४७ इतके कमी झाले आहे. स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने लहान मुलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होऊन बाल मृत्यूदरात घट झाली आहे.

४) **साक्षरतेत झालेली वाढ :** उच्च शिक्षणामुळे साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होवून राहणीमानाचा दर्जा सुधारतो. शिवाय चांगल्याप्रकारे बालसंगोपन करण्यास मदत होते. शिक्षणामुळे लोकांना अंधश्रद्धा व अज्ञानातून बाहेर पडण्यास मदत झाली आहे.

५) **सकस आहार वापर :** शिक्षणामुळे आरोग्य व सकस आहार यांबद्दल जागृती निर्माण झाली आहे. मुलांचे कुपोषण व स्त्रियांच्या अस्वास्थ्यामुळे मृत्यूचे प्रमाण जास्त होते. सकस आहारामुळे मृत्यूदर नियंत्रित झाला आहे. उदा. शालेय माध्यान्ह भोजन योजना.

६) **आपत्ती व्यवस्थापन :** राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) २००५ साली स्थापन झाले. त्यामुळे सर्व प्रकारच्या आपत्तींची तीव्रता कमी करण्यास मदत झाल्याने जीवितहानी कमी झाली आहे.

७) **इतर घटक :** शिक्षण, सामाजिक सुधारणा, वाढते शहरीकरण, राहणीमानात झालेली सुधारणा, जनजागृती मोहिम यांमुळे लोकांमध्ये जागरूकता निर्माण झाली आहे.

**तुम्हांला माहीत हवे :**

**लोकसंख्या विस्फोटाचे परिणाम**

- भूमीवर येणारा भार
- कृषीवर येणारा भार
- मूलभूत सुविधांवर येणारा ताण
- अन्नातील मागणी व पुरवठा यांमधील असमतोल
- पर्यावरणाच्या समस्या
- सामाजिक समस्या
- कमी राष्ट्रीय उत्पन्न

## लोकसंख्या विस्फोटावर प्रतिबंधात्मक उपाय

लोकसंख्येतील विस्फोट या समस्येवर खालील उपाय सुचविले आहेत.

अ) **आर्थिक उपाय :** आर्थिक उपायांमुळे लोकांच्या राहणीमानाचा दर्जा वाढून लोकसंख्येतील वाढ रोखली जाऊ शकते. त्यातील काही महत्त्वाचे घटक खालील प्रमाणे आहेत.

- औद्योगिक क्षेत्राचा विस्तार
- रोजगाराच्या संधीत वाढ
- दारिद्र्य निर्मूलन
- उत्पन्न व संपत्तीचे समान वाटप

ब) **सामाजिक उपाय :** लोकसंख्येतील विस्फोट ही सामाजिक व आर्थिक समस्या असून निरक्षरता, अंधविश्वास, रूढी, परंपरा, महिलांना देण्यात आलेले निम्न स्थान इत्यादींशी संबंधित आहे. सामाजिक उपाय खालीलप्रमाणे आहेत.

- शिक्षणाचा विस्तार
- महिलांच्या दर्जात सुधारणा
- लग्नाची किमान वयोमर्यादेत वाढ

क) **भारतातील लोकसंख्या धोरण :** भारतातील लोकसंख्येचे धोरण खालील कार्यक्रमांद्वारे राबविले गेले.



आकृती ६.५ : छोटे कुटुंब

१) **कुटुंब नियोजन कार्यक्रम :** जन्मदर कमी करण्याच्या उद्देशाने १९५२ मध्ये हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. कुटुंब नियोजन म्हणजे नियोजित पालकत्व होय. हा एक उपाय असून संतती नियमनाबाबत निर्णय घेऊन पालक होण्याची संधी घेता येते. लोकांमध्ये जागरूकतेचा अभाव, धार्मिक गैरसमज व सरकारचे अस्थिर धोरण यांमुळे कुटुंब नियोजन कार्यक्रम यशस्वी झाला नाही.

२) **कुटुंब कल्याण कार्यक्रम :** १९७९ मध्ये नियोजन कार्यक्रमाचे नामांतरण कुटुंब कल्याण कार्यक्रम असे करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत कुटुंब नियोजनाच्या सेवा, माता-बालक आरोग्य व आहार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

३) **राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, २००० :** NPP -(National Population Policy) - लोकसंख्येच्या गुणवत्तेत वाढ करणे व लोकसंख्या नियंत्रित करणे या उद्देशाने २००० मध्ये राष्ट्रीय लोकसंख्या धोरण अंमलात आणले. या धोरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) १४ वर्ष वयापर्यंत मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे.

२) दर हजार बालकांमागे बाल मृत्यूदर ३० इतका कमी करणे.

३) प्रसूती दरम्यान १,००,००० माता मृत्यूदर १०० इतका कमी करणे.

४) मुलांसाठी रोगप्रतिबंधक लसीकरणाचे सार्वत्रिकरण करणे.

५) मुलींचे विवाहाचे वय १८ पूर्वीचे नसावे व शक्यतो २० वर्षानंतर विवाह केले जावेत.

६) रोगप्रतिबंध व नियंत्रण करणे.

७) २०४५ पर्यंत लोकसंख्या वाढीचा दर स्थिर ठेवणे.

## लोकसंख्या एक मानवी संसाधन

### प्रस्तावना :

लोकसंख्या हा राष्ट्राचा मौलिक स्त्रोत आहे. नैसर्गिक देणगी ही तेव्हाच महत्त्वाची असते, जेव्हा ती लोकांना खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरते. उत्पादक लोकसंख्येमुळेच ती संसाधन ठरते. म्हणून मानवी संसाधन हे अंतिम स्त्रोत संसाधन ठरले आहे. निरोगी, सुशिक्षित, कुशल व प्रेरणादायी लोकांमुळे आवश्यकतेनुसार त्यांचा विकास करतात.

जागतिक पातळीवर लोकसंख्येच्या वितरणात असमानता आढळते. शैक्षणिक पातळीत वय व लिंग यांबाबत भिन्नता दिसून येते. त्यांची वैशिष्ट्ये देखील सतत बदलत असतात.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत (UNDP) १९९० मध्ये मानव विकासाची संकल्पना मांडली.

मानव विकासात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय निवडीचा विचार केला जातो. तसेच समृद्ध मानवी जीवन ही समाजाची खरी संपत्ती आहे, याचाही विचार केला जातो.

## आर्थिक विकासामध्ये मानवी संसाधनाची भूमिका :

१) आर्थिक विकास अंतिम असून आर्थिक वृद्धीद्वारे तो प्राप्त होतो. त्यामुळे मानवी परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

२) मानवी विकासाचे योगदान समाजातील नागरी अडथळे कमी करणे व राजकीय स्थैर्य आणणे हे आहे.

३) मानवी विकास केवळ उत्पन्नातील निवडी विस्तारणे नसून मानवी विकासाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय हे सर्व पैलू पूर्ण करणे होय.

४) मानवी विकास शैक्षणिक सुविधांमुळे प्राप्त होतो. महिलांमध्ये साक्षरता दर वाढवणे, जन्मदर कमी करणे, बाल मृत्यूदर कमी करणे, लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे याकरिता मानव संसाधन हे विकासाचे योगदान आहे.

५) मानवी संसाधनाच्या विकासामुळे आयुर्मान व साक्षरता दर यामध्ये सुधारणा होते. यामुळे जगण्याचा दर्जा सुधारतो.

६) मानवी विकासामुळे संसाधन, संशोधन व विकास यात मदत होते. शैक्षणिक संस्थांमध्ये विविध संशोधनासाठी प्रेरणा मिळते.

७) मानवी विकासामुळे मानवी उत्पादकता वाढते. उदा. आरोग्य, शिक्षणातील गुंतवणूक इत्यादी.

८) मानवी विकास ही संकल्पना सार्वत्रिक स्वरूपाची आहे. तो कमी विकसित व उच्च विकसित देशांना उपयुक्त ठरतो. थोडक्यात मानवी विकासामुळे पूर्ण समाज बदलतो.

### तुम्हांला माहीत आहे का ?

**लोकसंख्या शिक्षण :** मानवी संसाधन विकासासाठी लोकसंख्या शिक्षण हे अनिवार्य आहे. युनेस्कोच्या मते, याचे ध्येय फक्त लोकसंख्येबद्दल जागरूकता निर्माण करणे नसून लोकसंख्येची काळजी घेण्याबरोबरच संख्यात्मक आणि गुणात्मक विकासक्षम मूल्य आणि दृष्टीकोन हेही आहे. लोकसंख्या शिक्षण आणि शैक्षणिक कार्यक्रमाच्या साहाय्याने कुटुंबातील, समाजातील, राष्ट्रातील आणि जागतिक परिस्थितीत विकासाच्या हेतूने तर्कसंगत आणि जबाबदार वर्तनाच्या स्थितीचा अभ्यास करणे हे आहे.

### तुम्हांला माहीत हवे :

**लोकसंख्या लाभांश :**

लोकसंख्या लाभांश हे भारतातील स्पर्धात्मक फायद्यासाठी आहे. लोकसंख्या लाभांश तेव्हा मिळतात जेव्हा उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण एकूण लोकसंख्येत जास्त असते. अर्थव्यवस्थेच्या वृद्धीसाठी जास्तीत जास्त लोकांना उत्पादनक्षम बनविणे हे निर्देशित करते.

## स्वाध्याय

**प्र. १. योग्य पर्याय निवडा :**

**१) लोकसंख्या संक्रमण सिद्धांतात पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो.**

अ) जन्मदर व मृत्यूदर खूप जास्त
ब) मृत्यूदर झपाट्याने कमी होतो, पण जन्मदर वाढतच राहतो.
क) जन्मदर व मृत्यूदर कमी झालेले असतात.
ड) देश आर्थिकदृष्ट्या प्रगत होतो.

**पर्याय :** १) अ आणि ब    २) अ आणि क
३) अ, ब आणि क    ४) अ, ब, क आणि ड

**२) खालीलपैकी भारतातील लोकसंख्या विस्फोटाचे कारण नाही.**

अ) निरक्षरता    ब) विवाहाची सार्वत्रिकता
क) एकत्र कुटुंबपद्धती    ड) राहणीमानातील सुधारणा

**पर्याय :** १) अ आणि ब    २) क आणि ड
३) अ, ब आणि क    ४) ड

**३) लोकसंख्या विस्फोटावर केल्या जाणाऱ्या प्रतिबंधात्मक उपायांमध्ये यांचा समावेश होतो.**

अ) रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
ब) महिलांचा दर्जा सुधारणे.
क) राष्ट्रीय लोकसंख्या कार्यक्रम
ड) आपत्ती व्यवस्थापन

**पर्याय :** १) ड    २) अ आणि क
३) क आणि ड    ४) अ, ब आणि क

**४) योग्य पर्यायाची जोडी जुळवा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) महाविभाजन वर्ष | अ) २०४५ पर्यंत स्थिर लोकसंख्या |
| २) ए.जे.कोल आणि इ.एम.हुवर | ब) १९२१ |
| ३) सामाजिक उपाय | क) लोकसंख्या वाढ आणि कमी उत्पन्न देशातील आर्थिक विकास |
| ४) राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, २००० | ड) शिक्षणाचा विस्तार |

**पर्याय :** १) १-ड, २-क, ३-अ, ४-ब
२) १-ब, २-क, ३-ड, ४-अ
३) १-ब, २-अ, ३-क, ४-ड
४) १-क, २-ड, ३-अ, ४-ब

**प्र. २. अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सांगा :**

१) लोकसंख्येतील वाढ ही अर्थिकवृद्धी व विकासापेक्षा वेगवान होते.
२) जन्मदर आणि मृत्यूदर यांच्यातील फरक.
३) लोकसंख्या वाढ व उपलब्ध नैसर्गिक संसाधनांमध्ये समतोल.
४) १९५२ मध्ये जन्मदर कमी करण्याच्या उद्देशाने सुरू केलेला कार्यक्रम.

**प्र. ३. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :**

१) 'अ' देशात एका वर्षात दरहजारी चाळीस बालके जन्माला आली.
२) मुंबईतील सार्वजनिक वाहतूकसेवेवर लोकसंख्येचा प्रचंड ताण आहे.
३) 'ब' देशात एका वर्षात दरहजारी पंधरा मृत्यू होतात.
४) चीनमध्ये काही काळ 'एक कुटुंब एक बालक' हे धोरण होते.

**प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) भारतातील वाढत्या जन्मदराची कारणे स्पष्ट करा.
२) भारतातील कमी मृत्यूदराची कारणे स्पष्ट करा.
३) आर्थिक विकासामध्ये मानवी संसाधनाची भूमिका स्पष्ट करा.

**प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात किंवा नाहीत ते सकारण स्पष्ट करा :**

१) भारतात लोकसंख्या विस्फोट झालेला आहे.
२) भारतातील मृत्यूदर वेगाने कमी होत आहे.
३) पर्याप्त लोकसंख्या देशाच्या विकासाला हातभार लावते.
४) आर्थिक विकासात मानवी संसाधनांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.
५) जन्मदर राहणीमानातील बदल झाल्यामुळे कमी झाला.

**प्र. ६. खालील उदाहरणे सोडवा :**

१) खालील तक्त्याच्या आधारावर लोकसंख्येचा तिसरा चतुर्थक ($Q_3$) काढा.
२) खालील तक्त्याच्या आधारे लोकसंख्यावाढीचा वक्र काढा.

| वर्ष | लोकसंख्या (कोटीत) |
|---|---|
| १९५१ | ३६.१ |
| १९६१ | ४३.९ |
| १९७१ | ५४.८ |
| १९८१ | ६८.३ |
| १९९१ | ८४.६ |
| २००१ | १०२.७ |
| २०११ | १२१.०२ |

(स्रोत – जनगणना कार्यालय, भारत)

# प्रकरण – ७ : भारतातील बेरोजगारी




आकृती ७.१ भारतातील बेरोजगारी

**प्रस्तावना :**

भारत हा विकसनशील देश आहे आणि जगात वेगाने वाढणारी एक अर्थव्यवस्था आहे. भारताच्या विकासामध्ये बेरोजगारीची समस्या हे एक मोठे आव्हान आहे. आकृती क्र.७.१ वरून भारतातील बेरोजगारीच्या समस्येची कल्पना येते. बेरोजगारीमुळे मानवी साधनसंपत्ती वाया घालवण्यासारखे आहे. दीर्घकालीन बेरोजगारी ही मोठ्या प्रमाणावर वाढणारे दारिद्र्य व संथ गतीने होणारा आर्थिक विकास दर्शविते. बहुतांश तरुणांना बेरोजगारीस सामोरे जावे लागते. तरुण वर्ग ही मोठी मानवी साधनसंपत्ती, आर्थिक विकास व तांत्रिक नवकल्पनेची चालकशक्ती व गुरुकिल्ली आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. म्हणून तरुणातील बेरोजगारी हे २१ व्या शतकातील भारतासमोरील मोठे आव्हान आहे. रोजगार संधी व लोकसंख्येतील वाढ यांमध्ये असमतोल दिसून येतो. यामुळे मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी वाढली आहे. बेरोजगार, अनुत्पादक समाज विघातक आणि देशविरोधी कामात गुंतलेली दिसतात.

**बेरोजगारीची अर्थ :**

साधारणपणे ज्याला उत्पादकीय प्रक्रियेत कोणताही लाभ होत नाही त्यास बेरोजगारी असे म्हणतात. अर्थशास्त्रात बेरोजगारी ही या संदर्भात अभ्यासता येते.

अ) कामाचे स्वरूप

ब) काम करणारा वयोगट

क) श्रमाची मागणी व पुरवठा

ड) प्रचलित वेतनदर

वाढत्या श्रमाचा वेग या संदर्भात अभ्यासता येतो. त्यामुळे आर्थिक वृद्धीचा दर पुरेसा वेगवान नाही.

'बेरोजगारीचा अर्थ असा की, ज्या परिस्थितीत १५ ते ५९ वयोगटांतील व्यक्तींना प्रचलित वेतनदरावर काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही रोजगार मिळत नाही'.

एका व्यक्तीस रोजगार असणे म्हणजे ती व्यक्ती आठवड्यातले किमान काही तास काम करत असली पाहिजे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या (N.S.S.O.) सांख्यिकीय माहितीनुसार,

१) भारतात एखादी व्यक्ती दर आठवड्याला १४ तासांपेक्षा कमी काम करते. अशा व्यक्तीस बेरोजगार म्हणतात.

२) जे १५-२८ तास दर आठवड्याला काम करतात त्यांना न्यून रोजगार म्हणतात.

३) जी व्यक्ती दररोज आठ तास म्हणजे प्रत्येक वर्षाला २७३ दिवस काम करते त्यांना रोजगार असलेल्या व्यक्ती म्हणतात.

**तुम्हांला माहीत हवं :**

**१) अनैच्छिक बेरोजगारी :** ही बेकारी म्हणजे अशी एक अवस्था की लोकांची काम करण्याची पात्रता असते आणि काम करायला तयार असतात, परंतु त्यांना काम प्राप्त होत नाही.

**२) ऐच्छिक बेरोजगारी :** जेथे व्यक्ती काम करण्यासाठी पात्र असते, परंतु त्याची काम करण्याची इच्छा नसते.

**३) अर्धबेकारी :** अर्धबेकारी ही अशी स्थिती होय की जेथे व्यक्तीची काम करण्याची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही किंवा कनिष्ठ पातळीवर काम करावे लागते.

**४) पूर्ण रोजगार :** पूर्ण रोजगार ही अशी गृहीत स्थिती आहे ज्यामध्ये सर्व उपलब्ध संसाधने अतिशय कार्यक्षमतेने कार्यरत असतात.

## बेरोजगारीचे प्रकार :

बेरोजगारीचे विविध प्रकार आहेत. त्यांचे वर्गीकरण खालील प्रकारे करता येते.




## अ) ग्रामीण बेरोजगारी :

ग्रामीण भागातील बेरोजगारीला ग्रामीण बेरोजगारी म्हणतात. ग्रामीण बेरोजगारीचे दोन प्रकार आहेत.

**१) हंगामी बेरोजगारी :** हंगाम नसलेल्या काळात जेव्हा लोकांना रोजगार नसतो त्याला हंगामी बेरोजगारी म्हणतात. शेतकऱ्यांना पिकांच्या लागवडीसाठी पावसावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शेती हा हंगामी व्यवसाय आहे. शेती क्षेत्रातील श्रमशक्ती जवळपास ५ ते ७ महिन्यांसाठी बेरोजगार राहते. शेतीशिवाय स्थलपरत्वे हंगामी बेरोजगारी ही पर्यटन मार्गदर्शक, बँड पथक, साखर कारखाना कामगार, बर्फ फॅक्टरी कामगार व मासेमारी इत्यादी व्यवसायांमध्ये आढळून येते.

**२) छुपी/प्रछन्न बेरोजगारी :** सामान्यत: भारतातील खेड्यांमध्ये ही बेरोजगारी आढळते. ही एक अशी स्थिती आहे की ज्यामध्ये गरजेपेक्षा जास्त लोक काम करताना दिसतात. त्यापैकी काही मजुरांना कामावरून कमी केले तरी उत्पादनावर त्याचा परिणाम होत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर ती एका विशिष्ट स्थितीशी संबंधित आहे, जिथे अतिरिक्त मनुष्यबळ असून त्यामध्ये काही मजुरांची सीमांत उत्पादकता शून्य असते.

शेतजमिनीवरचा अतिरिक्त भार हा ग्रामीण भागात छुपी बेरोजगारी निर्माण करतो. ग्रामीण भागात जवळपास २०% श्रमशक्ती छुप्या बेरोजगारीत आहे. संयुक्त कुटुंब पद्धती, पर्यायी रोजगारांचा अभाव, शेतीवरील लोकसंख्येचा अतिरिक्तभार इत्यादी छुप्या बेकारीची कारणे आहेत.



अ) पाच कामगार = दहा क्विंटल ज्वारी

आ) सोळा कामगार = दहा क्विंटल ज्वारी

आकृती ७.२ : छुपी/प्रछन्न बेरोजगारी

**ब) नागरी बेरोजगारी :**

शहरी भागात जे बेरोजगार आढळतात, त्यास नागरी बेरोजगारी म्हणतात. खालीलप्रमाणे नागरी बेरोजगारीचे प्रकार आहेत.

१) **सुशिक्षित बेरोजगारी :** काम करण्याची इच्छा आणि शिक्षणाची पात्रता असूनही रोजगार मिळत नाही त्यास सुशिक्षित बेरोजगारी म्हणातात. ही बेरोजगारी शालान्त परीक्षा उत्तीर्ण, पदवीपूर्व शिक्षण, पदवीधारक व पदव्युत्तरांमध्ये दिसून येते. शिक्षणाप्रती उदासिनता, पांढरपेशा व्यवसायाला प्राधान्य, व्यावसायिक अभ्यासक्रमाचा अभाव, रोजगाराच्या संधी व सुशिक्षितांमधील असमतोल, उपलब्ध शैक्षणिक संधींची माहिती नसणे ही सुशिक्षित बेरोजगारीची कारणे आहेत.

२) **औद्योगिक बेरोजगारी :** शहरातील कारखाने व उद्योगांमधील बेरोजगारीस औद्योगिक बेरोजगारी म्हणतात. हे कामगार कुशल किंवा अकुशल असतात. हा सामान्यत: खुल्या बेरोजगारीचा प्रकार आहे. मंद औद्योगिक वृद्धी, वेगाने वाढणारी लोकसंख्या, प्रशिक्षण सुविधांचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाची कमी स्वीकार्यक्षमता, उद्योगांचे गैरसोयीचे स्थानिकीकरण, श्रमाची कमी गतिशीलता ही औद्योगिक बेरोजगारीची मुख्य कारणे आहेत.

**औद्योगिक बेरोजगारीचे खालील प्रकार आहेत :**

अ) **तांत्रिक बेरोजगारी :** तंत्रज्ञानातील बदलांमुळे तांत्रिक बेरोजगारी निर्माण होते. आधुनिक तंत्रज्ञान भांडवल प्रधान असून त्यास कमी कामगार लागतात. जेव्हा आधुनिक तंत्रज्ञानांचा स्वीकार औद्योगिक क्षेत्रात केला जातो. प्रशिक्षणाचा अभाव असल्याने कामगार आपल्या नोकरीवरून विस्थापित होतात. उदा. संगणकाचा वापर, यांत्रिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी.

ब) **संघर्षजन्य बेरोजगारी :** उद्योगांमधील संघर्षामुळे निर्माण होणारी बेरोजगारी म्हणजे संघर्षजन्य बेरोजगारी होय. ह्या प्रकारची बेरोजगारी यांत्रिक बिघाड, वीजटंचाई, कच्च्या मालाचा अभाव, कामगारांचा संप इत्यादींमुळे निर्माण होते. संघर्षजन्य बेरोजगारी ही तात्पुरत्या स्वरूपाची असते.

क) **चक्रीय बेरोजगारी :** व्यापारचक्रातील तेजी-मंदीपैकी मंदीच्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या बेकारीस चक्रीय बेकारी म्हणतात. मंदीच्या काळात प्रभावी मागणी घटते त्यामुळे उत्पादकांचा नफा आणि किमतीमध्ये घट होते. परिणामी उत्पादक गुंतवणूक व वस्तूंच्या उत्पादनात घट करतो. उत्पादनात घट झाल्याने रोजगारात घट होते. परिणामी कामगारांना बेरोजगारीस सामोरे जावे लागते.

ड) **संरचनात्मक बेरोजगारी :** देशाच्या आर्थिक संरचनेत काही लक्षणीय बदलांमुळे ही बेरोजगारी निर्माण होते. हे बदल उत्पादन घटकांच्या मागणी व पुरवठ्यावर परिणाम करू शकतात. अर्थव्यवस्थेमधील मूलभूत बदल, सरकारी धोरणांमध्ये झालेले बदल, भांडवलाचा तुटवडा, उद्योगाचे एका क्षेत्रापासून दुसरीकडे झालेले स्थलांतर इत्यादी. ही एक दीर्घकालीन अवस्था आहे. उपलब्ध रोजगार व कामगारांचे कौशल्य यातील तफावतीमुळे संरचनात्मक बेरोजगारी निर्माण होते. उदा.१) घोडागाडीची जागा आता ऑटोरिक्षाने घेतली आहे. २) संगणकामुळे टंकलेखक बेरोजगार झाले कारण त्यांचे कौशल्य व उपलब्ध रोजगारात तफावत आहे.

**भारतातील बेरोजगारीचा विस्तार : रोजगार आणि बेरोजगारी (लाख)**

| वर्ष | कामगार शक्ती | श्रम शक्ती | बेरोजगारी | बेरोजगारीचा दर (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| १९९३-१९९४ | ३८१.९४ | ३७४.४५ | ७.४९ | २.० |
| १९९९-२००० | ४०६.८५ | ३९७.८८ | ८.९७ | २.२ |
| २००४-२००५ | ४६८.७३ | ४५७.५६ | ११.१७ | २.४ |
| २००९-२०१० | ४७२.३२ | ४६२.४९ | ९.८४ | २.१ |
| २०११-२०१२ | ४८३.७५ | ४७२.९१ | १०.८४ | २.२ |

**तक्ता क्र.७.१** **स्त्रोत :** इकॉनॉमिक व पोलिटिकल वीकली (७ जून २०१४)

**तुम्हांला माहीत आहे का?** **राज्यानिहाय भारतातील बेरोजगारीचे दर (२०१५-१६)**

| क्रमांक | राज्य | बेकारीचा दर (प्रति १०००) | क्रमांक | राज्य | बेकारीचा दर (प्रति १०००) |
|---|---|---|---|---|---|
| १ | त्रिपुरा | १९७ | १६ | मणिपूर | ५७ |
| २ | सिक्कीम | १८१ | १७ | ओडिशा | ५० |
| ३ | केरळ | १२५ | १८ | पश्चिम बंगाल | ४९ |
| ४ | हिमाचल प्रदेश | १०६ | १९ | मेघालय | ४८ |
| ५ | आसाम | ९६ | २० | हरियाणा | ४७ |
| ६ | अरुणाचल प्रदेश | ८९ | २१ | मध्यप्रदेश | ४३ |
| ७ | नागालँड | ८५ | २२ | तामिळनाडू | ४२ |
| ८ | झारखंड | ७७ | २३ | आंध्रप्रदेश | ३९ |
| ९ | उत्तरप्रदेश | ७४ | २४ | मिझोराम | ३० |
| १० | जम्मू आणि काश्मीर | ७२ | २५ | तेलंगण | २८ |
| ११ | राजस्थान | ७१ | २६ | महाराष्ट्र | २१ |
| १२ | उत्तराखंड | ७० | २७ | छत्तीसगड | १९ |
| १३ | गोवा | ६१ | २८ | कर्नाटक | १५ |
| १४ | पंजाब | ६० | २९ | गुजरात | ०९ |
| १५ | बिहार | ६० | | | |

**स्त्रोत :** रोजगार-बेरोजगारीचा पाचवा वार्षिक सर्वेक्षण अहवाल (२०१५-१६), भारत सरकार

**शोधा पाहू :**

वरील तक्त्याच्या क्रमांकाच्या आकडेवारीच्या आधारे दुसरे चतुर्थक ($Q_2$) काढा आणि मध्यभागी येणाऱ्या राज्याचे विभाजन मूल्य शोधा.

### बेरोजगारीची कारणे :

१) **रोजगारविरहित वाढ :** भारतातील रोजगाराच्या वाढीचा दर हा आर्थिक वृद्धीपेक्षा फार कमी आहे. वाढत्या श्रमशक्तीला सामावून घेण्याइतका तो पुरेसा नाही. त्यामुळे बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे.

२) **श्रमशक्तीतील वाढ :** मृत्यूदर वेगाने घटला असताना जन्मदर मात्र त्याच प्रमाणात कमी न झाल्याने देशाची लोकसंख्या मात्र वाढली आहे. यामुळे श्रमशक्तीचा विस्तार झालेला असून त्यातून बेरोजगारी वाढलेली आहे.

३) **यांत्रिकीकरणाचा अतिरिक्त वापर :** भारतात मनुष्यबळ मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. कार्यक्षमतेने काम करणाऱ्या मनुष्यबळामुळे देशाकडे श्रमप्रधान उत्पादनाचे तंत्र वापरणे सोईचे असते. परंतु, उद्योगाबरोबरच शेतीक्षेत्रात देखील कामगाराच्या जागी भांडवलाचा वापर होत आहे. जिथे भांडवल मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे आणि मनुष्यबळ मर्यादित आहे तिथे स्वयंचलित यंत्रांचा वापर योग्य ठरतो. इतर अत्याधुनिक तंत्रज्ञानही तर्कसंगत व न्याय्य आहे, पण भारतासारख्या देशात अशा धोरणामुळे बेरोजगारीत वाढ होत आहे.

४) **कौशल्य विकास कार्यक्रमाचा अभाव :** भारताच्या लोकसंख्येचा मोठा भाग अशिक्षित व अकुशल मनुष्यबळाचा आहे. भारतीय उद्योगांना पूरक असे शैक्षणिक अभ्यासक्रम मर्यादित स्वरूपात उपलब्ध आहेत. व्यावसायिक व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची कमतरता असल्यामुळे उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत नाही.

५) **रोजगाराची अपेक्षा :** भारतातील सुशिक्षित बेरोजगार

पांढरपेशा व्यवसायात नोकरी करण्यास तयार असतात. नावीन्यपूर्ण व उद्यमशीलतेच्या कमतरतेमुळे स्वयंरोजगाराचा अभाव दिसून येतो. जोपर्यंत अपेक्षित पगार आणि कामाच्या स्वरूपानुसार रोजगार मिळत नाही तोपर्यंत पदवीधारक बेरोजगार राहण्यास पसंत करतात.

६) **शेतीचे हंगामी स्वरूप :** भारतातील शेती हा व्यवसाय हंगामी स्वरूपाचा आहे. शेती पावसावर अवलंबून आहे. जलसिंचनाच्या सुविधांचा अभाव, कमी प्रतीची सुपीक जमीन, कालबाह्य उत्पादन तंत्र, प्रमाणित बियाणांची व खतांची कमतरता असल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी झाली आहे. वर्षातून काही महिन्यांसाठी रोजगार मिळतो आणि काही महिने रोजगार उपलब्ध नसतो, त्यामुळे शेतमजुरांच्या श्रमशक्तीचा वापर होत नाही.

७) **आर्थिक विकासाचा कमी दर :** भारताचा एकूण आर्थिक विकास दर कमी आहे. औद्योगिक विस्ताराच्या अभावामुळे सिंचनाच्या सुविधांचा अभाव, खते, पायाभूत सुविधांचा अभाव निर्माण होतो. याचा परिणाम म्हणजेच रोजगाराच्या संधी ग्रामीण क्षेत्रात पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने वाढत्या श्रमशक्तीला सामावून घेऊ शकत नाही.

८) **ग्रामीण लोकसंख्येचे स्थलांतर :** रोजगाराच्या शोधासाठी ग्रामीण भागातून नागरी भागात लोकसंख्येचे सातत्याने स्थलांतर होत आहे. त्यामुळे नागरी भागात बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

**तुम्हांला माहीत हवं :**

**बेरोजगारीचे परिणाम**

| **आर्थिक परिणाम** | **सामाजिक परिणाम** |
|---|---|
| १) मानवी संसाधनाचा अपव्यय | १) सामाजिक तणाव आणि अशांतता |
| २) कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचा अभाव | २) मानवी मूल्यांचा ऱ्हास |
| ३) दारिद्र्य व उत्पन्न विषमता | ३) अगतिकता |
| ४) अनौपचारिक क्षेत्राची वाढ | |
| ५) अनुत्पादक लोकसंख्येचा वाढता भार | |

**तुम्हांला माहीत हवं :**

**बेरोजगारी कमी करण्याचे सामान्य उपाय**

१) शेती क्षेत्राचा विकास
२) पर्यायी व्यवसायाची सोय
३) पायाभूत सुविधांचा विकास
४) शिक्षण पद्धतीतील सुधारणा
५) पर्यटनाचा विकास
६) श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर
७) माहिती तंत्रज्ञान व संदेशवहनाचा विस्तार
८) व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य विकासासाठी तरतूद
९) ग्रामीण औद्योगीकरण
१०) स्वयंरोजगाराला प्रेरणा

**भारतातील बेरोजगारी कमी करण्यासाठी शासनाने केलेल्या विशेष उपाययोजना :**

१) **रोजगार हमी योजना (EGS) :** रोजगार हमी योजना ही सर्वप्रथम महाराष्ट्र सरकारने २८ मार्च १९७२ रोजी सुरू केली. याचा प्रमुख उद्देश ग्रामीण जनतेसाठी उत्पादनक्षम रोजगार पुरविणे असून, ग्रामीण बेरोजगाराची व दारिद्र्याची समस्या सोडविणे हा आहे. या योजनेअंतर्गत सरकारने किमान रोजगार पुरविण्याची हमी दिलेली आहे. या योजनेचे महाराष्ट्रातील यश पाहता भारतातील इतर राज्यांनी ही योजना अंमलात आणली आहे.

२) **स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (SGSY) :** ही योजना एप्रिल १९९९ मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) व इतर योजनांचे पुनर्गठन करून सुरू करण्यात आली आहे. ही ग्रामीण भागातील गरिबांसाठी एकमेव स्वयंरोजगार योजना आहे.

३) **स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (SJSRY) :** ही योजना डिसेंबर १९९७ मध्ये सुरू झाली आहे. ही योजना शहरी बेरोजगारांना व अर्ध रोजगारांना फायदेशीर रोजगार पुरविते. यामध्ये स्वयंरोजगार, महिला स्वयं रोजगार कार्यक्रम, रोजगार प्रोत्साहनासाठी कुशल प्रशिक्षण व

शहरी वेतन रोजगार कार्यक्रम सामावलेले आहेत.या योजनेसाठी केंद्र सरकार ७५% व राज्य सरकार २५% खर्च करते.

४) **प्रधानमंत्री रोजगार योजना (PMRY) :** ही योजना १९९३ पासून लागू केली असून या योजनेअंतर्गत लाखो सुशिक्षित बेरोजगार तरुणांना शाश्वत स्वरूपाच्या स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

५) **ग्रामीण युवक प्रशिक्षण व स्वयंरोजगार योजना (TRYSEM) :** ग्रामीण तरुणांमध्ये बेरोजगारीची समस्या सोडविणे या उद्देशाने या योजनेचा प्रारंभ १९७९ साली झाला. तसेच या योजनेचे ध्येय साधारणतः २ लाख ग्रामीण युवकांना दरवर्षी प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करणे हे आहे. TRYSEM ही योजना स्वर्णजयंती ग्राम स्वयं रोजगार योजनेत १९९९ मध्ये विलीन करण्यात आली.

६) **जवाहर रोजगार योजना (JRY) :** मागासलेल्या १२० जिल्ह्यांना रोजगार पुरविण्याच्या हेतूने १ एप्रिल १९८९ मध्ये सरकारने जाहीर केलेली नवीन वेतन रोजगार योजना म्हणजे जवाहर रोजगार योजना होय. एप्रिल १९९९ पासून ही योजना ग्रामीण भागासाठी मर्यादित राहून जवाहर ग्राम समृद्धी योजना (JGSY) या नावाने ओळखली जाते.

७) **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) :** २ ऑक्टोबर २००९ पासून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत एका वित्तीय वर्षात ग्रामीण भागाच्या प्रत्येक कुटुंबातील किमान एक प्रौढ व्यक्तीला अकुशल स्वरूपाचे काम उपलब्ध करून देण्याची हमी व किमान १०० दिवस वेतन देण्याची हमी दिली जाते.

८) **दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना–२०१४ :** ग्रामीण विकास मंत्रालयाने २३ सप्टेंबर २०१४ रोजी कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाशी संलग्न असलेली ही एक महत्त्वाची योजना जाहीर केली. या योजनेचे ध्येय दारिद्र्य कमी करणे, फायदेशीर व शाश्वत रोजगार नियमित वेतन देऊन पुरविणे असा आहे. या कार्यक्रमाअंतर्गत गरीब कुटुंबातील १५–३५ वयोगटाच्या ग्रामीण युवकांना तीन महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर नियुक्ती दिली जाते.

९) **कौशल्य विकास आणि उद्योजकता विकासासाठीचे राष्ट्रीय धोरण (२०१५) :** कौशल्य विकासासाठी पहिले राष्ट्रीय धोरण २००९ मध्ये जाहीर करण्यात आले. हे धोरण खाजगी क्षेत्रातील सहभागी नवउपक्रमशील उपक्रमांना प्रोत्साहन देते.

या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे संयोजन कौशल्य वाढवून विविध घटकांना बळकटी देणे हा असून यात खालील बाबींचा समावेश होतो.

१) उद्योजकशील संस्कृतीला प्रोत्साहन देणे.

२) उद्योजकांना प्रोत्साहन देऊन उद्योग व्यवसायाचे पर्याय उपलब्ध करून देणे.

३) महिलांना उद्योगशील बनण्यास प्रोत्साहन देणे.

१०) **स्टार्ट अप इंडिया पुढाकार :** स्टार्ट अप इंडिया पुढाकार हा उपक्रम शासनाने जानेवारी २०१६ मध्ये सुरू केला. भारतातील होतकरू आणि प्रतिभासंपन्न तरुणांना प्रोत्साहित करण्यास व उद्योग उभारण्यास बळ देणारी एक नावीन्यपूर्ण आणि जनकल्याणकारी बाब आहे.

११) **प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (२०१६–२०२०) :** या योजनेचा मुख्य उद्देश तरुणांमध्ये कौशल्य विकास करणे हा आहे. या योजनेअंतर्गत युवकांना यशस्वीरीत्या कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केल्याबद्दल मोबदला पैशांच्या स्वरूपात देऊन कौशल्यविकासास प्रोत्साहन दिले जाते. यासाठी शासनाने २०२० पर्यंत ₹ १२ हजार कोटींची तरतूद केली आहे.

## स्वाध्याय

### प्र. १. विसंगत शब्द ओळखा :

१) शहरी भागातील बेकारी –
सुशिक्षित बेकारी, औद्योगिक बेकारी, छुपी बेकारी, तांत्रिक बेकारी

२) राज्यांचा बेरोजगारीच्या दराचा चढता क्रम–
गोवा, पंजाब, महाराष्ट्र, त्रिपुरा

३) रोजगार हमी योजना १९७२,
जवाहर रोजगार योजना १९८९,
स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना १९९९,
पर्यटनाचा विकास

### प्र. २. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा :

१) हुसेन शेख यांनी त्यांच्या शेतातील काम यावेळेस आधीपेक्षा सात मजूर कमी वापरून केले तरी उत्पादन तेवढेच राहिले.

२) नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे छपाई उद्योगात अनेक कामगारांचे रोजगार कमी झाले.

३) सतिशचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाले आहे व तो आतुरतेने नोकरीच्या प्रतिक्षेत आहे.

४) महाराष्ट्रातील काही भागांत फक्त खरिपाची पिकेच होतात त्यामुळे या भागातील रोजगार ऑक्टोबरपर्यंत असतो.

### प्र. ३. सहसंबंध पूर्ण करा :

१) हंगामी बेरोजगारी : पर्यटन मार्गदर्शक :: ☐ पदवीधारक

२) ☐ प्रच्छन्न बेरोजगार :: नागरी बेरोजगारी : औद्योगिक बेरोजगारी

३) संघर्षजन्य बेरोजगारी : कच्च्या मालाचा अभाव :: ☐ व्यवसायातील चढ–उतार

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) : वेतनाची हमी देणारा रोजगार :: ग्रामीण तरुणांसाठी स्वयं रोजगार व प्रशिक्षण (TRYSEM) : ☐

५) ☐ संसाधनाचा अपव्यय :: सामाजिक परिणाम : मानवी मूल्यांचा ऱ्हास

### प्र. ४. खालील तक्त्याचे निरीक्षण करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.




१) एक ज्यादा कामगार कामावर घेतल्याने उत्पादनात वाढ होत नाही आणि कामगाराला कमी केल्यास उत्पादनात घटही होत नाही ही कोणत्या प्रकारची बेरोजगारी आहे.

२) संगणकाच्या वापरामुळे कामगाराला कामावरून कमी केले ही कोणत्या प्रकारची बेरोजगारी आहे.

३) माहिती क्षेत्रातील मंदीमुळे शरद अमेरिकेतून भारतात परत आला. ही कोणत्या प्रकारची बेकारी आहे.

४) पदवीधर असूनही वसंत घरी बसून आहे.

### प्र. ५. खाली दिलेल्या बेरोजगारीच्या दराच्या आधारे पहिले चतु–र्थक ($Q_1$) आणि तिसरे चतुर्थक ($Q_3$) काढा :

| वर्ष | बेरोजगारीचा दर % |
|---|---|
| २००९ | ३.७५ |
| २०१० | ३.५४ |
| २०११ | ३.५३ |
| २०१२ | ३.६२ |
| १०१३ | ३.४६ |
| २०१४ | ३.४१ |
| २०१५ | ३.४९ |
| २०१६ | ३.५१ |
| २०१७ | ३.५२ |

### प्र. ६. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :

१) औद्योगिक बेरोजगारीचे प्रकार स्पष्ट करा.

२) भारतातील बेरोजगारीची कारणे स्पष्ट करा.

३) बेकारी कमी करण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

◈◈◈

# प्रकरण – ८ : भारतातील दारिद्र्य



आकृती ८.१ दारिद्र्य

**प्रस्तावना :**

दारिद्र्य ही भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक प्रमुख आव्हान असून आर्थिक व सामाजिक घटकांशी निगडित आहे. काही व्यक्ती किंवा समूहाला समाजापासून वंचित करणारा घटक म्हणून दारिद्र्याकडे पाहिले जाते. मूलभूत गरजांपासून वंचित राहणे किंवा उपलब्ध संधी नाकारणे यामुळे समाजातील काही व्यक्ती किंवा समूह मुख्य प्रवाहापासून दूर जातात.

आकृती ८.१ ही दारिद्र्य या संकल्पनेची माहिती देते.

भारतातील दारिद्र्याला दीर्घ इतिहास आहे. ब्रिटिश काळात हस्त व कुटिरोद्योगांचा ऱ्हास, साधन सामग्रीचे आर्थिक निःसारण, दडपशाहीचे आर्थिक धोरण, सातत्याने पडणारे दुष्काळ इत्यादी कारणांमुळे भारतीय लोकसंख्येचा मोठा भाग दारिद्र्यात जीवन जगत होता.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमावर भारत सरकारने भर दिला आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी भारत सरकारने आर्थिक नियोजन, आर्थिक सुधारणा, गरीबी हटाओ यांसारखे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम राबविले आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली आहे.

**दारिद्र्याचा अर्थ :**

पारंपरिक अर्थानुसार दारिद्र्य म्हणजे समाजातील व्यक्ती पुरेशा उत्पन्नाअभावी अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाही अशी स्थिती होय.

**बहुआयामी दारिद्र्य :**

दारिद्र्याची पारंपरिक संकल्पना केवळ मूलभूत गरजांशी निगडित होती, परंतु आधुनिक युगात दारिद्र्याच्या संकल्पनेची व्याप्ती वाढली. म्हणून बहुआयामी दारिद्र्याची संकल्पना उदयास आली.

बहुआयामी दारिद्र्य म्हणजे भौतिक व अभौतिक परिमाणांपासून वंचित राहणे होय. भौतिक परिमाणाचा संबंध अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, वीज, रस्ते बांधणी, पिण्याच्या शुद्ध पाण्याची उपलब्धता यांच्याशी संबंधित आहे. तसेच अभौतिक परिमाणांचा संबंध समाजातील विविध भेदाभेदाशी संबंधित आहे.

**तुम्हांला माहीत हवं :**

**प्रा. अमर्त्य सेन** यांच्या मते, "दारिद्र्य म्हणजे केवळ पैसा कमी असणे नव्हे तर मानवी जीवनात अनार्थिक क्षमतेचा अभाव असणे होय. या क्षमतांचा संबंध आर्थिक, सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याशी असतो. पौष्टीक व पुरेसे अन्न, आरोग्याची सुविधा, शैक्षणिक सुविधा, राजकीय व नागरी स्वातंत्र्य इत्यादींच्या कमतरतेचा संबंध दारिद्र्याशी येतो.

**तुम्हांला माहीत आहे का?**



**प्रा. अमर्त्य सेन**

भारतीय अर्थतज्ज्ञ व भारतरत्न पुरस्कार सन्मानित प्रा. अमर्त्य सेन यांना १९९८ मध्ये कल्याणकारी अर्थशास्त्र, सामाजिक निवडीचे सिद्धांत, समाजातील अतिदुर्बल घटकांच्या समस्यांबाबत रुची यांसारख्या योगदानाबद्दल अर्थशास्त्राचा 'नोबेल स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या 'Poverty and Famines': An

Essay on Entitlement and Deprivation (१९८१): या पुस्तकात आर्थिक दुर्बल घटकांच्या वेदनांचा विचार तर आहेच, त्याचबरोबर त्यांच्या उत्पन्न वाढीबाबतचे विचार मांडले आहेत. तसेच आर्थिक वृद्धींसाठी सार्वजनिक आरोग्य व शिक्षणातील सुधारणांसारख्या सामाजिक सुधारणांवर भाष्य केले आहे.

**सांगा पाहू :**

- भारताच्या अर्थव्यवस्थेची विभागणी ग्रामीण व शहरी भागांमध्ये जाणवते.
- देशात उत्पन्न आणि संपत्तीचे न्याय्य वितरण आहे.
- सर्व नागरिकांना समान शिक्षण, आरोग्य, ऊर्जा व पिण्याचे पाणी मिळते.
- देशामध्ये भूक, उपासमार व कुपोषण इत्यादी दिसून येत नाही.
- देशामध्ये स्वच्छतेच्या सुविधांचा अभाव आहे.
- सर्व राज्यांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण समान आहे.

## दारिद्र्याच्या संकल्पना :

भारतातील दारिद्र्य हे बहुआयामी आहे. भारतात दारिद्र्याच्या निरपेक्ष दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य अशा प्रमुख संकल्पना आहेत.

**अ) निरपेक्ष दारिद्र्य :** निरपेक्ष दारिद्र्य हे किमान उपभोगाच्या गरजांनुसार मोजले जाते. नियोजन आयोगानुसार ग्रामीण क्षेत्रामध्ये दररोज प्रति व्यक्ती उष्मांकाचे प्रमाण २४०० उष्मांक असून, शहरी क्षेत्रामध्ये २१०० उष्मांक इतके आहे. प्रत्येक व्यक्तीला सरासरी २२५० उष्मांकाची गरज असते.

किमान उत्पन्नाच्या अभावामुळे अन्नामधून उष्मांकाची समाधानकारक अशी पातळी प्राप्त न झाल्यामुळे निरपेक्ष दारिद्र्य वाढते. बहुतांशी प्रमाणात हे दारिद्र्य जगातील विकसनशील देशांमध्ये आढळून येते. परिणामकारक दारिद्र्य उपाययोजनेद्वारे निरपेक्ष दारिद्र्याचे निर्मूलन होऊ शकते.

**शोधा पाहू.**

निरपेक्ष दारिद्र्य असलेल्या ५ देशांची नावे जागतिक बँकेच्या अद्ययावत अहवालातून शोधा.

**ब) सापेक्ष दारिद्र्य :** सापेक्ष दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट करणे अवघड आहे.

विविध राहाणीमानांच्या दर्जांची तुलना केल्यानंतर सापेक्ष दारिद्र्याची कल्पना येते. या दारिद्र्याचा अभ्यास उत्पन्न पातळी, संपत्ती, उपभोग खर्च, आर्थिक निष्क्रियता (बेरोजगारी, वृद्धत्व इत्यादी) यांच्या परस्पर तुलनेमधून केला जातो. सापेक्ष दारिद्र्य हे जगातील सर्व देशांमध्ये आढळून येते.

सापेक्ष दारिद्र्य पूर्णपणे निर्मूलन करता येत नाही. योग्य धोरण व उपाययोजनांमुळे सापेक्ष दारिद्र्याचे निर्मूलन काही प्रमाणात होऊ शकते.

## दारिद्र्यरेषा :

दारिद्र्यरेषा ही अशी काल्पनिक रेषा आहे जी गरीब व गरीबेतर यांमध्ये वर्गीकरण करते. ती प्रत्येक व्यक्तीच्या दैनंदिन खर्चाशी निगडित असते. विविध समित्या आणि अभ्यासगटांनी दारिद्र्यरेषेची संकल्पना विविध प्रकारे स्पष्ट केली आहे.

निती आयोगाने दारिद्र्य निर्मूलनासाठी नेमलेल्या कार्यगटाच्या व्याख्येनुसार 'सामाजिकदृष्ट्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व सेवा खरेदी करण्याकरिता जो खर्च येतो त्या प्रारंभिक खर्चाच्या पातळीस दारिद्र्यरेषा म्हणतात'.

दारिद्र्यरेषेचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे :

१) दारिद्र्यरेषेच्या वर (APL), दारिद्र्यरेषेच्या खाली (BPL) असणारी लोकसंख्या ठरविणे.

२) कुटुंबाच्या उपभोग खर्चावरून दारिद्र्याची ओळख पटविणे.

३) वेळोवेळी दारिद्र्याचा मागोवा घेऊन प्रदेशांची तुलना करणे.

४) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासाठी आवश्यक खर्चाचा अंदाज बांधणे.

दारिद्र्यरेषा ही प्रत्येक राष्ट्रांनुसार बदलते. जागतिक बँकेच्या अहवालानुसार दारिद्र्यरेषा ही २०११ च्या

किमतीनुसार दरडोई दर दिवशी $१.९० इतकी क्रयशक्तीच्या समानतेवर आधारित आहे. क्रयशक्तीच्या (PPP) आधारानुसार भारतातील २१.२% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे.

**सांगा पाहू :**

खाली दिलेल्या उत्पन्न मनोऱ्यात व्यक्तींचे उत्पन्नानुसार वर्गीकरण करा.

१) कंत्राटी कामगार

२) दुकानातील विक्रेता

३) बहुराष्ट्रीय कंपनीमधील मुख्याधिकारी (CEO)

४) कंपनीमधील विशेषाधिकारी




**उत्पन्न मनोरा**

## दारिद्र्याचे प्रकार :

**१) ग्रामीण दारिद्र्य :** ग्रामीण भागातील विशिष्ट क्षेत्रातील लोकांना मूळ गरजांपासून वंचित राहणे याला ग्रामीण दारिद्र्य असे म्हणतात. हे दारिद्र्य सीमांत व अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, कंत्राटी कामगार, इत्यादीमध्ये दिसून येते. शेतीतील कमी उत्पादकता, दुष्काळ, निकृष्ट ग्रामीण पायाभूत सुविधा, पर्यायी रोजगाराची कमतरता, ग्रामीण कर्जबाजारीपणा, निरक्षरता इत्यादींमुळे ग्रामीण दारिद्र्यात वाढ झाली आहे.

**२) शहरी दारिद्र्य :** शहरी भागातील विशिष्ट क्षेत्रातील लोकसंख्येत मूळ गरजांची कमतरता असते त्यास शहरी दारिद्र्य म्हणतात. शहरी दारिद्र्य मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील लोकांचे झालेले वाढते स्थलांतर, न परवडणारी घरे, निरक्षरता, मंद गतीने औद्योगिक वृद्धी व पायाभूत सुविधांची कमतरता या कारणांमुळे वाढते आहे. शहरी दारिद्र्यामुळे झोपडपट्टी वाढ व अनौपचारिक क्षेत्रात वाढ होते तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो.

**शोधा पाहू :**

अनौपचारिक क्षेत्राबद्दलची माहिती गोळा करा व तुमच्या निरीक्षणानुसार काही उपक्रम नमूद करा.

**तुम्हांला माहीत आहे का?**

दारिद्र्यरेषेच्या वर राहण्यासाठी खालील बाबी आवश्यक आहेत




**हे करून पहा :**

१) दर महिन्याला तुमच्या घरात खरेदी केल्या जाणाऱ्या खाद्य आणि खाद्येतर पदार्थांची यादी तयार करा.

२) तुमच्या कुटुंबात चालू किमतीनुसार दरमहा केला जाणारा एकूण उपभोग खर्च दाखवा.

३) कुटुंबाचा दरमहा यानुसार खर्च किती ते सांगा.

## भारतातील दारिद्र्याचा विस्तार :

एकूण लोकसंख्येतील दारिद्र्याचे प्रमाण हे दारिद्र्य गुणोत्तराने मोजले जाते. त्यावरून दारिद्र्याचा विस्तार निश्चित केला जातो. भारतातील दारिद्र्य विस्ताराचा अभ्यास करण्यासाठी वैयक्तिक स्तरावर अर्थशास्त्रज्ञांनी, संशोधन संस्थांनी योगदान दिले आहे. १९६२ पासून नियोजन आयोगाने विविध काम करणारे कार्यक्षम कार्यगट, तज्ज्ञ समिती भारतातील दारिद्र्याच्या मोजणीसाठी नेमल्या आहेत.

## दारिद्र्याचा अंदाज

पूर्वीची दारिद्र्यरेषा ही उष्मांकाच्या उपभोगावर अवलंबून होती. त्यात इतर वस्तूंच्या उपभोगाचा समावेश नव्हता. भारत

सरकारने वेळोवेळी दारिद्र्यरेषा मोजण्यासाठी वेगवेगळ्या समित्यांची नियुक्ती केली. डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली २०१२ साली तज्ज्ञांचा एक गट नेमला होता. या गटाने २०१४ मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार ग्रामीण व नागरी भागाकरिता दारिद्र्यरेषा निश्चित केली ती पुढीलप्रमाणे :

तक्ता क्र. ८.१ मध्ये रंगराजन गटाच्या अहवालानुसार दारिद्र्याचा अंदाज दर्शविला आहे.

**दारिद्र्याचा दर (२०११-१२)**

| दारिद्र्यरेषा (उपभोग खर्च रुपयात) | | दारिद्र्य गुणोत्तर(%) | | |
|---|---|---|---|---|
| **ग्रामीण** | **शहर** | **ग्रामीण** | **शहर** | **एकूण** |
| रू.९७२/- प्रति महिना रू.३२/- प्रति दिवस प्रति व्यक्ती | रू.१४०७/- प्रति महिना रू.४७/- प्रति दिवस प्रति व्यक्ती | ३०.९% | २६.४% | २९.५% |

**तक्ता क्र. ८.१**

**स्त्रोत :** भारत सरकार, नियोजन आयोग अहवाल (जून २०१४)

**राज्यनिहाय दारिद्र्याची टक्केवारी**

| राज्य | दारिद्र्याचा दर (२०११-१२) टक्केवारी | राज्य | दारिद्र्याचा दर (२०११-१२) टक्केवारी |
|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ९.२० | केरळ | ७.१ |
| आसाम | ३१.९ | मध्यप्रदेश | ३१.७ |
| बिहार | ३३.७ | महाराष्ट्र | १७.४ |
| छत्तीसगड | ३९.९ | ओडिसा | ३२.६ |
| गुजरात | १६.६ | पंजाब | ८.३ |
| हरियाणा | ११.२ | राजस्थान | १४.७ |
| हिमाचल प्रदेश | ८.१ | तामिळनाडू | ११.३ |
| जम्मू आणि काश्मीर | १०.४ | उत्तरप्रदेश | २९.४ |
| झारखंड | ३६.९ | उत्तराखंड | ११.३ |
| कर्नाटक | २०.९ | पश्चिम बंगाल | १९.९ |

**तक्ता क्र.८.२** **स्त्रोत :** आर्थिक पाहणी अहवाल २०१७-१८

**शोधा पाहू :**

वरील माहितीच्या आधारे तिसरे चतुर्थक ($Q_3$) व दहावे शतमक ($P_{10}$) काढा व त्यानुसार राज्यांची नावे लिहा.

**दारिद्र्याची कारणे :** भारतातील दारिद्र्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) **लोकसंख्येचा विस्फोट :** जलदगतीने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या मानाने गरजा भागवण्यासाठी असणाऱ्या साधनसंपत्तीचे वाटप असमान आहे, त्यामुळे मुख्य गरजा पूर्ण न झाल्याने दारिद्र्याचा विस्तार झाला आहे.

२) **आर्थिक वृद्धीचा मंद वेग :** शेती व औद्योगिक क्षेत्रातील मंद गतीने होणारी वृद्धी आणि राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नातील वृद्धी दर सुसंगत नाही. बऱ्याच राज्यांत सरासरी राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा दरडोई उत्पन्न कमी आहे. यामुळे दारिद्र्य निर्माण होऊन लोकांच्या राहणीमानाचा दर्जा खालावलेला आहे.

३) **बेरोजगारी व अर्ध बेरोजगारी :** ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्याचे प्रमाण वाढण्याचे कारण बेरोजगारी व अर्ध बेरोजगारी आहे.

४) **आर्थिक विषमता :** मोठ्या प्रमाणातील आर्थिक विषमतेमुळे दारिद्र्याची व्याप्ती वाढली आहे. उदा. उत्पन्न, मालमत्ता, उपभोगखर्च, कर्जसुविधा, शेतजमिनीचे वाटप इत्यादींमध्ये विषमता.

५) **पायाभूत सुविधांची दुर्लभता :** क्रयशक्तीच्या अभावामुळे ऊर्जा, वाहतूक, संदेशवहन, आरोग्य व शिक्षण इत्यादी पायाभूत सुविधा वापरता येत नाहीत. त्यामुळे दरिद्री अजून दरिद्री होत आहेत.

६) **चलनवाढ :** चलनवाढ म्हणजे सातत्याने जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत होणारी वाढ होय. उदा. खाद्य पदार्थ. अन्नधान्याची वाढती मागणी आणि कमी पुरवठ्यामुळे किमतीत प्रचंड वाढ होते. त्यामुळे क्रय शक्ती कमी होऊन गरीब आणखी गरीब होतात. अन्न संकटामुळे लोकांमध्ये उपासमार, कुपोषण इत्यादींत वाढ झाली आहे.

७) **प्रादेशिक असंतुलन :** प्रादेशिक असंतुलन हे दारिद्र्याचे एक कारण आहे. ओरिसा, मध्यप्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश व आसाम ही राज्ये आर्थिक विकासामध्ये मागासलेली असून त्यांचे दारिद्र्याचे गुणोत्तर जास्त आहे.

८) **दारिद्र्याचे दुष्टचक्र :** ही संकल्पना प्रा. रॅग्नर नर्क्स यांनी मांडली आहे. अनेक भारतीय दारिद्र्याच्या दुष्टचक्रात

अडकले असून परिणामी राष्ट्रीय उत्पन्नात घट, दरडोई उत्पन्न कमी, कमी उपभोग, कमी भांडवल निर्मिती, कमी बचत, कमी उत्पादन व रोजगारीत घट झाली आहे. आकृती क्र.८.२ ही दारिद्र्याचे दुष्टचक्र स्पष्ट करते.




आकृती ८.२ दारिद्र्याचे दुष्टचक्र

**९) इतर घटक :**

- नैसर्गिक आपत्तींची पुनरावृत्ती
- जात, धर्म, वर्ण व लिंगभेदभाव
- प्रशासकीय अकार्यक्षमता व भ्रष्टाचार
- सार्वजनिक वितरण पदधतीतील अडथळे

**तुम्हांला माहीत हवं :**

**दारिद्र्याचे परिणाम**

- देशाची आर्थिक प्रगती दारिद्र्यामुळे लांबणीवर पडते.
- राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न कमी होते.
- राहणीमान खालावलेले असते.
- बचत, गुंतवणूक व भांडवल निर्मिती कमी होते.
- आर्थिक शक्ती तीव्र होते व संधीची असमानता निर्माण होते.
- श्रीमंत व गरीब वर्गात मतभेद होतात.
- दारिद्र्यामुळे समाज व राष्ट्रविरोधी कारवाया यामध्ये वाढ होते.
- कल्याणकारी कार्यक्रमावरील अनुदान वाढीमुळे सरकारी खर्चात वाढ झाल्याने साधनसपंत्तीचे असमान वाटप झाले आहे.
- दारिद्र्यामुळे आर्थिक हालाखीत व कष्टप्रद जीवन जगावे लागते.
- दारिद्र्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो.

**तुम्हांला माहीत हवे :**




संयुक्त राष्ट्र 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स' चा अहवाल सप्टेंबर २०१५ रोजी आंतरराष्ट्रीय समुदायाने स्वीकारला असून त्यात पूर्णपणे सामाजिक, आर्थिक व पर्यावरणविषयक परिणामांचा समावेश केला आहे. SDGs मध्ये वैश्विक करार करून दारिद्र्याचे स्वरूप व परिणाम पूर्णपणे संपवणे याचा समावेश केला आहे. त्यामध्ये १७ SDGs असून १६९ ध्येय २०३० पर्यंत संपादित करणे असे आहे. SDGs ना आकार देण्यात भारताची एक मुख्य भूमिका आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या दृष्टीने भारताला आदराचे स्थान असल्यामुळे २०३० या वर्षापर्यंत दारिद्र्य निर्मूलनासाठी शाश्वत विकासाचे ध्येय कटिबद्ध मानले गेले आहे.

**दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय :** दारिद्र्य निर्मूलनासाठी धोरणामध्ये खालील उपाय केले आहेत.

**१) लोकसंख्येवर नियंत्रण :** कुटुंब कल्याण कार्यक्रम व लोकसंख्येचे धोरण यामुळे वेळोवेळी लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवले आहे.

**२) शेती :** शेतीसाठी लागणारी आदाने विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांना स्वस्त दरात कृषी सुविधा पुरविल्या जातात. सरकारने शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळावे म्हणून काही पिकांसाठी किमान आधारभूत किमती जाहीर केल्या आहेत.

३) **ग्रामीण कामे :** ग्रामीण भागातील रस्त्यांची बांधणी, लघु जलसिंचन सुविधा निर्मिती, ग्रामीण विद्युतीकरण इत्यादी कामाद्वारे गरिबांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे.

४) **ग्रामीण औद्योगीकरण :** ग्रामीण भागात रोजगार पुरविण्यासाठी लघुउद्योग व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन दिले आहे.

५) **किमान वेतन :** १९४८ मध्ये किमान वेतन कायदा संमत झाला. त्याअंतर्गत मजुरांना न्याय्य मोबदला देण्याची तरतूद करण्यात आली आणि त्यात वेळोवेळी बदल करण्यात आले.

६) **सार्वजनिक वितरण व्यवस्था :** सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे गरिबांना सवलतीच्या दराने शिधा वाटप केंद्राद्वारे अन्नधान्य वितरण व अन्नसुरक्षा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे गरीब कुटुंबामध्ये अन्नधान्याची निश्चिती झाली आहे.

७) **बँकांचे राष्ट्रीयीकरण :** आर्थिक अंतर्भाव करण्याच्या हेतूने गरीब लोकांना कमी व्याजदरात पतसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १९६९ व १९८० साली बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

८) **प्रगतिशील कर धोरण :** उत्पन्न विषमता कमी करण्यासाठी प्रगतिशील कर पद्धत अंमलात आली.

९) **शिक्षण :** प्राथमिक शिक्षण हे सगळ्यांना मोफत व सक्तीचे केले आहे. विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढविण्यासाठी शाळेमध्ये पेयजल, स्वच्छतागृह सुविधा, मुलींसाठी मोफत शिक्षण, माध्यान्ह भोजन योजना हे कार्यक्रम सुरू केले आहेत.

१०) **स्वस्त गृहनिर्माण योजना :** ग्रामीण व नागरी भागातील गरिबांसाठी पुनर्वसन कार्यक्रम व स्वस्त दरात घरे देण्याची सुविधा पुरविली आहे.

११) **आरोग्याच्या सुविधा :** गरिबांना सवलतीच्या दरात वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, सरकारी दवाखाने यांची स्थापना करण्यात आली आहे.

१२) **कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार :** भारतात रोजगार निर्मितीसाठी कौशल्य विकास हा महत्त्वाचा दृष्टिकोन मानला जातो. यासाठी कौशल्यावर आधारित प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या संधीमुळे लोक उद्योजकता किंवा स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहीत होतील.

**हे करून बघा :**

अन्नसुरक्षेच्या खात्रीसाठी महाराष्ट्र सरकारने तीन रंगांचे रेशनकार्ड सुरू केले आहे. अन्नपुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र सरकार यांच्यानुसार उत्पन्न पातळीवर आधारित रेशनकार्डचा रंग ओळखा.

**पांढरे** **केशरी** **पिवळे**




**हे करून बघा :**

खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासोबत जोड्या लावा. अन्न सुरक्षा, रोजगार व स्वयंरोजगार, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, आर्थिक समावेशन, गृहनिर्माण

- रोजगार हमी योजना
- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना
- जन धन योजना
- स्वच्छ भारत अभियान
- सर्व शिक्षा अभियान
- अंत्योदय अन्न योजना
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
- प्रधानमंत्री आवास योजना
- राष्ट्रीय आरोग्य मिशन

**तुम्हांला माहीत आहे का?**

१७ ऑक्टोबर हा जागतिक दारिद्र्य निर्मूलन दिवस मानला जातो.

दारिद्र्यामुळे आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो. दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने सुरू केलेल्या कार्यक्रमांवर वेळोवेळी देखरेख करणे गरजेचे असते. त्यांतील त्रुटी व प्रगती कमी करणाऱ्या घटकांवर परिणामकारक प्रभावी अंमलबजावणी करायला हवी

## स्वाध्याय

### प्र. १. विधान आणि तर्क प्रश्न :

**१) विधान 'अ' :** कृषी उत्पादनातील वाढीबरोबर दारिद्र्याच्या पातळीत घट होते.

**तर्क विधान 'ब' :** हवामानाच्या स्थितीत मोठ्या प्रमाणावर चढ-उतार झाल्यामुळे कृषी उत्पन्नात घट झाली आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधान ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**२) विधान 'अ' :** शहरी दारिद्र्य मुख्यत्वे ग्रामीण लोकांमध्ये स्थलांतरणाच्या प्रभावावर परिणाम करणारे आहे.

**तर्क विधान 'ब' :** ग्रामीण लोक हे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, पर्यायी नोकऱ्यांची कमतरता यामुळे स्थलांतरित झाले.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधान ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**३) विधान 'अ' :** जगातील सर्व देशांमध्ये सापेक्ष दारिद्र्य आढळून येते.

**विधान तर्क 'ब' :** सापेक्ष दारिद्र्य मोजण्यासाठी तुलना करण्यासाठी उत्पन्न पातळीतील फरक हा फक्त एकमेव निकष आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**४) विधान 'अ' :** दारिद्र्यात पैशांच्या कमतरतेबरोबरच कार्यक्षमतेचीही कमतरता आढळून येते.

**विधान तर्क 'ब'** : भूकेचे समाधान न होणे, आरोग्य सेवेची कमतरता, राजकीय स्वातंत्र्य नाकारणे याचे रूपांतर दारिद्र्यामध्ये होते.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**५) विधान 'अ' :** अन्नसुरक्षा, गरिबांना पतपुरवठा सुविधा, सामाजिक सुरक्षिततेची हमी देणे.

**विधान तर्क 'ब' :** प्रशासकीय व्यवस्थेतील गळती दारिद्र्य कायम राखते.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

### प्र. २. विसंगत शब्द ओळखा :

१) रेशनकार्डाचे रंग - पांढरे, हिरवे, केशरी, पिवळे
२) जास्त दारिद्र्य गुणोत्तर - छत्तीसगड, झारखंड, बिहार, केरळ
३) उष्मांक - २४००, १८००, २१००, २२५०

### प्र.३. अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सांगा :

१) समाजातील काही विशिष्ट लोकांना संधी नाकारणे....
२) दारिद्र्याच्या संकल्पनेत भौतिक आणि अभौतिक परिमाणे समाविष्ट केले जातात.
३) लोकांच्या राहणीमानाच्या सापेक्ष दर्जाच्या आधारावर दारिद्र्याचा अभ्यास केला जातो....
४) दारिद्र्याचे पूर्णतः निर्मूलन करता येत नाही.
५) सामाजिकदृष्ट्या स्वीकारल्या जाणाऱ्या पातळीवर मूलभूत मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक खर्चाची गरज भासते.

### प्र.४. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून संकल्पना स्पष्ट करा :

१) बबनची मुलगी अत्यल्प आहारातून मिळणाऱ्या कमी उष्मांकामुळे अशक्त झाली व तिला रुग्णालयात दाखल केले.
२) धनाजीराव मोठे जमिनदार आहेत परंतु त्यांचे वार्षिक उत्पन्न उद्योजक रावबहादूरांपेक्षा कमी आहे.
३) उर्मिच्या कुटुंबाची अवस्था एवढी हालाखीची आहे की त्यांना अन्न, वस्त्र, निवारासारख्या गरजा ही भागवता येत नाहीत.
४) संजयच्या कुटुंबाला पिवळ्या शिधावाटप पत्रिकेद्वारे धान्य मिळते.
५) राज्यामध्ये काही भागांत भूकबळी होतात, तर काही भागांत अन्नाची नासाडी होते असे विदारक चित्र आहे.

### प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात किंवा नाहीत ते सकारण स्पष्ट करा.

१) लोकसंख्या नियंत्रण दारिद्र्य दूर करण्याचा एकमेव उपाय आहे.
२) सापेक्ष दारिद्र्य जगात सर्वत्र आढळते.
३) प्रादेशिक असंतुलन हे दारिद्र्याचे एकमेव कारण आहे.

### प्र. ६. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) भारतातील दारिद्र्याची कारणे स्पष्ट करा.
२) भारतातील दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय स्पष्ट करा.

❖❖❖

# प्रकरण – ९ : भारताचे १९९१ पासूनचे आर्थिक धोरण

## प्रस्तावना :

भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक संकटातून जात होती. विदेशी चलनाचा साठा जून १९९१ मध्ये कमी झाला. त्यातून दोन आठवड्यापर्यंतच आयात करणे शक्य होते. ऑगस्ट १९९१ मध्ये चलनवाढ १६.७% पर्यंत पोहोचली होती.

संरक्षण व्यवस्थेवर होणारा खर्च, अनुदान, कर्जावरचे व्याज इत्यादींमुळे सरकारचा खर्च महसूलापेक्षा जास्त होता. समाजवादी व्यवस्थेचे समाजावर होणारे सकारात्मक परिणाम कमी होत गेले. या पार्श्वभूमीवर नवीन बदल आणणे गरजेचे होते. म्हणून भारत सरकारने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारले.

१९८५ मध्ये सुरू झालेल्या आर्थिक बदल स्वीकारण्याच्या प्रक्रियेत १९९१ मध्ये चालना मिळाली. नवीन औद्योगिक धोरण जाहीर करून त्यामध्ये आमूलाग्र बदल सुचविले गेले. या नवीन धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था नोकरशाहीचे अनावश्यक नियंत्रण आणि क्लिष्ट शासकीय प्रक्रियांपासून मुक्त झाली. नवीन औद्योगिक धोरणानुसार शासन नियंत्रकाच्या आणि नियामकांच्या भूमिकेत न राहता सुविधा पुरविणारे, समन्वय साधणारे, प्रेरणा देणारे आणि पर्यवेक्षकाची भूमिका पार पाडणारे होते.

## १९९१ च्या आर्थिक धोरणाची मुख्य उद्दिष्ट्ये :

१) भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण करणे.

२) चलनवाढीचा दर कमी करणे.

३) आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल सुधारणे.

४) उच्च आर्थिक वृद्धीदर प्राप्त करणे.

५) विदेशी चलनाच्या साठ्यात पुरेशी वाढ करणे.

६) वित्तीय तूट कमी करून आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे.

७) कोणत्याही निर्बंधाशिवाय वस्तूंचा मुक्त प्रवाह होण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय व्यापार संबंध प्रस्थापित करणे.

८) खाजगी क्षेत्राच्या सहभागात वाढ करणे.

## १९९१ च्या आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये :

१) **औद्योगिक परवाना धोरणात शिथिलता :** कोणताही उद्योग सुरू करण्यासाठी औद्योगिक परवाना धोरणात शिथिलता करण्यात आली. नवीन आर्थिक धोरणानुसार त्यावेळच्या सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले १८ उद्योग वगळता इतर उद्योगांना परवानामुक्त करण्यात आले होते. सध्या मात्र चार उद्योगांना परवाना सक्तीचा करण्यात आला आहे. ते उद्योग खालीलप्रमाणे :

   १) सर्व प्रकारची संरक्षण साधने

   २) औद्योगिक स्फोटके

   ३) धोकादायक रसायने, औषध निर्मिती उद्योग

   ४) तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ

२) **मक्तेदारी व निर्बंधित व्यापार नियंत्रण कायद्याचे उच्चाटन (MRTP) :** मक्तेदार व निर्बंधित व्यापार नियंत्रण कायद्याअंतर्गत मोठ्या उद्योगांची स्थापना, विस्तार, विलीनीकरण इत्यादींसाठी केंद्र सरकारची संमती घेणे सक्तीचे होते. त्यामुळे उद्योगांचा वृद्धीदर मंदावला होता. आता हा कायदा रद्द झाल्याने उद्योगांची वाढ होण्यास मदत झाली आहे.

३) **लघु उद्योगांना प्रोत्साहन :** सरकारने लघु उद्योगांना उत्पादन, रोजगार व निर्यात क्षेत्रात उच्च वृद्धीदर वाढविण्यासाठी प्रोत्साहन दिले. या उद्योगातील गुंतवणूक मर्यादा एक कोटी रुपयांपासून पाच कोटी रूपयांपर्यंत वाढविण्यात आली.

४) **विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन (FDI) :** १९९१ च्या औद्योगिक धोरणात उच्च प्राधान्यक्रम असणाऱ्या उद्योगांमध्ये अधिक गुंतवणूक व नवीन तंत्रज्ञान प्राप्त होण्यासाठी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला (FDI) मान्यता देण्यात आली. प्रारंभी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीची मर्यादा ५१ टक्क्यांपर्यंत होती. ही मर्यादा नंतर ७४ टक्क्यांपर्यंत तर बऱ्याच उद्योगांसाठी ती १०० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आली.

५) **सार्वजनिक क्षेत्राची मर्यादित भूमिका :** उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी सार्वजनिक क्षेत्राच्या धोरणात अनेक बदल करण्यात आले आहेत

अ) अनेक क्षेत्रांतील राज्य सरकारची मक्तेदारी संपुष्टात आणणे

ब) सार्वजनिक क्षेत्राची कार्यक्षमता वृद्धींगत करणे.

क) सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उद्योगातील भांडवल काढून घेणे

नवीन आर्थिक धोरणात खाजगीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी सार्वजनिक धोरणातील उद्योगांची संख्या सुरुवातीला सतरा वरून आठवर आणण्यात आली होती ती आता तीनवर आणली आहे. २०१४ पासून रेल्वे व अणुऊर्जा या दोन उद्योगांना सार्वजनिक क्षेत्रात राखीव ठेवण्यात आले आहे.

६) **व्यापाराचे उदारीकरण :** आयात-निर्यात धोरणानुसार आयात व निर्यात परवानासाठी असलेली नियंत्रणे शिथिल करण्यात आली. जवळजवळ सर्व भांडवली वस्तू, कच्चा माल, मध्यम वस्तू व इतर घटकांची मुक्तपणे आयात करण्याची परवानगी देण्यात आली. विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने स्थापन केले. त्याचप्रमाणे कृषीमालाच्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी कृषी निर्यात क्षेत्र (AEZ) ही संकल्पना आणली.

७) **विमा क्षेत्रातील सुधारणा :** विमा क्षेत्रात सरकारची मक्तेदारी होती. नवीन धोरणानुसार सुधारणा करण्यासाठी १९९९ मध्ये विमा नियंत्रण व विकास प्राधिकरण कायदा (IRDA) मंजूर करण्यात आला. या कायद्यान्वये खाजगी क्षेत्रातील बहुसंख्य कंपन्यांना विमा व्यवसाय सुरू करण्याची परवाना देण्यात आला. यामुळे विमा क्षेत्रातील शासनाची मक्तेदारी संपुष्टात आली.

८) **वित्तीय क्षेत्रातील सुधारणा :** सुरुवातीला फक्त सार्वजनिक व सहकारी बँकांना वित्तीय क्षेत्रात व्यवसाय करण्याची परवानगी होती. आता मात्र नवीन आर्थिक धोरणानुसार खाजगी व विदेशी बँकांना वित्तीय क्षेत्रात व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**शोधा पाहू :**

खाजगी बँका व विदेशी बँका यांची प्रत्येकी पाच नावे शोधा.

## नवीन आर्थिक धोरणाचे घटक :




## अ) उदारीकरण (Liberalisation) :



आकृती ९.१ उदारीकरण

**अर्थ :** अर्थशास्त्रात उदारीकरण या शब्दाचा अर्थ आर्थिक स्वातंत्र्य किंवा आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य होय. उत्पादक, उपभोक्ते, उत्पादनाचे घटक व मालक त्यांच्या स्वहितासाठी मुक्तपणे निर्णय घेऊ शकतात. अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ यांनी त्यांच्या 'राष्ट्राची संपती' (Wealth of Nation) या पुस्तकात असे सांगितले की, आर्थिक उदारीकरण हे एक उत्तम आर्थिक धोरण असून ते आर्थिक वृद्धी व लोककल्याणासाठी प्रोत्साहन देणारे आहे.

बाजारयंत्रणा आणि मुक्त स्पर्धेच्या कार्यप्रणालीतील प्रतिबंध कमी करून आर्थिक विकासाला चालना देणारे धोरण म्हणजे आर्थिक उदारीकरण होय.

### उदारीकरणासाठीचे उपाय :

१) **व्याजदरातील लवचिकता :** उदारीकरणाच्या धोरणांतर्गत व्यापारी बँकांना बाजारातील मागणी व पुरवठ्यानुसार व्याजदर निश्चितीबाबत स्वातंत्र्य देण्यात आले.

२) **उद्योगांचा विस्तार करण्याचे स्वातंत्र्य :** उदारीकरणाच्या काळात उद्योगांना त्यांच्या उत्पादन क्षमतेत विविधता आणणे, उत्पादनाचा खर्च कमी करणे याबाबत मुक्तपणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. यापूर्वी उत्पादन क्षमतेच्या मर्यादा निश्चित करण्याबाबत सरकारकडून निर्णय घेतला जात होता. उद्योगाकडून या मर्यादेनुसार उत्पादन केले जात होते. सध्या मात्र उद्योगांना बाजाराच्या आवश्यकतेनुसार उत्पादनाच्या मर्यादा निश्चित करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे.

३) **मक्तेदारी व निर्बंधित व्यापार कायद्याचे उच्चाटन (MRTP) :** ज्या कंपन्यांची मालमत्ता १०० कोटी व त्यापेक्षा जास्त होती त्यांना MRTP १९६९ च्या कायद्यानुसार उद्योग संस्था म्हटले जात होते या उद्योग संस्थांवर गुंतवणुकी संबंधीचे अनेक निर्बंध होते. आता या संस्थांना गुंतवणुकीचे निर्णय घेण्याबाबत स्वातंत्र्य आहे.

४) **विदेशी विनिमय नियंत्रण कायद्यात (FERA) सुधारणा :** विदेशी विनिमय नियंत्रण कायद्याऐवजी (FERA) विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा (FEMA) लागू झाला. परकिय चलन विनिमयावरील नियंत्रणे कमी झाल्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्रोत्साहन मिळाले.

५) **पायाभूत सुविधा खुली करणे :** देशी-विदेशी गुंतवणूकदार आता रेल्वे, रस्ते व वीज प्रकल्पांतील पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करू शकतात.

६) **विदेशी तंत्रज्ञानाला प्रोत्साहन :** उदारीकरणामुळे प्राधान्यक्रम असणाऱ्या उद्योगात विदेशी तंत्रज्ञानाला परवानगी देण्यात आली. त्यामुळे उत्पादन खर्च कमी करण्यात व उद्योगाची स्पर्धात्मकता वाढण्यास मदत झाली.

७) **भारतीय प्रतिभूती नियमन मंडळाची स्थापना (SEBI) :** सेबीची स्थापना १२ एप्रिल १९९२ रोजी करण्यात आली. गुंतवणूकदारांचे हित व सुरक्षितता जपण्यासाठी प्रतिभूती बाजाराचा विकास करण्यासाठी तसेच प्रतिभूती बाजार नियंत्रित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले.

### ब) खाजगीकरण (Privatisation) :

**अर्थ :** खाजगीकरण म्हणजे मालकी हक्क बदलून किंवा मालकी हक्क न बदलता खाजगी व्यवस्थापन व नियंत्रणाला मान्यता देणे होय. सोप्या शब्दांत खाजगीकरण ही अशी प्रक्रिया आहे की जी, आर्थिक क्रियांमधील सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग घटवून खाजगी क्षेत्राच्या सहभागात वाढ घडवून आणते.



आकृती ९.२ : खाजगीकरण

### खाजगीकरणासाठीचे उपाय :

१) **निर्गुंतवणूक :** यामध्ये सार्वजनिक क्षेत्राचे भागभांडवल खाजगी क्षेत्राला विकले जाते. उदा. मारुती उद्योगातील निर्गुंतवणूक, ITDC हॉटेल्स, IPCL, VSNL इत्यादी.

२) **अनारक्षण धोरण :** १९५६ च्या औद्योगिक धोरणामध्ये १७ उद्योग आरक्षित ठेवण्यात आले. नवीन आर्थिक धोरणाने हा आकडा ८ वरून तो हळूहळू तीनवर आणि आता तीनवरून दोन वर आला. सध्याच्या परिस्थितीत फक्त दोन उद्योग, रेल्वे वाहतूक व अणुऊर्जा सार्वजनिक क्षेत्राकडे आरक्षित आहेत.

३) **औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाची स्थापना (BIFR) :** नवीन आर्थिक धोरणाने औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाची स्थापना करून आजारी सार्वजनिक उद्योगांबाबत निर्णय घेण्याचे ठरविले. १९९६ च्या शेवटी १८८ आजारी सार्वजनिक उद्योग, औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाकडे सोपविण्यात आले.

४) **राष्ट्रीय नूतनीकरण मंडळाची (NRB) निर्मिती :** जेव्हा तोट्यात चालणारे सार्वजनिक उद्योग बंद केले जातात तेव्हा त्यात काम करणारे कामगार बेकार होतात. ही समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय नूतनीकरण मंडळाची निर्मिती झाली. हे मंडळ रोजगारातून काढण्यात आलेल्या कामगारांना व स्वेच्छा निवृत्ती घेणाऱ्यांना भरपाई देते.

**५) नवरत्नांचा दर्जा :** १९९७-९८ मध्ये ९ सार्वजनिक क्षेत्र उद्योगांना निवडून त्यांना 'नवरत्नांचा' दर्जा देण्यात आला. या नवरत्नांना पूर्ण वित्तीय व व्यवस्थापनाची स्वायत्तता देण्यात आली. नवरत्न खालीलप्रमाणे आहेत.

१) IOC : इंडियन ऑईल कॉर्पोरेशन
२) ONGC : ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन
३) HPCL : हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
४) BPCL : भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
५) IPCL : इंडियन पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशन लिमिटेड
६) VSNL : विदेश संचार निगम लिमिटेड
७) BHEL : भारत हेवी इलेक्ट्रीकल लिमिटेड
८) SAIL : स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड
९) NTPC : नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन

सद्य:स्थितीत सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग (PSUs) मिनीरत्न आणि महारत्नमध्ये वर्गीकृत केले गेले आहे.

- **मिनीरत्न कंपनी :** भारत सरकारने २००२ मध्ये मिनीरत्न कंपनीची संकल्पना उदयास आणली. मिनीरत्न कंपनीची दोन भागांत वर्गवारी करण्यात आली.

  मिनीरत्न श्रेणी-१ : गेल्या तीन वर्षात या श्रेणीतील सार्वजनीक क्षेत्रातील कंपन्यांनी सातत्याने नफा मिळविला पाहिजे, तसेच त्यांच्या तीन वर्षांच्या शेवटच्या आर्थिक वर्षात करपूर्व नफा ₹ ३० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असावा.

  मिनीरत्न श्रेणी-२ : सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना मिनीरत्न श्रेणी दोन असे म्हणतात. या श्रेणीत कंपन्यांनी मागील तीन वर्षांत सातत्याने नफा मिळविलेला असला पाहिजे, शिवाय त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन असला पाहिजे.

- **महारत्न कंपनी :** सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा विस्तार व्हावा, जागतिक पातळीवर त्यांचा सहभाग वाढावा तसेच बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणून त्यांना दर्जा मिळावा या उद्देशाने २००९ मध्ये महारत्न कंपनीची संकल्पना उदयास आली.

**शोधा पाहू :**

महारत्न व मिनीरत्न दर्जा असलेल्या कंपन्यांची नावे शोधून काढा.

### क) जागतिकीकरण (Globalisation) :



आकृती ९.३ जागतिकीकरण

**अर्थ :** नवीन आर्थिक धोरणाचे अंतिम ध्येय जागतिकीकरणच होय. अधिक काटेकोरपणे सांगायचे झाले तर उदारीकरण आणि खाजगीकरणामुळे अंशत: अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाला चालना मिळाली आहे. जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेची निर्मितीच होय. वैश्विक अर्थव्यवस्था ही अशी सीमारहित अर्थव्यवस्था असते की जेथे नफा, वस्तू व सेवा, भांडवल, श्रम आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह मुक्तपणे देशाच्या सीमापार जात असतो.

थोडक्यात असे म्हणता येईल की, जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेशी एकरूप करणे होय. यामध्ये मुक्त व्यापार आणि गुंतवणुकीवरील सर्व बंधने काढून टाकली जातात.

**जागतिकीरणासाठीचे उपाय :**

१) **संख्यात्मक नियंत्रणाचे उच्चाटन :** आयात व निर्यातीवरील सर्व संख्यात्मक नियंत्रणाचे उच्चाटन करण्यात आले. प्रशुल्क दरात घट करण्यात आली. औद्योगिक वस्तूंवर लावण्यात येणारा आयात दर कमी करण्यात आला.

२) **विदेशी भांडवलाला प्रोत्साहन :** सरकारने आर्थिक क्षेत्र परकीय गुंतवणुकीसाठी खुले केले त्यामुळे विविध क्षेत्रांत परकीय गुंतवणूक सुरू झाली. भारतीय

अर्थव्यवस्था जागतिकीकरणास खुली झाली आहे.

३) **रुपयाची परिवर्तनशीलता :** रुपयाचा विनिमय दर लवचीक करण्यात आला. सर्व चालू खात्यावरील व्यवहारांबाबत रुपया पूर्णत: परिवर्तनशील करण्यात आला.

४) **विदेशी कंपन्यांचा सहभाग :** भारतीय कंपन्यांना विदेशी कंपन्यांसमवेत सहभागाची परवानगी देण्यात आली. उदा. मारुती सुझुकी, हिरो होंडा, टाटा कोरस हे लोह व स्टीलमध्ये दक्षिण आफ्रिकेत व्यवहार करतात.

५) **दीर्घकालीन व्यापार धोरण :** दीर्घकालीन आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आंतरराष्ट्रीय धोरणात बदल करण्यात आला. या धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये :

१) उदारीकरणाचे धोरण

२) आंतरराष्ट्रीय व्यापारावरचे निर्बंधात घट.

३) विदेशी सहभागाला प्रोत्साहन

६) **निर्यातीला प्रोत्साहन :** नवीन निर्यात धोरणानुसार निर्यातदारांना विविध उत्तेजने देण्यात आली. निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्राची (SEZ) निर्मिती करण्यात आली.

**जरा आठवूया :**

१) उद्योगांचे सामाजिक उत्तरदायित्व (CSR) म्हणजे काय?

२) त्याचा समाजाला कसा उपयोग होतो?

## १९९१ च्या आर्थिक धोरणाची मूल्यमापन :

### यश :

१) **माहिती तंत्रज्ञानातील क्रांती :** जागतिकीकरणामुळे माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती झाली आहे. भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात त्याचे योगदान आहे. भारतीय सॉफ्टवेअर अभियंत्यांना अमेरिकेची संयुक्त संस्थाने, युनायटेड किंगडम, फ्रान्स इत्यादी देशांत मागणी वाढली आहे.

२) **वित्तीय सुविधांमध्ये सुधारणा :** खाजगी व विदेशी बँकांमुळे वित्तीय क्षेत्र हे अतिशय व्यावसायिक व स्पर्धात्मक बनले आहे. क्रेडिट कार्ड, ई-बँकींग इत्यादी सेवा अत्यंत जलदपणे ग्राहकांसाठी उपलब्ध झाल्या आहेत.

३) **शैक्षणिक दर्जात सुधारणा :** जागतिकीकरणामुळे भारतीय विद्यार्थ्यांना विदेशी उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळाले असून त्यासाठी लागणारे शैक्षणिक कर्ज, शिष्यवृत्ती व गरजेच्या सेवा उपलब्ध झाल्या आहेत.

४) **निर्यातीत वाढ :** भारतातील निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे. भारत फक्त पारंपरिक वस्तूंची निर्यात करत नसून यंत्रसामग्री, रसायने, संगणक इत्यादी सुद्धा निर्यात करतो. त्यामुळे आपल्या आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलात सुधारणा झाली आहे.

५) **पीक पद्धतीतील विविधता :** भारतीय शेतकरी पूर्वी फक्त मुख्य अन्नधान्य व नगदी पिकांची लागवड करत होते. परंतु जागतिकीकरणामुळे पिकांची रचना पारंपरिक वस्तूंपासून अपारंपरिक वस्तूंमध्ये बदलली आहे. ते आता फळांचे व फुलांचे उत्पादन, औषधी वनस्पतीं इत्यादींची देखील लागवड करतात.

६) **दुर्मिळतेच्या समस्येवर मात :** आयातीच्या उदारीकरणामुळे वस्तू व कच्च्या मालाची दुर्मिळतेची समस्या सुटली आहे. यामुळे चलनवाढीची समस्या सोडविण्यास मदत झाली आहे.

### अपयश :

१) **स्वयंपूर्णतेचा अभाव :** जो देश जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आहे त्याला अन्नाच्या उत्पादनामध्ये स्वयंपूर्णतेचा अभाव आढळतो कारण तो देश अशा वस्तूंचे उत्पादन करतो ज्यांची जागतिक पातळीवर मागणी असून ते फायदेशीर आहेत.

२) **देशांतर्गत बाजाराचा दुष्परिणाम :** उदारीकरण व जागतिकीकरणामुळे देशान्तर्गत बाजारावर दुष्परिणाम झाला आहे. आयात केलेल्या वस्तूंची उपलब्धता जास्त आहे. आयातीच्या उदारमतवादी धोरणामुळे आयात केलेल्या वस्तू देशात उत्पादन झालेल्या वस्तूंपेक्षा कमी किमतीच्या असतात. त्यामुळे त्यांना प्रचंड मागणी असते.

३) **गरीब शेतकऱ्यांवर परिणाम :** जागतिकीकरणाचे फायदे श्रीमंत शेतकरी अनुभवत आहेत. ते निर्यातयोग्य पिकांची लागवड करतात, परंतु गरीब

शेतकऱ्यांची दखल घेतली जात नाही. त्यामुळे त्यांना जमीन विकण्यासाठी दबाव आणला जातो किंवा ते आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. तसेच कर्जबाजारीपणा व दारिद्र्याला सामोरे जातात.

**४) निकोप स्पर्धेचा अभाव :** भारतीय उद्योजक बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करू शकत नाहीत. याचाच परिणाम हे उद्योग आजारी पडतात, बंद केले जातात किंवा विकण्यासाठी दबाव आणला जातो.

**५) कल्याणकारी दृष्टिकोनाकडे दुर्लक्ष :** नफ्याच्या हेतूमुळे आरोग्य, संपर्क साधने, शिक्षण याकरिता प्रचंड प्रमाणात विविध शुल्कात वाढ झाली आहे. त्यामुळे कल्याणकारी दृष्टिकोन मागे पडला आहे.

**६) बेरोजगारी :** बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करू शकत नसल्याने बरेच भारतीय उद्योग बंद पडले आहेत म्हणून मोठ्या प्रमाणात कामगारांना कामावरून कमी केल्यामुळे बेरोजगारी, दारिद्र्य व विषमता यांमध्ये वाढ होत आहे.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील विधाने पूर्ण करा :**

१) स्वातंत्र्यानंतर भारताने ......... स्वीकार केला.

अ) समाजवादाचा  ब) भांडवलशाहीचा
क) मिश्र/संमिश्र अर्थव्यवस्थेचा  ड) साम्यवादाचा

२) नवीन आर्थिक धोरणाने विदेशी तंत्रज्ञानाला ...मान्यता दिली.

अ) कुटीरोद्योग  ब) लघुउद्योग
क) सूक्ष्म एजन्सी  ड) उच्च प्राधान्य उद्योग

३) सद्यास्थितीत सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित उद्योगांची संख्या ......... इतकी झाली आहे.

अ) ३  ब) ५  क) ७  ड) २

**प्र. २. विधान आणि तर्क प्रश्न :**

**१) विधान 'अ' :** उदारीकरणांतर्गत उद्योगांचे परवाना वितरण करणे ही एक महत्त्वाची पायरी आहे.

**तर्क 'ब' :** अनावश्यक नियंत्रणे आणि प्रतिबंधामुळे १९९१ पूर्वी आर्थिक स्थिरता होती.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, परंतु विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, परंतु विधान 'ब' सत्य आहे.
३) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
४) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**२) विधान 'अ' :** १९९०-९१ च्या दरम्यान भारताला परकीय गंगाजळीचा (चलन) तीव्र तुटवडा होतो.

**तर्क 'ब' :** आयात कोटा आणि आयात शुल्क यांमुळे आयातीमध्ये वाढ झाली.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, परंतु विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, परंतु विधान 'ब' सत्य आहे.
३) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
४) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**३) विधान 'अ' :** उदारीकरणानंतर देशांतर्गत वस्तूंची विक्री वाढली.

**तर्क 'ब' :** उदारमतवादी धोरणामुळे परकीय वस्तूंच्या मागणीत वाढ होऊन आयात वाढली.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, परंतु विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, परंतु विधान 'ब' सत्य आहे.
३) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
४) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**४) विधान 'अ' :** जागतिकीकरणामुळे देश अन्नधान्य उत्पादनामध्ये स्वयंपूर्णता प्राप्त करू शकला नाही.

**तर्क 'ब' :** जागतिकीकरणामुळे माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती झाली आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, परंतु विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, परंतु विधान 'ब' सत्य आहे.
३) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
४) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**प्र.३. विसंगत शब्द ओळखा :**

१) नवीन आर्थिक धोरण –
उदारीकरण,खाजगीकरण, विमुद्रीकरण, जागतिकीकरण

२) उद्योगांना अनिवार्य परवाना असणारे उद्योग–
मादक पेय, निर्यात वस्तू, सिगारेट्स, औद्योगिक स्फोटके

३) नवरत्नांचा दर्जा असलेले धोरण–
SPCL, IOC, ONGC, HPCL

४) उदारीकरणाचे उपाय–
MRTP, FERA, SEBI, NTPC

**प्र. ४. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा :**

१) भारतात आता अनेक प्रकारच्या आणि कंपन्यांच्या मोटारी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत.

२) भारतातील काही सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे भागभांडवल खाजगी क्षेत्रास विकण्यात आले आहे.

३) भारतातील उद्योग क्षेत्रात परकीय गुंतवणुकीस आता मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले आहे.

**प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात किंवा नाहीत ते सकारण स्पष्ट करा :**

१) उदारीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली.

२) सरकारने खाजगी उद्योगांना सार्वजनिक क्षेत्रात मुक्त प्रवेश दिला.

३) विमा क्षेत्रात सरकारची मक्तेदारी आहे.

४) राष्ट्रीय नूतनीकरण मंडळाची (NRB) निर्मिती दारिद्र्य हटविण्यासाठी करण्यात आली.

५) इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (IOC) उद्योग नवरत्नांपैकी एक सार्वजनिक उद्योग आहे.

**प्र. ६. खालील प्रश्नांची सविसतर उत्तरे लिहा :**

१) नवीन आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये सांगा.

२) जागतिकीकरणासाठी केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

**प्र. ७. खालील उतारा काळजीपूर्वक वाचून प्रश्नांची उत्तरे द्या.**

दुग्धव्यवसायावर आधारित भारतीय आइस्क्रीम उद्योग हा अतिशय जलदगतीने वाढणारा उद्योग आहे. भारतातील आइस्क्रीमचा दरडोई उपभोग/वापर इतर देशांच्या तुलनेत कमी आहे. भारतात दरडोई उपभोग ४०० मिली आहे तर अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात २२००० मिली आणि चीनमध्ये ३००० मिली आहे. भारतातील आइस्क्रीमचा दरडोई उपभोग कमी असण्याचे कारण भारतीय बनावटीचे मिठाईचे पदार्थ आहेत. भारतात शंभरपेक्षा जास्त प्रकारच्या मिठाई तयार होतात. परदेशात मात्र आइस्क्रीम आणि पेस्ट्रीज असे दोनच पदार्थ वापरतात.

जागतिकीकरणाच्या आजच्या युगात, लोकांचे मतपरिवर्तन सातत्याने होत आहे. भारतात आता अनेक परदेशी आइस्क्रीम बनवणाऱ्या उद्योगांनी पाय रोवले आहेत. त्यांनी अनेक दुकाने थाटली असून वेगवेगळ्या प्रकारच्या व स्वादाच्या आइस्क्रीम्समुळे युवावर्ग आकर्षित होत आहे. याशिवाय प्रभावी वितरण व्यवसायसुद्धा आहे.

शीतगृहांच्या साखळीतील पायाभूत सुविधांमध्ये झालेली वाढ, भारतीयांच्या क्रियाशील मिळकतीत झालेली वाढ आणि भारतीयांच्या राहणीमानात जीवनमानात झालेले बदल यांमुळे आइस्क्रीम उद्योगाला चांगले भविष्य लाभले आहे. तथापि, आइस्क्रीमवरील कर जास्त आहेत. आइस्क्रीमवर सुमारे १८% वस्तू सेवाकर आहे, तर बटर, चिजसारख्या इतर दुग्ध पदार्थांवर केवळ १२% वस्तू सेवाकर लागतो.

आइस्क्रीम उद्योगाने २०१६-१७ या आर्थिक वर्षात १.५ अब्ज अमेरिकी डॉलर एवढा महसूली व्यवसाय केला आहे. या व्यवसायातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर्मचाऱ्यांची संख्या पंधरा लाख आहे. दुग्ध व दुग्धप्रक्रिया उद्योगांपैकी आइस्क्रीम उद्योग हा सर्वांत मोठा कर्मचारी संख्या असलेला उद्योग आहे.

१) भारतात आइस्क्रीमचा दरडोई उपभोग कमी असण्याचे कारण कोणते?

२) जागतिकीकरणाचा भारतीय आइस्क्रीम उद्योगावरील परिणाम सांगा?

३) भारतातील आइस्क्रीम उद्योगाच्या वाढीस पोषक घटक कोणते ते शोधा.

४) भारतातील आइस्क्रीम उद्योगावर लादलेल्या वस्तूसेवा कराचे परिणाम तुमच्या शब्दात मांडा.

# प्रकरण – १० : भारतातील आर्थिक नियोजन

**प्रस्तावना :**

नियोजन आयोगाची स्थापना १९५० मध्ये भारत सरकार ने केली. पंतप्रधान हे नियोजन आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. नियोजन आयोगामध्ये बँकींग, वित्त, उद्योग या विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ असतात. आर्थिक नियोजनाची रूपरेषा तयार करण्याचे उत्तरदायित्व हे नियोजन आयोगाचे असते.

**माहिती गोळा करा :**

१) मुंबई योजना
२) जनता योजना
३) गांधी योजना

**आर्थिक नियोजनाचा अर्थ आणि व्याख्या :**

उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर करून नियोजित यंत्रणेद्वारे निर्धारित उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याचा एक कालबद्ध कार्यक्रम म्हणजे आर्थिक नियोजन होय.

**डॉ. एच. डी. डिकिन्सन :**

''आर्थिक नियोजन म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेची तपशीलवार पाहणी करून त्या आधारावर कोणत्या वस्तूंचे, किती प्रमाणात आणि कसे उत्पादन करायचे, किती प्रमाणात केव्हा आणि कुठे उत्पादन करायचे आणि त्याचे वितरण कशा प्रकारे करायचे याबाबत महत्त्वाचे निर्णय मध्यवर्ती सत्तेने जाणीवपूर्वक घेणे होय''.

**श्रीमती बार्बरा वुटन :**

''सार्वजनिक सत्तेने आर्थिक अग्रक्रमांची जाणीवपूर्वक आणि हेतुपुरःस्सर केलेली निवड म्हणजे आर्थिक नियोजन होय''.

**आर्थिक नियोजनाची वैशिष्ट्ये :**

आर्थिक नियोजनाची खालील वैशिष्ट्ये आहेत :




१) **मध्यवर्ती नियोजन सत्ता :** प्रत्येक देशात केंद्रीय नियोजन आयोग असतो व ते आर्थिक नियोजन करतात. भारतामध्ये याला नियोजन आयोग म्हणतात. नियोजन आयोगाला योजना तयार करण्याचा पूर्ण अधिकार होता. नियोजन आयोगाची पुर्नरचना करून २०१५ साली निती आयोगाची स्थापना करण्यात आली.

२) **पाहणी :** नैसर्गिक व मानवी साधनसंपत्ती यांची उपलब्धता व उपयुक्तता विचारात घेऊन संपूर्ण अर्थव्यवस्थेची पाहणी केली जाते.

३) **उद्दिष्टे :** आर्थिक नियोजन हे पूर्वनिर्धारित व निश्चित अशा उद्दिष्टांवर आधारित असते जे वास्तववादी व लवचीक असतात.

४) **प्राधान्यक्रम आणि लक्ष्य :** आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आर्थिक नियोजनात प्रत्येक क्षेत्राच्या महत्त्वानुसार प्राधान्यक्रम ठरविला जातो. लक्ष्य ठरवून उद्दिष्टे प्राप्तीसाठी ठोस पावले उचलली जातात.

५) **संसाधनांची जुळवाजुळव :** नियोजन करण्यासाठी लागणारी विविध आवश्यक संसाधने उदा. कर आकारणे, घरगुती बचत, तुटीचा अर्थभरणा, बाह्य साहाय्य, सार्वजनिक कर्ज यांची जुळवाजुळव आवश्यक आहे.

६) **योजना कालावधी :** नियोजनाचा कालावधी गरजेनुसार वेगवेगळा असू शकतो. भारतासारख्या अनेक देशांमध्ये नियोजनाचा काळ पाच वर्षे इतका असतो.

७) **मूल्यमापन :** नियोजनातील उद्दिष्टे आणि प्राथमिकता यांतील होणारे बदल समाविष्ट करण्यासाठी मध्यावधी परिक्षण गरजेचे असते. त्यासाठी ठराविक कालावधीनंतर योजनांचे मूल्यमापन केले जाते.

८) **सतत चालणारी प्रक्रिया :** आर्थिक नियोजन ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. या प्रक्रियेद्वारे देशाच्या आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गाठले जाते.

९) **समन्वय :** केंद्राप्रमाणे राज्यांमध्येही नियोजन केले जाते. त्यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे काम केले जाते.

१०) **लवचिकता :** मध्यवर्ती नियोजन प्राधिकरण आर्थिक नियोजन करताना लवचिकतेचा दृष्टीकोन समोर ठेवून आवश्यकतेनुसार अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रात समन्वय साधते. त्यानुसार अंमलबजावणीतही लवचिकता साधते.

**तुम्हांला माहीत हवं :**

**एका दृष्टिक्षेपात पंचवार्षिक योजना**

| नियोजन | कालावधी | मुख्य उद्दिष्ट्ये/व्यूहरचना | अपेक्षित लक्ष्य % | साध्यपूर्ती % |
|---|---|---|---|---|
| पहिली पंचवार्षिक योजना | १९५१-१९५६ | कृषी क्षेत्राचा विकास | २.१ | ३.६ |
| दुसरी पंचवार्षिक योजना | १९५६-१९६१ | अवजड उद्योगांचा विकास | ४.५ | ४.१ |
| तिसरी पंचवार्षिक योजना | १९६१-१९६६ | उद्योग व कृषी क्षेत्र दोन्हींचा विकास | ५.६ | २.७ |
| वार्षिक नियोजन | १९६६-१९६९ | – | – | – |
| चौथी पंचवार्षिक योजना | १९६९-१९७४ | स्थैर्यासह आर्थिक विकास | ५.७ | ३.३ |
| पाचवी पंचवार्षिक योजना | १९७४-१९७९ | दारिद्र्याचे निर्मूलन | ४.४ | ४.८ |
| साखळी योजना | १९७८-१९८० | – | – | – |
| सहावी पंचवार्षिक योजना | १९८०-१९८५ | जीवनमानाची गुणवत्ता सुधारणे | ५.२ | ५.७ |
| सातवी पंचवार्षिक योजना | १९८५-१९९० | समाजकल्याण आणि दारिद्र्य निर्मूलन | ५.० | ६.० |
| सुट्टीचा कालावधी | १९९०-१९९२ | – | – | – |
| आठवी पंचवार्षिक योजना | १९९२-१९९७ | अर्थव्यवस्थेला गती देणे | ५.६ | ६.८ |
| नववी पंचवार्षिक योजना | १९९७-२००२ | सामाजिक न्याय व समानतेसह आर्थिक वृद्धी प्राप्त करणे | ७.० | ५.६ |
| दहावी पंचवार्षिक योजना | २००२-२००७ | दारिद्र्य कमी करणे | ८.२ | ७.८ |
| अकरावी पंचवार्षिक योजना | २००७-२०१२ | जलद व सर्वसमावेशक वृद्धी | ८.१ | ७.९ |
| बारावी पंचवार्षिक योजना | २०१२-२०१७ | जलद व शाश्वत सर्वसमावेशक वृद्धी | ८.० | – |

**तक्ता क्र.१०.१** **स्त्रोत :** पंचवार्षिक योजनांचे अहवाल, नियोजन मंडळ, भारत सरकार

**हे करून पहा :**

वरील तक्त्यातील साध्यपूर्तीच्या आकडेवारीवरून सहावे दशमक व नववे दशमक काढा.

## बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-१७)

बाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी २०१२-१७ असून 'जलद व शाश्वत वृद्धीवर' लक्ष्य केंद्रित केले आहे. सरकारी खर्चातून भारतातील शेती, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक कल्याण यांच्या विकासाला प्रोत्साहन देणे हे या योजनेचे अपेक्षित उद्दिष्ट आहे. तसेच उत्पादन क्षेत्राच्या विकासातून रोजगार निर्मिती करणे हेही अपेक्षित आहे.

### बाराव्या पंचवार्षिक योजनेची मुख्य उद्दिष्टे :

#### १) आर्थिक वृद्धी :

- वास्तविक स्थूल देशांतर्गत उत्पादन वृद्धीचा दर ८% पर्यंत प्राप्त करणे.
- शेतीचा वृद्धी दर ४.०% पर्यंत प्राप्त करणे.
- औद्योगिक व उत्पादन वृद्धीचा दर १०% पर्यंत प्राप्त करणे.
- प्रत्येक राज्याचा सरासरी वृद्धी दर हा अकराव्या पंचवार्षिक योजनेपेक्षा बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये वाढविणे.

#### २) दारिद्र्य व रोजगार :

- दारिद्र्याचे दरडोई गुणोत्तर १०% पर्यंत टक्क्यांनी कमी करणे.
- शेती क्षेत्राव्यतिरिक्त ५ कोटी नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे.

#### ३) शिक्षण :

- योजनेच्या अखेरपर्यंत किमान सात वर्षापर्यंत शाळेत राहण्याचा कालावधी वाढविणे.
- कौशल्याधिष्ठित उच्च शिक्षणाच्या संधी निर्माण करणे

- योजनेच्या अखेरीस शाळेतील पटनोंदणीतील लिंगभेद व सामाजिक अंतर कमी करणे.

### ४) आरोग्य :

- प्रजनन दर २.१% पर्यंत कमी करणे.
- ०-३ वयोगटातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण योजनेच्या अखेरीस राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य पाहणीच्या (NFHS) - तिसऱ्या स्तराच्या अर्ध्यापर्यंत कमी करणे.

**शोधा पाहू :**

NFHS च्या वेगवेगळया पातळ्यांची माहिती संकलित करा.

### ५) पायाभूत सुविधा :

- पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीत स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ९% पर्यंत वाढ घडवून आणणे.
- सर्व खेडी पक्क्या रस्त्यांनी जोडणे.
- ग्रामीण दूरध्वनीची व दूरदर्शनची घनता ७०% पर्यंत वाढवणे.

### ६) पर्यावरण व शाश्वतता :

- बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात दरवर्षी १० लाख हेक्टर इतके वनराई क्षेत्र वाढविणे.

### ७) सेवा पुरविणे :

- योजनेच्या अखेरीस ९०% भारतीयांना बँकिंग सेवा पुरविणे. बँक खात्यांची जोडणी 'आधाराशी' करणे.
- अनुदाने व सरकारकडून मिळणाऱ्या लाभाची रक्कम लाभधारकाच्या खात्यात थेट जमा करणे.

## क) निती आयोग (नॅशनल इन्स्टीट्यूशन फॉर ट्रान्स्फॉरमिंग इंडिया) :

बारावी पंचवार्षिक योजनेचा कालावधी ३१ मार्च २०१७ रोजी संपला. पुढील कार्यपूर्ततेसाठी या योजनेस ४ ऑक्टोबर २०१७ अशी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. या दरम्यान नियोजन आयोगाऐवजी निती आयोगाची निर्मिती करण्यात आली. निती आयोगाची स्थापना हे नावीन्यपूर्ण पाऊल आहे. यामागे संघटन व विकेंद्रीकरणाची तत्त्वे अधिक मजबूत करणे तसेच आर्थिक वृद्धी व विकासाचा वेग वाढविणे अशी उद्दिष्ट्ये आहेत. निती आयोगाचा ठराव १ जानेवारी २०१५ साली मंजूर झाला, पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी बारावी पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्यानंतर सुरू झाली.

### थिंक टँक कार्ये :

निती आयोग हा भारत सरकारचे धोरण राबविणारा प्रमुख विचारगट आहे. त्याकरिता राष्ट्रीय विकासासाठी दूरदृष्टी ठेवून त्यामध्ये राज्यांना उत्साहाने सहभागी होण्याकरिता तो भाग पाडतो. तो संघराज्यांना सहकार्यासाठी काम करणे, संरचनात्मक आधार देऊन व धोरणासाठी राज्यांना सतत मार्गदर्शन करतो.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**थिंक टँकचा अर्थ**

थिंक टँक हा एखाद्या संस्थेने विशेषतः शासनाने एकत्रित आणलेल्या तज्ज्ञांचा असा समूह आहे की जो विविध समस्यांवर चर्चा करून त्या समस्या विविध मार्गांनी सोडविण्याचा प्रयत्न करतो.

### थिंक टँकचे मुख्य आधार स्तंभ :

१) भारताचा दृष्टी दस्तऐवज (Vision Document of India.)

२) बाराव्या पंचवार्षिक योजनेचे मूल्यमापन दस्तऐवज

३) 'परिवर्तनशील भारत' (ट्रान्सफॉर्मिंग इंडिया) या विषयावर निती आयोगामार्फत व्याख्याने आयोजित करणे.

४) शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न

५) फलश्रुती अंदाजपत्रक आणि उत्पादन फलश्रुती आराखडा

६) जागतिक उद्योजकांची शिखर परिषद २०१७

७) मागासलेल्या जिल्ह्यांची निवड करून त्यांना सक्षम करण्यासाठी कार्यक्रम राबविणे.

### नीति आयोगाची रचना :

१ जानेवारी २०१५ ला ठराव करून नीति आयोगाची अंमलबजावणी १६ फेब्रुवारी २०१५ पासून झाली. नीति आयोगाची रचना खालीलप्रमाणे आहे.

### नीति आयोगाचे सदस्य :

१) **शासकीय परिषद :** यात सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशांचे राज्यपाल.

२) **प्रादेशिक परिषद :** यात संभाव्य उदभवणाऱ्या विशिष्ट घटना व विशिष्ट महत्वाचे विषय यांच्या निराकरणासाठी राज्य किंवा प्रदेशाचा समावेश असलेली परिषद.

३) **विशेष आमंत्रित :** यांमध्ये विशिष्ट विषयांचे ज्ञान असणारे तज्ज्ञ व व्यावसायिक यांची निवड पंतप्रधान करतात.

४) **संस्थात्मक संरचना :** पंतप्रधानांच्या व्यतिरिक्त खालील सदस्य त्यात सामावलेले असतात.

- **अध्यक्ष :** भारताचे पंतप्रधान
- **उपाध्यक्ष :** पंतप्रधानांकडून नियुक्ती

  पूर्ण वेळ सदस्य – ५

  अर्ध वेळ सदस्य – २
- **पदसिद्ध सदस्य :** पंतप्रधानांनी नियुक्त केलेले मंत्रिमंडळातील जास्तीत जास्त चार सदस्य
- **मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) :** पंतप्रधानांनी एका ठराविक कालावधीसाठी नियुक्त केलेला भारत सरकारच्या सचिव पदावरील मुख्य कार्यकारी अधिकारी
- **सचिवालय :** आवश्यकतेनुसार नियुक्ती

**हे करून पहा :**

नीति आयोगाची सध्याची रचना सांगा व खालील रकान्यात सदस्यांची नावे लिहा.

**नीति आयोग**

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सदस्य |
|---|---|---|
| | | |

### नीति आयोगाची कार्ये :

१) **राष्ट्रीय सर्वसमावेशक विषयपत्रिका :** राज्यांच्या सक्रिय सहभागाने राष्ट्रीय विकासप्राधान्य आणि धोरणांचा सामाजिक दृष्टिकोन विकसित करणे. पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांना राष्ट्रीय विषयपत्रिकेची रचना पुरविली गेल्यामुळे योजनेची अंमलबजावणी करणे सोईचे होईल.

२) **नीति आयोग हा राज्याचा सर्वांत चांगला मित्र :** विविध समस्यांचा सामना करण्यासाठी तसेच राज्यांच्या तुलनात्मक फायद्यासाठी राज्यांना सहकार्य करणे, मंत्रिमंडळातील विविध खाती आणि त्यांच्याकडे असलेल्या विविध कल्पना राबविण्यासाठी उपयुक्त सल्ला देणे आणि त्यांची कार्यक्षमता वाढविणे. यासाठी नीति आयोग हा केंद्रातील राज्यांचा सर्वात चांगला मित्र आहे.

३) **विकेंद्रित नियोजन :** नियोजन कार्यक्रमाची पुनर्रचना करणे त्यानुसार ग्रामीण स्तरापासून केंद्रस्तरापर्यंत त्याची अंमलबजावणी करणे.

४) **ज्ञानाचे नावीन्य केंद्र :** राज्यकारभाराद्वारे एक संशोधनकर्ता तसेच संशोधनाचे प्रसारक आणि सुशासनविषयक सर्वोत्तम कृती तयार करणे. संसाधन केंद्र जे ओळख व विश्लेषण करते व त्याची प्रतिकृती सुलभ करणे.

५) **देखरेख आणि मूल्यमापन :** धोरणाच्या अंमलबजावणीवर देखरेख करणे व त्यांच्या परिणामांचे काटेकोर-पाठपुराव्यानिशी मूल्यमापन करणे. सर्व व्यापक कार्यक्रम मूल्यांकनाद्वारे साध्य करणे. गरज असलेल्या गोष्टींमध्ये दुरुस्ती करून त्यांतील दोष ओळखणे आणि कालखंड ठरवून धोरण अधिक कार्यक्षम करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

६) **सहकारात्मक आणि स्पर्धात्मक संघटन :** प्राथमिक स्तरावर सहकारी संघटन कार्यान्वित करणे, राज्यांचा सक्रिय सहभाग वाढवून राष्ट्रीय धोरण तयार करणे. पंतप्रधान व राज्यांचे मुख्यमंत्री यांच्या संयुक्त अधिकारात संख्यात्मक व गुणात्मक उद्दिष्टांची कालबद्ध अंमलबजावणी व पूर्तता करणे.

७) **इतर कार्ये :**

- आंतर सल्लागार
- विवाद निराकरण
- तंत्रज्ञान अद्यावतीकरण

**नियोजन आयोग व निती आयोग यातील तुलना :**

| नियोजन आयोग | निती आयोग |
|---|---|
| १) नियोजन मंडळाची स्थापना १५ मार्च १९५० मध्ये झाली होती. | १) निती आयोगाची स्थापना १ जानेवारी २०१५ मध्ये झाली. |
| २) नियोजन आयोग मंत्रालय व राज्य सरकारला निधी पुरवित असे. | २) निती आयोग थिंक टँक आहे. निधींचा पुरवठा वित्त मंत्रालयामार्फत केला जातो. |
| ३) राज्याची भूमिका राष्ट्रीय विकास परिषदे पुरती (NDC) मर्यादित ठेवून, नियोजन बैठकांद्वारे संवाद करणे. | ३) राज्य सरकारची भूमिका नियोजन मंडळापेक्षा जास्त महत्त्वाची असणे अपेक्षित आहे. |
| ४) सचिव किंवा सदस्य नेहमीच्या प्रक्रियेद्वारे नियुक्त होतात. | ४) मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती पंतप्रधान करतात. |
| ५) नियोजन आयोगाकडे अर्धवेळ काम करणाऱ्या सदस्यांची तरतूद नव्हती. | ५) निती आयोगाकडे दोन अर्धवेळ सदस्य गरजेनुसार काम करतात. |
| ६) नियोजन आयोगाकडे असलेला अध्यक्ष, सचिव सदस्य व पूर्ण वेळ काम करणारे सदस्य होते. | ६) निती आयोगात अध्यक्ष, उपाध्यक्ष, पूर्ण वेळ सदस्य, अर्धवेळ सदस्य, सचिव पदाचे कार्यकारी अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश आहे. |
| ७) नियोजन आयोग राज्यांसाठी धोरणे लागू करणे आणि प्रकल्पांना मंजुरी देऊन निधी वाटपाचे काम करत असे. | ७) निती आयोग हा केवळ विचार विनिमय करणारा गट असून त्यास धोरणे बनविण्याचा अधिकार नाही. |

## स्वाध्याय

**प्र.१. योग्य पर्याय निवडा :**

**१) आर्थिक नियोजनाच्या बाबतीत खालील बाबी बरोबर आहेत.**

अ) नियोजन आयोगाची स्थापना १९५० मध्ये करण्यात आली.

ब) पंतप्रधान हे नियोजन आयोगाचे पद्सिद्ध अध्यक्ष असतात.

क) आर्थिक नियोजन हा एक कालबद्ध कार्यक्रम आहे.

ड) आर्थिक नियोजन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

**पर्याय :** १) अ आणि ब　　२) अ, ब, क आणि ड
३) अ आणि क　　४) यापैकी नाही.

**२) खालील पर्यायांमधून चुकीचा पर्याय ओळखा.**

अ) पहिल्या पंचवार्षिक योजनेचे कृषी क्षेत्राचा विकास करणे हे उदिदष्ट होते.

ब) सातव्या पंचवार्षिक योजनेत समाजकल्याण आणि दारिद्र्या निर्मूलन यावर भर दिला होता.

क) बाराव्या पंचवार्षिक योजनेने जलद सर्वसमावेशक वृद्धीवर भर दिला आहे.

ड) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा भर कृषी आणि औद्योगिक विकास यावर होता.

**पर्याय :** १) फक्त अ　　२) अ, ब आणि ड
३) फक्त क　　४) ब आणि ड

**३) योग्य पर्यायांची जोडी ओळखा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) आर्थिक नियोजन | अ) पंतप्रधानाकडून निवड |
| २) बारावी पंचवार्षिक योजना | ब) भारत सरकारचे धोरण राबविणारा विचार गट |
| ३) निती आयोग | क) जलद व शाश्वत वृद्धी |
| ४) निती आयोग उपाध्यक्ष | ड) कालबद्ध कार्यक्रम |

**पर्याय :** अ) १-क, २-अ, ३-ड, ४-ब
ब) १-ड, २-ब, ३-अ, ४-क
क) १-ड, २-क, ३-ब, ४-अ
ड) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

**४) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

**विधान '१' :** निती अयोगाचा ठराव हा भारतीय अर्थव्यवस्थेतील बदलती गतिशीलता दाखवितो.

**विधान '२' :** आर्थिक, सामाजिक, तांत्रिक बदलांचा विचार करून मागासलेल्या जिल्ह्यांना सक्षम करण्यासाठी ही संस्था विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करते व त्यांतून आर्थिक बदल घडवून आणते.

**पर्याय :** १) विधान '१' सत्य आहे.

२) विधान '२' सत्य आहे.

३) विधान '१' चा परिणाम विधान '२' आहे.

४) विधान '१' आणि '२' यांचा परस्परसंबंध नाही.

### प्र. २. अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सांगा :

१) सार्वजनिक सत्तेने आर्थिक प्राधान्यक्रमांची जाणीवपूर्वक आणि सहेतुक केलेली निवड.

२) अशा तज्ज्ञ व्यक्तींचा समूह, की जो शासनाद्वारे एकत्रित केलेला असतो व जो विविध समस्यांचा विचार करून त्या समस्या विविध मार्गाने सोडविण्यासाठी प्रयत्न करतो.

### प्र. ३. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा :

१) सायलीची आई घरचा हिशेब लावण्यासाठी वही ठेवते व त्यातून सर्व खर्चाचे नियोजन करते.

२) रमाबाईंच्या घरगुती गॅसचे अनुदान थेट त्यांच्या खात्यात जमा होते.

३) वर्गातील समस्या सोडविण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांचा गट तयार करतात, हा गट समस्यांवर चर्चा करून उपाय सुचवतो.

### प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

१) आर्थिक नियोजनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) बाराव्या पंचवार्षिक योजनेची मुख्य उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

३) निती आयोगाची रचना स्पष्ट करा.

४) निती आयोगाची कार्ये स्पष्ट करा.

५) नियोजन आयोग आणि निती आयोग यांतील फरक स्पष्ट करा.

### प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात किंवा नाहीत ते सकारण स्पष्ट करा :

१) आर्थिक नियोजन आयोगाची कार्ये आता निती आयोगाकडे आहेत.

२) बाराव्या पंचवार्षिक योजनेत जलद व शाश्वत वृद्धी प्राप्त झाली.

### प्र. ६. खालील उतारा काळजीपूर्वक वाचून प्रश्नांची उत्तरे द्या :

भारतात केंद्रीय अर्थमंत्री दरवर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर करतात. फेब्रुवारीनंतर येणाऱ्या एप्रिल ते मार्च या कालावधीत किती महसूल गोळा होईल व देशाला वर्षभरात किती खर्च करावा लागेल. याचा अंदाज या अर्थसंकल्पात मांडला जातो. करप्रणालीतील बदल यात सुचविले जातात. संरक्षण, शिक्षण, संशोधन व विकास आदींबाबत तरतूद यात केली जाते. अर्थसंकल्पाची तारीख एक महिना अलीकडे आणत १ फेब्रुवारी केली आहे, जेणेकरून आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच निधी उपलब्ध होईल.

१) भारतीय अर्थसंकल्प कोठे सादर केला जातो ?

२) कोणत्या गोष्टींचा अंदाज अर्थसंकल्पात मांडला जातो ?

३) अर्थसंकल्पाची तारीख १ फेब्रुवारी का केली आहे ?

४) अर्थसंकल्पाची संकल्पना स्पष्ट करा.

# अर्थशास्त्रीय संज्ञांचे परिशिष्ट

- **अंकात्मक पाकीट (Digital wallet) :** पैशांची देवाणघेवाण आपण इलेक्ट्रॉनिक माध्यमातून करू शकतो. ही एक सॉफ्टवेअरवर आधारित पद्धत आहे. पैशाची देवाणघेवाण करण्यासाठी इंटरनेटच्या माध्यमातून लॅपटॉप, स्मार्ट फोन वापरून पैशांचे हस्तांतरण करणे सोपे जाते. त्यामुळे बँक खातेधारकांचे खाते अंकात्मक पाकिटाला (Digital wallet) जोडले जाते.

- **अनारक्षण :** नवीन आर्थिक सुधारणांचा एक भाग म्हणून खाजगीकरण धोरणाच्या अंतर्गत स्वीकारण्यात आलेल्या महत्त्वाच्या धोरणांपैकी हे एक धोरण होय. अनारक्षण म्हणजे खाजगी क्षेत्रासाठी उद्योग खुले करणे, जे केवळ शासकीय क्षेत्रासाठी आरक्षित होते.

- **आतिथ्य सेवा/आदरातिथ्य :** परिषदेसाठी येणारे प्रतिनिधी किंवा अधिकारी, पाहुणे, ग्राहक यांचे मनोरंजन व आदरातिथ्य करणाऱ्या व्यवसायाला आतिथ्य सेवा म्हणतात.

- **आयात-निर्यात धोरण :** विदेशी व्यापार महानिदेशालयाने (Directorate General of Foreign Trade) भारतातील वस्तूंच्या आयात व निर्यात संबंधित गोष्टींसाठी स्थापन केलेला मार्गदर्शनाचा व सूचनांचा संच म्हणजेच आयात-निर्यात धोरण (EXIM Policy) होय.

- **विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) :** याचा संदर्भ अशा क्षेत्राशी आहे, जिथे गुंतवणुकीला व विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष आर्थिक सवलती दिल्या जातात. देशातील इतर भागांपेक्षा या भागात कमी करात सवलत दिली जाते.

- **एल.पी.जी. ग्राहक :** एल.पी.जी. ग्राहक हे स्वयंपाकाच्या हेतूसाठी एल.पी.जी. सिलेंडरचे अंतिम वापरकर्ते असतात.

- **कर चुकवून मिळवलेले उत्पन्न :** अनैतिक मार्गाने व चुकीची माहिती देऊन कर न भरता असलेले उत्पन्न.

- **कृषी पर्यटन :** ग्रामीण भागात किंवा शेतात पर्यटकांना सहलीची किंवा सुट्टी घालवण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा व्यवसाय म्हणजे कृषी पर्यटन होय. कृषी पर्यटन ही संकल्पना पर्यावरण पर्यटनाचा थेट विस्तार आहे, जी पर्यटकांना कृषी जीवनाचा अनुभव घेण्यासाठी प्रोत्साहित करते.

- **क्रयशक्तीची समानता (Purchasing Power Parity (PPP) :** ही खरेदी शक्ती समानता पारिभाषित करते. एखादी सेवा किंवा वस्तू खरेदी करण्यासाठी देशांतर्गत बाजाराचे वापरलेले चलन व त्याच सेवा व वस्तू खरेदीसाठी परकीय बाजारात वापरलेले चलन यांच्यामधील समानता दर्शवणे म्हणजेच क्रयशक्तीची समानता होय.

- **अन्न पर्यटन/खाद्य पर्यटन :** एखाद्या विशिष्ट प्रादेशिक विभागातील प्राथमिक आणि दुय्यम खाद्य उत्पादकांना भेटी देऊन खाद्य महोत्सव, उपहारगृह आणि विशिष्ट खाद्य उत्पादनाच्या गुणधर्मांचा अनुभव घेणे म्हणजेच अन्न पर्यटन होय.

- **दारिद्र्य गुणोत्तर :** एकूण लोकसंख्येच्या दारिद्र्यरेषेखाली असलेल्या लोकांचे प्रमाण म्हणजे दारिद्र्य गुणोत्तर होय.

- **ग्रामीण कर्जबाजारीपणा :** ग्रामीण भागातील लोकांचा उत्पादन खर्च व उपभोग खर्चासाठी आवश्यक असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी कर्जाची परतफेड करण्याची असमर्थता आणि इतर सामाजिक बांधीलकी यांमुळे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केलेले कर्ज व त्यामुळे येणारा कर्जबाजारीपणा म्हणजेच ग्रामीण कर्जबाजारीपणा होय.

- **ग्रामीण पर्यटन :** ग्रामीण भागातील जीवन, कला, संस्कृती आणि वारसा यांचे दर्शन घडविणारी सहल म्हणजेच ग्रामीण पर्यटन होय.

- **जागतिक उद्योजकता :** हे एक असे गुणवैशिष्ट्य आहे, ज्यामध्ये जागतिक उद्योजक आपले ज्ञान व संपर्काच्या बहुराष्ट्रीय आणि संमिश्र संस्कृतीमधील संधी ओळखतात आणि नवीन मूल्य निर्मितीत रूपांतर करण्यासाठी पुढाकार घेतात.

- **जागतिक दारिद्र्य :** जगातील काही भागांमध्ये अत्यंत दारिद्र्य आढळून येते. जागतिक बँक ही जागतिक माहितीचा मुख्य स्रोत आहे. ऑक्टोबर २०१५ मध्ये जागतिक दारिद्र्य रेषा $ १.९० याप्रमाणे प्रति व्यक्ती प्रति दिवस याप्रमाणे अद्ययावत केली गेली.

- **लसीकरणाचे सार्वत्रिकरण :** या लसीकरण कार्यक्रमांतर्गत टी.बी., पोलिओ, गोवर, रूबेला अशा वेगवेगळ्या आजारांवर लहान मुले, नवजात शिशु व गर्भवती स्त्रियांसाठी लसीकरण केले जाते.

- **तरल संपत्ती :** एखाद्या मालमत्तेची विक्री करणे सोपे असेल किंवा त्या मालमत्तेचे रूपांतर रोख रकमेत त्याचे मूळ मूल्य कमी न होता करता येत असेल, तर त्याला तरल संपत्ती असे म्हणतात.

- **थेट लाभ हस्तांतरण योजना :** ही योजना सामाजिक सुरक्षेचा एक उपाय आहे, ज्यामध्ये लाभार्थींच्या बँक खात्यात सरकारने दिलेले अर्थसाहाय्य हस्तांतरित होते व यामुळे वितरण यंत्रणेतील गळती काढून टाकण्याचा उद्देश सफल होतो व वित्तीय समावेशन वाढते.

- **निर्गुंतवणूक :** ही एक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये सरकारचा सार्वजनिक क्षेत्रातील हिस्सा सरकार काढून घेते जेणेकरून व्यवस्थापनाला स्वातंत्र्य मिळते आणि खाजगी व्यवसायाचा समावेश होतो.

- **पत साधने :** पत साधने ही विशिष्ट व्यक्तीस पैसे देण्यासाठी किंवा कर्जाची परतफेड करण्याचे वचन देण्यासाठी असू शकतात. सामान्यपणे वापरात असलेली पत साधने म्हणजे धनादेश, विनिमय करारपत्र, अति काढपत्रक (Over Draft) इत्यादी.

- **परकीय चलन नियमन कायदा (FERA) १९७३ :** हा कायदा परदेशी चलन, तारण पत्रे, आयात-निर्यातीची चलने आणि विदेशी गुंतवणूकदारांच्या अमर्यादित मालमत्तेचे अधिग्रहण करणाऱ्या काही देवाणघेवाणीच्या भरण्यावर नियंत्रण ठेवतो.

- **पर्यावरणीय अर्थशास्त्र :** ही अर्थशास्त्राची उपशाखा आहे जी पर्यावरणातील साधनांचे वाटप अधिक कार्यक्षमतेने होण्यासाठी मुख्य प्रवाहातील सूक्ष्मलक्षी व समग्रलक्षी अर्थशास्त्राची मूल्ये व साधने यांचा उपयोग करते.

- **पिकांची विविधता :** दिलेल्या जागी विविध प्रकारच्या पिकांचे उत्पन्न केल्याने उत्पादनाचा विस्तार होतो शिवाय जोखीम कमी होते. भारतात पिकांच्या विविधतेमुळे असे दिसून आले आहे, की पारंपरिकरीत्या वाढणारी कमी उत्पादनाची पिके जास्त उत्पादनात बदलली आहेत.

- **प्रगतिशील कर संरचना :** प्रगतिशील कर संरचना म्हणजे ज्या प्रमाणात कुटुंबाचे व व्यक्तीचे व्यक्तिगत उत्पन्न वाढते त्याच प्रमाणात कर वाढतो.
- **प्रादेशिक असमतोल :** प्रादेशिक असमतोल म्हणजे वेगवेगळ्या प्रादेशिक विभागांमध्ये दरडोई उत्पन्न, साक्षरता दर, शिक्षण, आरोग्य सेवा, औद्योगिकरण, पायाभूत सुविधा इत्यादींमध्ये असलेला असमतोल होय.
- **बँकांचे राष्ट्रीकरण :** ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्यात शासन खाजगी बँकेची मालकी व नियंत्रण आपल्या हातांत घेते.
- **बाल मृत्यूदर/शिशु मृत्यूदर :** एका वर्षात एकूण लोकसंख्येतील त्या त्या भौगोलिक विभागात १००० जिवंत अर्भक जन्मामागे असलेले बाल मृत्यूचे प्रमाण म्हणजे बाल मृत्यूदर होय.
- **भौतिक कल्याण :** अन्न, वस्त्र, निवारा व जगण्यास लागणाऱ्या किमान सुविधा प्रत्येकाकडे असणे.
- **महाभ्रमण :** कृषी पर्यटनाची जाहिरात करण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने ही योजना आखली आहे.
- **महिला सक्षमीकरण :** ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे महिला सशक्त होतात व आपल्या आयुष्यावर नियंत्रण मिळवतात तसेच डावपेच किंवा व्यूहरचनात्मक निवड करण्याची क्षमता आत्मसात करतात.
- **मुलांसाठीचे सर्वाधिक (META) प्राधान्य :** ह्याचा अर्थ पालक पुत्रजन्माला अधिक प्राधान्य देतात असा आहे.
- **राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण :** ही राष्ट्रीय पातळीवरील जोखीम स्वीकारणारी व संसाधने व्यवस्थापन करणारी एक यंत्रणा आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून आपत्तीच्या काळात आपत्तीचे सावट व परिणाम कमी करून मदत करणारी व नुकसान भरपाई देणारी आहे.
- **रुपयाची परीवर्तनशीलता/विनिमय दर :** रुपयाला तेव्हा रूपांतरक्षम म्हणता येईल जेव्हा त्याचा विनिमय मुक्तपणे दुसरे चलन किंवा सोन्यासोबत होईल. हा एक लवचीक विनिमय दर प्रणालीचा भाग आहे. जिथे विनिमय प्रणाली दर हा पूर्णपणे मागणी आणि पुरवठा ह्यांच्या परस्पर प्रक्रियेवर अवलंबून आहे.
- **दरडोई उत्पन्न :** देशातील एखाद्या राज्याचे सरासरी दरडोई उत्पन्न याद्वारे निर्धारित केले जाते.
- **वित्तीय तंत्रज्ञान :** कार्यक्रम सामग्री (Software) व आधुनिक तंत्रज्ञान वापरून वित्तीय सेवांचा पुरवठा करणे हा या व्यवसायाचा हेतू आहे.
- **विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI) :** यामध्ये एका देशातून दुसऱ्या देशात गुंतवणूक करताना कार्य स्थापित करणे किंवा मूर्त मालमत्ता मिळवणे यांसारखे घटक समाविष्ट असतात. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक हे केवळ मालकीचे हस्तांतर नसून भांडवलासाठी लागणाऱ्या पूरक घटकांचे म्हणजेच तंत्रज्ञान व संघटनात्मक कौशल्य यांचे हस्तांतरण आहे.
- **विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा (FEMA) १९९९ :** या कायद्याची अंमलबजावणी पूर्वीच्या FERA च्या बदल्यात करण्यात आली होती जी भारतातील परकीय चलन बाजाराच्या सुव्यवस्थेला विकासासाठी आणि देखभालीसाठी प्रोत्साहित करते.
- **विमुद्रीकरण :** नाणे, नोटा किंवा मौल्यवान धातूचा कायदेशीर निविदा म्हणून वापर रद्द करणे होय.

- **शाश्वत आर्थिक वृद्धी :** याचा अर्थ असा की वाढीचा दर जो विशेषतः भविष्यात पुढच्या पिढीसाठी कोणतीही आर्थिक समस्या निर्माण केल्याशिवाय येतो.

- **शैक्षणिक स्वायत्तता :** विद्यार्थ्यांचा प्रवेश, शैक्षणिक आशय, गुणवत्तेची हमी, पदवी कार्यक्रमांचा परिचय, शिक्षणाचे माध्यम यांसारख्या विविध विषयांवर निर्णय घेण्याची शैक्षणिक संस्थांची क्षमता म्हणजे शैक्षणिक स्वायत्तता होय.

- **संस्थात्मक वित्तपुरवठा/संस्थात्मक वित्त :** हे पतसंस्थेचे स्रोत आहेत ज्यामध्ये व्यावसायिक बँकांव्यतिरिक्त इतर वित्तीय संस्था समाविष्ट असताना या संस्था बचत करणारे आणि गुंतवणूकदार यांमधील मध्यस्थ म्हणून कार्य करतात. उदा.सार्वजनिक वित्तीय संस्था (PFIs) बिगर बँकिंग वित्तीय कंपन्या.

- **समावेशक वृद्धी :** समावेशक वृद्धी ही अशी संकल्पना आहे, की ज्यात समाजात साधनसामग्रीचे समान वाटप होऊन सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली जाते.

- **सहकारी संघटन :** सहकारी संघटन ही एक अशी संकल्पना आहे, जिथे राष्ट्र, राज्य आणि स्थानिक शासन लोकांची जबाबदारी घेते व देशाच्या समस्या सोडवण्यासाठी व चांगले कार्य करण्यासाठी ती सामूहिकपणे काम करते.

- **सागरमाला कार्यक्रम :** देशातील बंदरांच्या विकासाला चालना मिळण्यासाठी भारत सरकारने पुढाकार घेऊन हा कार्यक्रम आखला आहे. EXTM चा म्हणजेच आयात-निर्यातीचा रसद खर्च कमी करणे आणि कमीत कमी पायाभूत गुंतवणूक करून देशांतर्गत व्यापारास चालना देणे हा या कार्यक्रमाचा दृष्टिकोन आहे.

- **सार्वजनिक वितरण व्यवस्था :** भारत सरकारच्या अन्नसुरक्षा व्यवस्थेचा हा महत्त्वाचा घटक आहे. यामध्ये रेशनींगच्या दुकानाच्या माध्यमातून जीवनावश्यक वस्तू वाजवी दरात उपलब्ध करून दिल्या जातात.

- **सीमांत शेतकरी :** जो शेतकरी मालक म्हणून, भाडेकरू म्हणून किंवा हिस्सेदार म्हणून एक हेक्टर शेतकी जमिनीवर शेती करतो त्यास किरकोळ शेतकरी असे म्हणतात.

- **सूक्ष्म वित्तपुरवठा :** सामान्यतः विकसनशील राष्ट्रांतील ज्यांना परंपरागत बँकिंग सेवांचा वापर करता येत नाही असे गरीब लोक आणि नवीन उद्योजक यांना पतपुरवठा करणारी ही एक कृती आहे.

- **स्थूल राज्यांतर्गत उत्पादन (GSDP) :** राज्याच्या भौगोलिक सीमारेषेत एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित केलेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य म्हणजेच स्थूल राज्यांतर्गत उत्पादन होय.

# संक्षिप्त रूपांची यादी

| | | |
|---|---|---|
| • ALM | ADULT LITERACY MISSION | प्रौढ साक्षरता अभियान |
| • AAY | ANTYODAYA ANNA YOJANA | अंत्योदय अन्न योजना |
| • AEZ | AGRO EXPORT ZONES | कृषी निर्यात क्षेत्र |
| • APMC | AGRICULTURE PRODUCE & MARKETING COMMITTEE | कृषी उत्पादन व विपणन समिती |
| • APL | ABOVE POVERTY LINE | दारिद्र्य रेषेच्या वर |
| • ASI | ANNUAL SURVEY OF INDUSTRIES | वार्षिक औद्योगिक पहाणी |
| • BPL | BELOW POVERTY LINE | दारिद्र्य रेषेच्या खाली |
| • BPCL | BHARAT PETROLEUM CORPORATION LIMITED | भारत पेट्रोलियम महामंड, मर्यादित |
| • BIFR | BOARD OF INDUSTRIAL & FINANCIAL RECONSTRUCTION | औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळ |
| • BHEL | BHARAT HEAVY ELECTRICALS LIMITED | भारत अवजड विद्युत, मर्यादित |
| • CEO | CHIEF EXECUTIVE OFFICER | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| • CSR | CORPORATE SOCIAL RESPONSIBILITY | सामाजिक उत्तरदायित्व |
| • DCCB | DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक |
| • EGS | EMPLOYMENT GUARANTEE SCHEME | रोजगार हमी योजना |
| • FDI | FOREIGN DIRECT INVESTMENT | विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक |
| • FERA | FOREIGN EXCHANGE REGULATION ACT | परकीय चलन नियमन कायदा |
| • FEMA | FOREIGN EXCHANGE MANAGEMENT ACT | परकीय चलन व्यवस्थापन कायदा |
| • GDP | GROSS DOMESTIC PRODUCT | स्थूल देशांतर्गत उत्पादन |
| • GNP | GROSS NATIONAL PRODUCT | स्थूल राष्ट्रीय उत्पादन |
| • GSDP | GROSS STATE DOMESTIC PRODUCT | स्थूल राज्यांतर्गत उत्पादन |

| | | |
|---|---|---|
| • GSVA | GROSS STATE VALUE ADDED | राज्याचे स्थूल मूल्यावर्धित उत्पादन |
| • HPCL | HINDUSTAN PETROLEUM CORPORATION LIMITED | हिंदुस्थान पेट्रोलियम मर्यादित |
| • HRD | HUMAN RESOURCE DEVELOPMENT | मानवी संसाधनाचा विकास |
| • HYV | HIGH YIELDING VARIETY | उच्च प्रतीची उत्पादने |
| • IRDP | INTEGRATED RURAL DEVELOPMENT PROGRAMME | एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम |
| • IRDA | INSURANCE REGULATORY& DEVELOPMENT AUTHORITY OF INDIA | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण |
| • IPCL | INDIAN PETROCHEMICALS CORPORATION LIMITED | भारतीय पेट्रोकेमिकल्स महामंडळ, मर्यादित |
| • IOC | INDIAN OIL CORPORATION | भारतीय तेल महामंडळ |
| • IT | INFORMATION TECHNOLOGY | माहिती तंत्रज्ञान |
| • ITDC | INDIA TOURISM DEVELOPMENT CORPORATION | भारतीय पर्यटन विकास महामंडळ |
| • ITES | INFORMATION TECHNOLOGY ENABLED SERVICES | भारतीय तंत्रज्ञान सक्षम सेवा |
| • JDY | JAN DHAN YOJANA | जन धन योजना |
| • JGSY | JAWAHAR GRAM SAMRUDDHI YOJANA | जवाहर ग्राम समृद्धी योजना |
| • JRY | JAWAHAR ROZGAR YOJANA | जवाहर रोजगार योजना |
| • MAITRI | MAHARASHTRA INDUSTRY,TRADE & INVESTMENT FACILITATION CELL | महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र |
| • MGNREGS | MAHATMA GANDHI NATIONAL RURAL EMPLOYMENT GUARANTEE SCHEME | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना |
| • MRTP | MONOPOLIES &RESTRICTIVE TRADE PRACTICES | एकाधिकार आणि प्रतिबंधक व्यापार पद्धती |
| • MTDC | MAHARASHTRA TOURISM DEVELOPMENT CORPORATION | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ |

| | | |
|---|---|---|
| • NABARD | NATIONAL BANK FOR AGRICULTURE & RURAL DEVELOPMENT | राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास अधिकोष/ बँक |
| • NDMA | NATIONAL DISASTER MANAGEMENT AUTHORITY | राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण |
| • NEP | NEW ECONOMIC POLICY | नविन आर्थिक धोरण |
| • NFHS | NATIONAL FAMILY HEALTH SURVEY | राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य पहाणी |
| • NGO | NON GOVERNMENTAL ORGANIZATION | गैर सरकारी संस्था |
| • NITI | NATIONAL INSTITUTION FOR TRANSFORMING INDIA | राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था |
| • NRB | NATIONAL RENEWAL BOARD | राष्ट्रीय नूतनीकरण मंडळ |
| • NRHM | NATIONAL RURAL HEALTH MISSION | राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान |
| • NUHM | NATIONAL URBAN HEALTH MISSION | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान |
| • NSSO | NATIONAL SAMPLE SURVEY ORGANIZATION | राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्था |
| • NTPC | NATIONAL THERMAL POWER CORPORATION | राष्ट्रीय थर्मल पॉवर कॉर्पोरेशन |
| • NVA | NET VALUE ADDED | निव्वळ मूल्य जमा वर्धित |
| • ONGC | OIL & NATURAL GAS CORPORATION | तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ |
| • PACS | PRIMARY AGRICULTURAL CREDIT SOCIETIES | प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था |
| • PMAY | PRADHAN MANTRI AWAAS YOJANA | प्रधानमंत्री आवास योजना |
| • PMRY | PRADHAN MANTRI ROZGAR YOJANA | प्रधानमंत्री रोजगार योजना |
| • RBI | RESERVE BANK OF INDIA | भारतीय रिझर्व बँक |
| • RMSA | RASHTRIYA MADHYAMIK SHIKSHA ABHIYAAN | राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान |
| • RRB | REGIONAL RURAL BANKS | प्रादेशिक ग्रामीण बँक |

| | | |
|---|---|---|
| • RUSA | RASHTRIYA UCHCHATAR SHIKSHA ABHIYAAN | राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान |
| • RTE | RIGHT TO EDUCATION | शिक्षण हक्क कायदा |
| • SAIL | STEEL AUTHORITY OF INDIA LIMITED | स्टील अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड |
| • SBM | SWACHCH BHARAT MISSION | स्वच्छ भारत अभियान |
| • SCB | STATE CO-OPERATIVE BANKS | राज्य सहकारी अधिकोष/बँक |
| • SEBI | SECURITIES & EXCHANGE BOARD OF INDIA | भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ |
| • SEZ | SPECIAL ECONOMIC ZONES | विशेष आर्थिक क्षेत्र |
| • SGSY | SWARNAJAYANTI GRAM SWAROZGAR YOJANA | स्वर्णजयंती ग्राम रोजगार योजना |
| • SJSRY | SWARNAJAYANTI SHAHARI ROZGAR YOJANA | स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना |
| • SPCI | STATE PER CAPITA INCOME | राज्य दरडोई उत्पन्न |
| • SSA | SARVA SHIKSHA ABHIYAAN | सर्व शिक्षा अभियान |
| • TRYSEM | TRAINING RURAL YOUTH FOR SELF EMPLOYMENT | ग्रामीण युवक प्रशिक्षण व स्वयंरोजगार |
| • UNDP | UNITED NATIONS DEVELOPMENT PROGRAMME | संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम |
| • VSNL | VIDESH SANCHAR NIGAM LIMITED | विदेश संचार निगम मर्यादित |

# संदर्भ सूची


- Directorate of Economics and Statistics, Planning Dept. Government of Maharashtra, Economic Survey of Maharashtra 2017-18
- Government of India, Planning Commission, June, 2014, - Report of the Expert Group to Review the Methodology for Measurement of Poverty.
- Government of India, NITI Aayog, 21st March, 2016, Eliminating Poverty: Creating Jobs and Strengthening Social Programs (Occasional Paper 2).
- Ministry of Finance, Government of India (Oxford Press), Economic Survey 2017-18.


## महत्त्वाची संकेत स्थळे/दुवे

- censusindia.gov.in
- https://data.gov.in
- https://dfpd.gov.in – (Dept. of Food and Public Distribution, India).
- https://mahades.maharashtra.gov.in
- https://mohfw.gov.in – (Ministry of Health and Family Welfare, GoI)
- https://www.rbi.org.in - (Reserve Bank of India)
- https://rural.nic.in – (Ministry of Rural Development, GoI)
- https://www.un.org/sustainabledevelopment
- https://www.worldbank.org - (World Bank)
- mahafood.gov.in - (Food, Civil Supplies and Consumer Protection Dept. GoM)
- mofapp.nic.in:8080/economic survey (Ministry of Finance, GoI)
- planningcommission.gov.in – (Planning Commission)
- pmkvyofficial.org – (Pradhan Mantri Kaushal Vikas Yojana)
- www.csoisw.gov.in – (Annual Survey of Industries)
- www.makeinindia.com
- www.mospi.gov.in/national-sample-survey-office-nsso – (Ministry of Statistics and Programme Implementation, GoI).
- www.niti.gov.in – (NITI Aayog)

## महत्त्वाची टिपणे

# महत्त्वाची टिपणे

निती आयोग



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.

मराठी अर्थशास्त्र इ.११ वी

₹ ६०.००

अर्थशास्त्र इ.११ वी (मराठी माध्यम )